# चौथा शिक्का

शुभ संध्याकाळ. आपण आता आपली मस्तके प्रार्थनेसाठी, काही क्षण झुकवूया.

2 आमच्या दयाळू आणि स्वर्गीय पित्या, आज रात्री आम्ही पुन्हा प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात, तुजकडे आणखी एक दिवस दिल्याबद्दल, धन्यवाद देण्यासाठी येत आहोत. आणि आम्ही आता आज रात्रीच्या सभेसाठी तुझा आशीर्वाद मागतो. पवित्र आत्मा येवो आणि ह्या गोष्टींचा अर्थ आम्हास देवो, ज्या आम्ही फार नीट शोधत आहोत. हे परमेश्वरा, ते इतके मौल्यवान असो की आम्ही सर्व वचनाभोवती अशा प्रकारे सहभागिता करु शकू, जेव्हा आम्ही जाऊ, आम्ही सांगू शकू की, “तो वाटेने आपल्याबरोबर बोलत असता आपल्या अंत:करणाला आतल्या आत उकळी येत नव्हती काय?” आम्ही तुझा धन्यवाद करतो की त्याने जे आम्हांसाठी केले, आणि विश्वास करतो की तो आमच्या प्रवासात आम्हाबरोबर राहील, हे आम्ही येशूच्या नावाने मागतो. आमेन.

3 प्रभूच्या भवनात, आज रात्री, पुन्हा सभेसाठी येताना खूप आनंद होत आहे, आणि आम्ही आनंदीत आहोत. मी इतका आनंदी आहे की…

4 मी विचार केला होता, की तो येणार नाही, परंतु शेवटी तो आला. आणि मी इतका आभारी आहे, की तो त्या चार घोडेस्वारांपैकी शेवटचा आहे, जो मला वाटते मंडळीला ह्या समयी दिलेल्या महत्त्वाच्या संदेशांपैकी एक आहे.

5 मला माहीत नाही की पुढचा शिक्का काय आहे. मी तर ते रोज घेत आहे, जसे तो मला ते प्रकट करतो. मी ते देण्याचा प्रयत्न करतो…जसे तो ते मला देतो.

6 काय तुम्ही परमेश्वराच्या आशीर्वादांचा आनंद घेत आहात? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] काय तुम्ही लक्ष दिले की ती मंडळीच्या युगांबरोबरच्या सहकार्याने ती कशी त्यांच्याबरोबर अगदी योग्य जुळत आहे? त्याचप्रकारे कशी ती…ते मला असे दर्शविते ती—ती हा तोच पवित्र आत्मा आहे ज्याने मंडळीची युगे दिली, तोच पवित्र आत्मा हे आता देत आहे, तुम्हाला समजले, कारण हे सर्व देवाच्या महान कार्यात एकत्र मिसळले आहे, त्यास निरनिराळ्या प्रकारे प्रकट करीत आहे.

7 तुम्ही लक्ष द्या, जेव्हा त्याने स्वतःस दानिएलाला दृष्टांतातून दाखविले, तेथे एक गोष्ट दर्शवित होते. जसे ह्या जागी एक—एक बकरी, किंवा एखादे झाड; नंतर त्या जागी एक मुर्ती असेल. आणि—आणि—आणि ज्या गोष्टी त्याने केल्या, त्याच गोष्टी करीत आहे, तीच गोष्ट सर्व समयी, अगदी निश्चित राहा की आपण त्या गमावणार नाही.

8 आता, काही क्षणांअगोदर मी विस्मयीत झालो, मी एका स्त्रीशी बोलत होतो. जी येथे बसली होती, जी अंदाजे पंचाऐंशी वर्षाची होती…

9 अधिक दिवस झाले नाही, मी पश्चिमेला जाण्याच्या अगोदर, तेथे एक—एक लहान मुलगी ओहीयो येथे होती, मला असे वाटते की ती ल्यूकेमियाच्या रक्तकर्करोगाच्या अंतिम अवस्थेत मरत होती. आता ल्यूकेमिया हा एक रक्तातील कर्करोग आहे. आणि, ओह, ती लहानशी मुलगी, तुम्हाला माहीत आहे, अशा भयंकर अवस्थेत होती की तेथे तिच्यासाठी आणखी आशा बिलकूल उरली नव्हती. ते तिला नसांतून, ऑपरेशनद्वारे भरवीत होते. आणि ते अगदी गरीब कुटूंब होते. आणि…

10 श्रीमती किड, येथे आणि भाऊ किड, ह्यांनी त्यांना सांगितले की प्रभू प्रार्थनेचे खूप उत्तर देतो. आणि ते एकत्र आले, मला वाटते, आणि कोणालातरी भाड्याने घेतले, आणि

त्या लहान मुलीला खाली घेऊन आले. ती लहानशी फार सुंदर मुलगी होती, अंदाजे सहा, सात वर्षे वयाची होती. [बहिण म्हणाली, "नऊ वर्षाची"—सम्पा.] नऊ वर्षाची. आणि—आणि ती तेथे एका खोलीत होती...

11 आणि जेव्हा आम्ही प्रभूसमोर गेलो, पवित्र आत्म्याने तिला एक वचन दिले. आणि त्यांना तिला घ्यावे लागत असे; आणि तिला घ्यावे लागत असे आणि तिला भरवावे लागत असे, तुम्हाला माहीत आहे, तशाप्रकारे. आणि जेव्हा ती निघाली, ती हॅमबर्गरसाठी रडत होती, आणि, म्हणून, ती तिचे अन्न तोंडावाटे घेत होती. आणि त्यांनी तिला ते हॅमबर्गर दिले आणि तिला नैसर्गिकरित्या खाणे देत गेले.

12 थोड्याच अवधीत, काही दिवसात, त्यांनी तिला पुन्हा डॉक्टरकडे नेले...डॉक्टर तेव्हा काही समजू शकला नाही. तो म्हणाला, "ती तीच मुलगी नाही, ती मुळीच तीच मुलगी नाहीए." तो म्हणाला, "का, तेथे—तेथे ल्युकेमियाचे रक्त कर्करोगाचे एकही लक्षण नव्हते. कोठेच नाही, कोठेच नाही." आणि ती मरणास टेकली होती. त्यांनी तिच्या वाचण्याची आशा सोडली होती. ते फक्त तिला शीरांद्वारे अन्न भरवीत होते. ती फिक्की पडली होती. तुम्हाला माहीतच आहे की ते कसे आले होते...आणि आता ती शाळेत जात आहे. इतर मुलासमवेत खेळते, इतकी आनंदीत आहे जितकी ती होऊ शकते.

13 हे मला आणखी अशा घटनेची आठवण देते. एके दिवशी मी असाच घरी आलो, तेथे कोणी होते...जर मी चूक करत नसेल, तेथे एपिस्कोपीलियन्स किंवा प्रेसबेटेरियन लोक होते, त्यांनी कन्सासवरुन एका लहान मुलीला आणले होते. आणि डॉक्टरांनी तिची रक्त कर्करोगामुळे आशा सोडली होती. आणि मला वाटते त्यांनी तिला जगण्यासाठी फक्त चार दिवस दिले होते; कारण तिची अवस्था फार बिघडली होती. म्हणून ते म्हणाले की त्यांनी ते चार दिवस येथे येण्यासाठी घालविले, तिला प्रार्थनेकरिता घेऊन येण्यासाठी त्यांनी बर्फाचे ढिगारे आणि इतर गोष्टी पार करीत त्या देशांतून आले. आणि तिचे आजोबा... चांगले दिसणारे, एक वृद्ध व्यक्ति होते, त्यांचे केस पिकलेले होते.

14 आणि त्यांनी तिला येथे एका लहानशा मोटेलमध्ये आणून दोन दिवस उलटले होते. मला वाटते की ते मोटेल येथे जाता सिल्वर क्रिकच्या ह्या बाजूला नव्हते. आणि म्हणून मी खाली त्या रात्री तिच्यासाठी प्रार्थना करण्यासाठी गेलो. तो पहाटेचा समय होता. मी त्या रात्री शहरांतून आलो होतो, आणि खाली गेलो. आणि ते आजोबा तेथे चालत होते, आणि आई, त्या मुलीची काळजी घेण्याचा प्रयत्न करीत होती.

15 आणि मी प्रार्थनेकरिता गुडघे टेकले असताना, पवित्र आत्म्याने मला एक रहस्य प्रकट केले जे तिच्या आई आणि वडिलांमधील होते, त्यांनी जे केले होते. मी त्यांना बाजूला बोलावले आणि त्याविषयी त्यांना विचारले. ते रडू लागले, म्हणाले, "ते बरोबर आहे."

16 तेव्हा मी मागे पाहीले, आणि मी पाहिले ती लहान मुलगी दोरी उड्या खेळत होती. आणि आता ती लहान मुलगी...तीन आठवड्याच्या समयात, त्यांनी मला त्या लहान मुलीचा फोटो पाठवला, पुन्हा शाळेत जाताना, दोरी उड्या खेळताना, आणि तिला बिलकूल रक्ताचा कर्करोग नव्हता.

17 आता, आता, ह्या साक्षी अगदी खऱ्या सत्य होत्या, समजले. म्हणून, आपला देव इतका खरा आहे, तुम्हाला समजले. आम्ही फक्त त्याची सेवा करतो आणि—आणि त्याच्यावर विश्वास ठेवतो—आणि—आणि मला—मला माहीत आहे तो खरा आहे.

18 आता, जेव्हा आपल्यामध्ये कोणी आपल्या मार्गाने कार्य करीत असता, मी माझे सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करीत आहे आणि आता परमेश्वराच्या कृपेने, आज रात्री आपण

हा चौथा शिक्का अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार आहोत. आणि पाहणार आहोत की पवित्र आत्मा आपल्याला त्यात काय सांगत आहे.

19 आता मी प्रकटीकरणाचा 6 अध्याय वाचत आहे. आणि 7 व्या वचनापासून, 7 वे आणि 8 वे वचन. तेथे नेहमी दोन वचने असतात. पहिली घोषणा आहे. आणि दुसऱ्या वचनात त्याने जे पाहिले ते आहे.

> *त्याने चौथा शिक्का फोडला, तेव्हा चौथा—चौथा प्राणी, ये, असे म्हणाला, ते मी ऐकले.*
>
> *मग मी पाहीले, तो एक फिक्कट रंगाचा घोडा, आणि त्याच्यावर तो बसलेला पुरुष माझ्या दृष्टीस पडला, त्याचे नाव मृत्यु आणि अधोलोक त्याच्या पाठोपाठ चालला...होता. त्यांना तरवारीने दुष्काळाने, मरीने व पृथ्वीवरील श्वापदांकडून माणसांना जीवे मारण्याचा अधिकार, पृथ्वीच्या चौथ्या भागावर देण्यात आला.*

20 आता, प्रभू हे समजण्यासाठी आमचे सहाय्य करो. हे एक रहस्य आहे.

21 आता, एक लहानशी रुपरेषा तयार करण्यासाठी, जशी आपण मंडळीच्या युगाच्यावेळी केले, हे स्वार आणि ह्या शिक्क्याचे उघडणे हे पाहूया. आता आपण हे आपल्या मनात ठेवूया, ह्यावर थोडेसे बोलूया जोपर्यंत आपण अनुभवत नाही की हे बोलण्याचा हा योग्य समय आहे.

22 आता, आपण हे पाहिले शिक्के उघडणे, हे मोहरबंद केलेले मुक्तीचे पुस्तक आहे. आणि नंतर ते पुस्तक गुंडाळीप्रमाणे गुंडाळलेले आहे, प्राचीन पद्धतीप्रमाणे.

23 [भाऊ ब्रॅन्हम गुंडाळी गुंडाळण्याचे आणि मोहरबंद करण्याचे प्रात्यक्षिक एक पेपर वापरुन करुन दाखवतात—सम्पा.] ते *अशा* प्रकारचे पुस्तक नव्हते, कारण असे पुस्तक अलिकडच्या काळात, अशा प्रकारची पुस्तके अलिकडेच, मला वाटते दिडशे वर्षांपूर्वी किंवा काही दोनशे वर्षांपूर्वी आली. आणि तेव्हा ते असे गुंडाळीत असत आणि त्यांची दोन्ही टोक सोडलेली असत. जसे मी तुम्हाला सांगितले की ते कसे केले जात होते, आणि वचनात, तुम्हाला ते कोठे मिळेल, आणि यिर्मयामध्ये आणि अशाप्रकारे. त्यानंतर दुसरे दस्तऐवज गुंडाळले जात असे आणि त्यांचे टोक मोकळे सोडले जात होते, आणि *अशा* प्रकारे.

24 आणि प्रत्येक एक शिक्का होता. आणि ते सात शिक्क्यांचे पुस्तक होते, आणि ते होते...ते सात शिक्क्यांचे मुक्तीचे पुस्तक होते. मला क्षमा करा.

25 आणि, तेव्हा, स्वर्गात, पृथ्वीवर, किंवा पृथ्वीखाली, कोणीही ती गुंडाळी उघडावयास किंवा तिच्यात पाहावयास समर्थ नव्हता. आणि योहान रडला, कारण त्याला कोणीही मनुष्य आढळला नाही...कारण, जर ते पुस्तक मुळ मालकाच्या हातून घेतले नसते... जेथे ते आदाम आणि हव्वेकडून गमावले होते, आणि जेव्हा त्यांनी त्यांचे वचनाचे अधिकार, आश्वासने, त्यांचा वारसा गमावल्यानंतर, ते पुन्हा मुळ मालकाकडे गेले.

26 लक्षात ठेवा, त्यांनी पृथ्वीवर सत्ता केली. तो एक—एक छोटा ईश्वर होता, कारण तो देवाचा पुत्र होता, आणि एक देवाचा पुत्र हा—हा—हा छोटा देव आहे. हे वचनाविरुध्द असू शकत नाही. मला माहीत आहे हे विचित्र वाटते.

27 परंतु येशू म्हणाला, "जर ज्यांच्याकडे परमेश्वराचे वचन येते त्यांना तुम्ही देव म्हणता..." आणि परमेश्वराचे वचन कोणाकडे येते? संदेष्टे यांकडे. "जर त्यांना तुम्ही

‘देव’ म्हणता, ज्यांच्याकडे देवाचे वचन येते, देवाचा पुत्र आहे असे म्हटल्यावरुन तुम्ही दुर्भाषण करिता असे तुम्ही कसे म्हणता?” समजले?

आणि, आता, ते देव होते.

28 आणि मनुष्य, जर तुम्ही तुमच्या कुटूंबाच्या नावाने कुटुंबात जन्मता, तर तुम्ही एक पुत्र आहात आणि तुमच्या पित्याचा भाग आहात.

29 आणि मग—मग जेव्हा पाप आत शिरले, आपण पाहतो की मनुष्याने ती दरी ओलांडली, आणि—आणि बैलाच्या आणि बकऱ्याच्या रक्ताने, ते झांकले गेले. परंतु त्यात पापमोचन करण्याची शक्ती नव्हती, जोपर्यंत, ते खरे विरंजक येईल जे पापाचे डाग घेऊ शकेल, आणि ते पूर्णपणे फोडून तुकडे करु शकेल, आणि ते पुन्हा त्याच्या मुळ विकृत करणाऱ्याकडे पाठवू शकेल, जो सैतान होता.

30 जेव्हा ते पुन्हा सैतानाकडे गेले, त्याचा सार्वकालिक संपूर्ण नाश होण्याच्या समयापर्यंत तो वाट पाहतो. आता, ते दाखवते की आपण काय विश्वास करतो. आपण विश्वास करतो की तो पूर्णपणे नष्ट केला जाईल आणि संपूर्ण नाश होईल,

31 मी विश्वास करतो की पाप छिन्न भिन्न केले जाईल, आणि जेव्हा त्याची येशू ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे कबुली दिली जाते, ते अगदी तसे आहे जसे की काळ्या शाईचा थेंब खूप क्लोरेक्स विरंजकामध्ये घालणे तो त्या रसायनामध्ये विभक्त होतो, आणि तेथे पुन्हा पाठवला जातो जेथून तो आला आहे. समजले? आणि तशाच प्रकारे येशू ख्रिस्ताचे रक्त करते.

32 तेव्हा, तो मनुष्य ती दरी ओलांडून पुन्हा, देवाचा पुत्र म्हणून होतो. समजले? तेव्हा तो—तेव्हा तो बनतो...का, त्यांच्यातही देवाचे निर्मितीचे सामर्थ्य येते. आणि, जेव्हा परमेश्वर तसे होण्याची आज्ञा करु शकेल, तेव्हा तसे होईल, आणि आपण पुन्हा परमेश्वराकडे जाऊ. ते जेव्हा...

33 मोशे, बैलाच्या रक्ताखाली होता;...आणि जेव्हा त्याला तो प्रकाश अग्नीस्तंभ, जळत्या झुडुपामध्ये भेटला. आणि तेथे तो देवाने त्याला जी सेवकाई दिली, त्यावर उभा राहीला. आणि तो एक संदेष्टा होता. आणि जेव्हा देवाचे वचन त्याच्याकडे आले, तो बोलला, आणि अगदी शब्दाद्वारे गोष्टी निर्माण केल्या गेल्या. समजले?

34 आता, जर त्याने ते, बैलाच्या रक्ताखाली केले, तर येशू ख्रिस्ताच्या रक्ताविषयी काय? झाकले नाही; परंतु त्याचे पूर्णपणे पापमोचन केले. आणि तुम्ही देवाच्या उपस्थितीत, मुक्त केलेले पुत्र म्हणून उभे राहता. आता मंडळी ही त्या आदर्श राहणीमानापासून खूप दूर आहे. आणि मला वाटते, कित्येक वेळा, खऱ्यारितीने बाहेर येण्याऐवजी आणि समस्येला सामोरे जाण्याऐवजी भटकत राहतो.

माझ्याकडे काही आहे जे मी सांगू इच्छितो, आणि मी—मी त्या वेळेस ते सांगेन.

35 आणि आता लक्ष द्या की तेथे कुठेतरी मंडळ्यांत चुकीचे आहे. आणि मला, वाटते ती संप्रदायातील प्रणाली आहे जी लोकांची मने भलतीकडे वळवीत आहे, आणि अशा प्रकारे, जोपर्यंत ते कसे करावे त्यांना कळत नाही. ते बरोबर आहे.

36 परंतु आपल्याला अभिवचन दिले आहे की ते प्रकट केले जाईल आणि आता तेथे सात शिक्के आहेत ज्यांनी हे पुस्तक मोहरबंद केले आहे. आणि ते सात शिक्के आता...

37 आणि तेव्हा ते सात शिक्के पूर्ण झाल्यानंतर, आपल्याला प्रकटीकरण 10 मध्ये कळते, तेथे सात रहस्यमय गर्जना होत्या ज्याविषयी योहानास लिहीण्यास सांगितले, परंतु नंतर, त्या लिहीण्यास मना केले. आणि त्या गर्जनांच्या समयी, आपण ख्रिस्ताला पाहतो, किंवा

“तो देवदूत मेघ धनुष्यासह खाली येतो, आणि त्याचे पाय भूमीवर आणि समुद्रावर ठेवतो, आणि शपथ वाहून म्हणतो, आणखी अवकाश लागणार नाही.”

38 आणि मग आपण शिक्के उलगडताना पाहतो की, कोकरा त्याचे मध्यस्थ म्हणून मध्यस्थीचे काम सोडतो, आणि आता त्याच्या अधिकारांचा दावा करण्यास पुढे येतो, ते सर्व जे त्याने त्याच्या मृत्युद्वारे सोडविले होते.

39 आणि, मग कोणीही ते पुस्तक उघडू शकला नाही. कोणालाही ते समजले नाही. ते मुक्तीचे पुस्तक होते. आणि देव जो पिता, आत्मा, त्याच्या हातात ते होते, कारण ख्रिस्त हा राजासनावर एक मध्यस्थ, एकच मध्यस्थ म्हणून होता. म्हणून तेथे कोणी संत, मरीया, योसेफ, दुसरे काहीही त्या वेदीवर असू शकत नव्हते, कारण तेथे येशूचे रक्त होते. आणि फक्त येशूचे रक्त ते प्रायश्चित्त करु शकत होते, म्हणून दुसरे काहीच मध्यस्थ म्हणून उभे राहू शकत नव्हते. ते बरोबर आहे. तेथे दुसरे काही नव्हते.

40 म्हणून ज्यूड बरोबर राजकारणासाठी मध्यस्थी करण्याची ही सर्व कल्पना आणि संत सिसीलिया आणखी कशासाठी, तिच्याबरोबर मध्यस्थी करण्याची कल्पना तो मुर्खपणा आहे. ते—ते असे नाही…मी—मी म्हणत नाही की ते लोक प्रामाणिक आणि सच्चे नाहीत. मी म्हणत नाही तुम्ही ते करताना प्रामाणिक नाही, जर तुम्ही ते करता. परंतु, तुम्ही—तुम्ही चुकीचे आहात, तुम्ही खरोखर चुकीचे आहात. आणि…

41 ते म्हणतात, “बरे, हा—हा देवदूत, हा—हा संत बोनीफरला प्रकट झाला आणि *हे* म्हणाला *ते*, आणि *इतर*. आणि त्यांनी *हे* म्हटले पाहिजे.” मी त्यावर माझ्या मनात थोडाही अविश्वास करीत नाही, परंतु कोणीतरी दृष्टांतात काय पाहीले. मी—मी अविश्वास करीत नाही परंतु जोसेफ स्मिथने दृष्टांतात काय पाहीले, परंतु ते बाकीच्या वचनाप्रमाणे नव्हते. म्हणून माझ्यासाठी ते चुकीचे आहे. समजले? ते संपूर्णतः वचनाप्रमाणे आले पाहीजे.

42 तशाच प्रकारे मंडळीचे युगे, आणि शिक्के आणि त्याच्या इतर सर्व गोष्टी आहेत. आणि जेव्हा कोणाला वाटते की त्याच्याकडे त्या सात गर्जना आहेत, जर त्याची इतर वचनांबरोबर तुलना होत नाही, तर तेथे काहीतरी चुकीचे आहे. समजले? ते असे **प्रभू परमेश्वर म्हणतो** असे आले पाहीजे, कारण हे पुस्तक आहे. हे पूर्णतः येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण आहे.

आता, मी—मी विश्वास करतो की तेव्हा तो कोकरा पुढे आला.

43 त्यांना माहीत नव्हते. योहान रडत होता त्याला कोणीही स्वर्गात, पृथ्वीवर आढळले नाही, कारण सर्वजण त्या दरीपलिकडे पापात होते, समजले तेथे एकही मनुष्य नव्हता… आणि एखादा देवदूत, अर्थात, तो समर्थ असू शकेल, परंतु, शेवटी तो आप्तजन असला पाहीजे. तो मनुष्य असला पाहीजे. आणि तेथे असे कोणी नव्हते, कारण प्रत्येक मनुष्याचा जन्म लैंगिकरित्या झाला होता.

44 त्याला असा एक बनवावा लागला जो लैंगिकरित्या जन्मला नव्हता. म्हणून देवाला स्वत:ला ते करावे लागले, कुमारीपासून जन्म घेतला, आणि इम्मानुएल झाला, त्याचेच रक्त एक असे होते जे समर्थ होते. तेव्हा जेव्हा त्याने ही दरी ओलांडली, त्याने स्वतः आणि किंमत चुकवली आणि आम्हासाठी रस्ता बांधला, मग तो मध्यस्थ म्हणून, बसला. आणि तो तेथे बसलेला आहे.

45 आणि ते पुस्तक त्या सर्व समयापर्यंत, वास्तविकरितीने बंद होते. ते तेथे होते, परंतु ते अजूनही चिन्हात होते. त्यांनी ते पाहीले. योहानाने देखिल ते पाहीले. जेव्हा पहिला घोडा आला तेव्हा घोषणा झाली, तो म्हणाला, “एक पांढरा घोडा पुढे गेला; त्याच्यावर

एक घोडेस्वार होता; त्याच्या हातात एक धनुष्य होते;" ते एक चिन्ह आहे. ते प्रकट झाले नाही. ते फक्त एक चिन्ह आहे. आणि जोपर्यंत पृथ्वीवर कोणीही मनुष्य, तेच सर्व तो सांगू शकेल. ते बरोबर आहे, तो कदाचित अडखळेल आणि लटपटेल, निःसंशय, कोठेतरी *येथे* किंवा *तेथे* ठोकर खाऊ शकतो, आणि काही वेळानंतर.

46 परंतु आपण नंतर, प्रकटीकरणाच्या पुस्तकात पाहतो, "सातव्या दूताच्या संदेशाच्यावेळी, ती गूजे (त्याची सर्व गूजे) त्या समयापर्यंत प्रकट झालेली असली पाहीजे." आता ते प्रकटीकरण 10:1–7, की ते त्या समयाप्रमाणे ती प्रकट झाली पाहीजे, त्या समयी जेव्हा त्याने ती प्रकट केली.

47 तेव्हा सात मेघगर्जनांनी त्यांचे अपरिचित शब्द काढले, आणि योहान लिहीणार होता. परंतु योहानाला माहीत होते ते काय होते, परंतु त्याने—त्याने ते लिहीले नाहीत. कारण ते लिहीण्यास त्यास मनाई करण्यात आली. ती संपूर्णपणे, एकंदर एक रहस्य आहे. ते चिन्हांत किंवा इतर कशात नव्हते. आपल्याला फक्त माहीत आहे त्याने...तेथे मेघगर्जना झाली, तेच सर्व आहे.

48 आणि आता हा अभ्यास करीत असताना आता, विसरु नका, रविवारी, किंवा रविवारी सकाळी; आम्ही आरोग्य सभा स्थगित केली कारण लोकांच्या प्रश्नांना उत्तर देत होतो. आता, माझी इच्छा आहे की तुम्ही ह्या सात शिक्क्यांवर प्रश्न विचारावे, जर ते तुम्हाला सतावीत असेल, असे काही जे तुम्हाला समजत नाही. आपण ते प्रश्न सात शिक्क्यांवर विचारु शकता. मग मी शनिवार रात्रीपर्यंत सांगू शकतो, की मी त्यावर पुरेसे उत्तर देऊ शकतो किंवा नाही, तुम्हाला समजले? आणि आताच, हे सांगा, ठीक आहे अथवा दुसऱ्या, कशाविषयी बोलावे, किंवा, "मी हे करु का?" किंवा—किंवा मी काही स्वप्नाविषयी सांगू, त्या, त्या सर्व गोष्टी आता बहुमुल्य आहे हे लक्षात ठेवा. त्या बहुमुल्य गोष्टी आहेत. परंतु आपण सात शिक्क्यांचा अभ्यास करुया. त्याचविषयी आपण आता अभ्यास करीत, आहोत...त्यासाठीच ही सभा सात शिक्क्यांसाठीच आयोजीत केली आहे. आपण त्यावरच अभ्यास करुया.

49 मला घरी जायचे आहे, पश्चिमेला काही सभा घ्यायच्या आहेत. मग मी पुन्हा येईन. थोड्याच अवधीत एक महिना किंवा दोन किंवा तसेच आणि जर प्रभू अनुमती देईल तर आपण आणखी काही घेऊ शकतो, कदाचित आरोग्य सभा किंवा तेव्हा दुसरे काही, किंवा...जे काही असेल.

50 मग आपल्याकडे येथे सात तुताऱ्या ज्या अजून पुढे आहेत, तुम्हाला समजले. आणि त्या सर्व त्यामध्येच येतात. आणि त्या सात पीडा, पहा. ज्या ओतल्या जाणार आहेत. म्हणून, आणि त्या एक दुसऱ्याबरोबर जोडलेल्या आहेत, परंतु तरीही त्या सर्व रहस्यमय आहेत.

51 आता, मागील रात्री...आपण पाहीले की पहिला शिक्का उघडला आणि तो स्वार... आणि प्रभूने...मला सहाय्य केले, मला हे अगोदर कधीच माहीत नव्हते. ह्या कुठल्याच गोष्टी मला अगोदर माहीत नव्हत्या. ते बरोबर आहे. आणि मला खरेच माहीत नाहीत.

52 फक्त तेथे वर गेलो, आणि बायबल घेतले आणि खाली बसलो, आणि तेथे तोपर्यंत बसलो जेव्हा ते अशाप्रकारे फोडले गेले. मी माझा पेन उचलला आणि लिहीण्यास सुरुवात केली. आणि तेथेच राहीलो, कदाचित कित्येक तास, तोपर्यंत, जोपर्यंत ते—ते शिक्के फोडणे समाप्त झाले नाही.

53 मग मी पुन्हा गेलो आणि मी शोधले व पाहीले की हे त्याने कुठे सांगितले आहे. मला वाटले, "अच्छा जणू काही मी ते कुठेतरी पाहीले आहे." मी आपली शब्दसूची घेतली,

त्यात पाहू लागलो. "असे काही तेथे आहे का? आणि *येथे* ते आहे. आणि मग *येथे* ते पुन्हा येथे. आहे आणि ते *येथे* मागे आहे, आणि *खाली* आहे आणि *येथे* वर आहे." नंतर मी ते व्यवस्थित क्रमवार लावले. मला माहीत आहे तो देव आहे, जोपर्यंत ते वचन वचनाशी मेळ खाते. ते तशाचप्रकारे झाले पाहीजे. अगदी जसे एखादी इमारत बांधली जाते, चिऱ्यावर चिरा बरोबर लावला जातो.

54 आता, मागील रात्री आपण तिसरा शिक्का उघडताना पाहीला. पहिला पांढरा घोडा होता, आणि दुसरा लाल घोडा होता, आणि त्यानंतरचा काळा घोडा होता. आणि आपण पाहतो की सर्व समयी, घोडेस्वार एकच होता; आणि तो सुरुवातीपासून ख्रिस्तविरोधी होता; त्याच्याकडे मुकूट नव्हता—नव्हता, परंतु त्याला तो नंतर मिळाला. आणि मग आपण पाहतो की नंतर त्याला एक तरवार देण्यात आली होती, पृथ्वीवरुन शांती हरण करण्यासाठी, आणि आपण पाहीले की त्याने ते केले. मग तो चर्चला पैसे देण्याच्या शिकवणीसह आला, *ह्यासाठी* तो एक दिनार तोलून देतो, आणि *त्यासाठी* दोन दिनार तोलतो. परंतु त्यास तेल व द्राक्षारसाला स्पर्श करण्याची मनाई केली होती, जे थोडेसेच शिल्लक राहीले होते.

55 आणि मागील रात्री, आपण येथून सोडले होते, आम्ही उदाहरणासह स्पष्ट केले की तेल आणि द्राक्षारस काय होते, आणि त्याचा परिणाम काय होता. आणि ते कदाचित तुम्हाला थोडेसे उध्दट वाटले असेल, परंतु...ते अगदी सत्य आहे. समजले? आता, आपण जेथे सोडले होते...आता आपण अगदी काही क्षणातच त्याची उजळणी करुया. आणि तेव्हा आपण द्राक्षारसाचे सामर्थ्य; तेल काय दर्शविते, आत्मा. ह्यावर सोडले होते. आता, मला वाटते तुम्ही सर्वांनी ते सर्व लिहून घेतले आहे. तुम्हाला ते टेपवर सापडेल, जर तुम्ही ते लिहीले नसेल आणि ते वचन कोठे लिहीले आहे, की तेल नेहमीच पवित्र आत्मा दर्शविते, जसे की मुर्ख कुमारीकडे तेल नव्हते, शहाण्या कुमारींकडे तेल होते, जो पवित्र आत्मा आहे. आणि मग आम्ही जुन्या करारात पाहीले की संदेष्टे, आणि इत्यादी. आणि...

56 अर्थात, मी तेथे प्रत्येक वचन आणण्याचा प्रयत्न करीत नाही. आणि तेथे काही गोष्टी आहे ज्याविषयी तुम्ही बोलूही शकत नाही; त्या खूप वेळ घेतात. परंतु मी येथे त्या वचनासह, आणि इतर गोष्टींसह मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. ह्यासाठी की लोकांना ह्याविषयी पुरेशी माहिती द्यावी की त्यांना हे समजेल आणि त्याचे चित्र त्यांना समजेल. परंतु जर तुम्ही त्यातील एक शिक्का घेऊन बसाल, तर एक महिना रोज रात्री, त्या शिक्क्यावर प्रचार करु शकाल, आणि तरीही त्याला स्पर्श करु शकणार नाही, समजले, केवळ त्यांतील एकावर तुम्हाला इतका वेळ लागेल आणि अशा—अशा प्रकारे तेथे पुष्कळ आहे. परंतु, आपण ह्याच्या केवळ मुख्य गोष्टीच घेतो, तर तुम्ही—तुम्ही पाहू शकाल की हे सर्व कशाविषयी आहे.

57 आता, जसे तेल पवित्र आत्म्याला दर्शविते. मग आम्ही पाहतो की तेल आणि द्राक्षारस उपासनेशी संबंधीत आहे, पहा, नेहमीच उपासनेशी संबंधीत आहे.

58 आणि द्राक्षारस, मी म्हणालो, तो माझ्याकडे आला, तो द्राक्षारस सामर्थ्य दर्शवितो ते प्रकटीकरणाद्वारे उत्तेजना देणारे सामर्थ्य होते. समजले? आणि जेव्हा काहीतरी प्रकट केले जाते तेव्हा ते सामर्थ्य मिळते. ते विश्वासणाऱ्याला उत्तेजना देते, कारण ते प्रकटीकरणाद्वारे दिले जाते. समजले? ते असे काहीतरी जे देवाने सांगितले आहे. ते एक रहस्य आहे; ते त्यांना समजू शकत नाही, समजले. आणि, काही वेळाने, देव खाली येतो आणि ते प्रकट करतो, आणि मग ते सिध्द करतो.

59 लक्षात ठेवा, जर सत्य प्रकट केले जाते. तर ते सत्य साबितही केले जाते. देव सातत्याने असेच करीत असतो, तो व्यक्ति कितीही हुशार का असेना, तो बुध्दीने कितीही तल्ल्ख का असेना; जर तो जे काही सांगतो त्यास देव जर आधार देत नसेल, तर तेथे काहीतरी चुकीचे आहे. समजले? बरोबर आहे. कारण, ते वचन आहे.

60 आता, जेव्हा मोशे परमेश्वराच्या प्रेरणेखाली तेथे बाहेर गेला, म्हणाला, “माशा येवो.” माशा आल्या. म्हणाला, “बेडूक येवोत.” बेडूक आले.

61 पाहा, जर त्याने सांगितले असते, “माशा येवो,” आणि त्या आल्या नाहीत? तर काय झाले असते. पाहा, मग त्याने—त्याने प्रभूचा शब्द बोलला नाही, समजले, तो फक्त बोलला, तो त्याचे स्वतःचे शब्द बोलला. त्याने विचार केला असता की तेथे माशा असायला हव्या होत्या. परंतु, तेथे—तेथे एकही माशी आली नाही, कारण देवाने त्याला तसे सांगितले नव्हते.

62 आणि जेव्हा देव तुम्हाला काही सांगतो, आणि म्हणतो, “तू जा *हे* कर, आणि तर ते योग्य असेल, कारण हा माझा शब्द आहे,” आणि तो ते बायबलमध्ये दाखवितो, मग देव त्याच्या मागे उभा राहतो. आणि जर ते बायबलमध्ये लिहीलेले नाही, देव तरीही त्याच्या पाठीशी उभा राहतो, जर ते देवाचे वचन आहे. समजले?

63 आणि मग जर ते त्या बाहेरचे असेल, तर ते संदेष्ट्यांना प्रकट केले आहे. आपल्याला समजते की देवाची सर्व गूजे संदेष्ट्यांना प्रकट केलेली आहेत, आणि फक्त त्यांनाच. आमोस 3:7 पाहा.

64 आता, प्रकटीकरणाचे सामर्थ्य विश्वासणाऱ्यास उत्तेजना देते. कारण द्राक्षारसाचे सामर्थ्य, नैसर्गिक द्राक्षारस उत्तेजीत करण्यासाठी आहे. समजले? तो त्या व्यक्तिस, जो सर्वस्वी कमी झालेला आहे, त्यास उत्तेजना आणण्यासाठी आहे, समजले? समजले? तर, मग, आता वचनाच्या प्रकटीकरणात सामर्थ्य आहे, जे विश्वासणाऱ्यास आनंदाची उत्तेजना, समाधानाची उत्तेजना देते, जी उत्तेजना जी शाबित झालेली आहे, सिध्द झालेली आहे.

65 वचनात तिला “नवा द्राक्षारस” असे म्हटले आहे. आपल्याला त्याचा संदर्भ पाहायचा आहे. आपण नेहमी त्याचा संदर्भ देतो की, “हे नव्या द्राक्षारसाने मस्त झाले आहेत.” समजले? ठीक आहे, किंवा “आध्यात्मिक द्राक्षारस,” मला वाटते हे योग्य भाषांतर होईल. “ते आध्यात्मिक द्राक्षारस होईल.” जसे नैसर्गिक द्राक्षारस स्वतः त्याच्या उत्तेजनावर सामर्थ्य प्रकट करतो, तसेच नवा द्राक्षारस, कारण तो देवाचे वचन प्रकट करतो, जो आत्मा आहे. ओह! आता...हा...पहा, वचन हा स्वत: आत्मा आहे. तुम्ही ते विश्वास करता काय? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]

66 आपण ते वाचूया. आपण वाचूया, संत योहान 6...तेव्हा तुम्ही—तेव्हा तुम्ही—तुम्ही म्हणणार नाही, “ठीक, आता, कोणीतरी ते म्हटले,” आपण—आपण पाहूया ते कोण म्हणाले, आणि तेव्हा आपल्याला कळेल ते सत्य आहे की नाही. संत योहान, 6 वा अध्याय. आणि 6 वा अध्याय, आणि मला वाटते...63 वे वचन, ठीक आहे, मला वाटते हे तेच आहे. होय.

> *आत्मा हा जीवंत करणारा आहे, देहापासून काही लाभ नाही, मी जी वचने तुम्हाला सांगितली आहेत, ती आत्मा व जीवन अशी आहेत.*

67 वचन स्वतः आत्मा आहे. तो आत्मा वचनाच्या स्वरुपात आहे. आणि तेव्हा, तुम्ही समजता, जेव्हा तो जीवंत करतो, किंवा जीवनाकडे आणतो, वचनाचा आत्मा कार्य करण्यास जातो आणि कार्य करतो. समजले? कारण...

68 आता येथे पाहा. एक विचार तो प्रकट होण्याआधी विचारच असला पाहीजे. आणि जेव्हा तो विचार सादर केला जातो, तो शब्द आहे. आता, *हा* देवाचा विचार आहे जो त्याने वचनात ठेवला आहे. आणि तेव्हा जेव्हा आपल्याला तो त्याच्याकडून प्राप्त होतो. ते वचन बनते.

69 देवाने मोशेला काय करायचे ते प्रकट केले. मोशे ते बोलला, आणि तसे घडले. समजले? तेच ते आहे, जेव्हा ते खरोखरीच देवापासून येते.

70 आणि आपण पाहीले की—की तो—तो उत्तेजना देतो आणि तो आनंद देतो, कारण ते देवाचे वचन आहे. आणि नवा द्राक्षारस, नवा द्राक्षारस उत्तेजना देतो...जेव्हा तो वचन प्रकट करतो. तेव्हा, कधी–कधी अमाप आनंद आणतो. आपण त्यांतून गेलो, की तो असा आनंद आणतो की तुम्ही ओथंबून भरले जाता.

71 आता, मला माहीत आहे तेथे खूप फाजील उत्साह आहे, आणि लोक तो चालवीत आहे. मला ठाऊक आहे कधी कधी ते तसे करतात जेव्हा संगीत वाजते ते वर खाली उड्या मारतात आणि सर्वगोष्टी. आणि मला माहीत आहे असे चालते. आणि मी—मी त्यावर विश्वास सुध्दा करतो. परंतु मी लोकांना दिवसा पाहीले आहे जेव्हा, जोपर्यंत संगीत चालू आहे, ते सर्वजण उड्या मारीत होते आणि किंचाळत होते; परंतु जेव्हा संगीत थांबते ते बंद होते, समजले? मी विश्वास करतो...अच्छा, ते ठीक आहे, जोपर्यंत मला वाटते की लोक व्यवस्थितरित्या जगतात, तुम्हाला समजले. आणि...

72 परंतु, आता, काय, तुम्ही वचन आणण्यास सुरुवात केली! तीच गोष्ट आहे जी वास्तवात जीवन आणते, ते वचन आहे, आणि ते नव्या द्राक्षारसाच्या उत्तेजनाचा, आनंद आणते समजले? होय. आणि तेच पेंटेकॉस्टच्या दिवशी होते, जेव्हा वचन प्रकट केले गेले.

73 आता, पाहा. आता, येशूने त्यांना म्हटले, लूक 24:29 मध्ये, "पाहा, माझ्या पित्याने देऊ केलेली देणगी मी तुम्हाकडे पाठवीतो; परंतु तुम्ही यरुशलेमेत जा आणि ती मिळेपर्यंत थांबा." पित्याचे अभिवचन काय होते? योएल 2:28, कारण आपण पाहतो की तो त्याच्या "आत्म्याचा वर्षाव करणार आहे." यशया 28:19 तेथे कशा "तोतरे ओठ, आणि परकीय भाषा असतील," आणि अशा सर्व गोष्टी होतील.

74 ते तेथे वर गेले. आणि जसे आपण त्याचे अध्ययन केले, कदाचित एक जण म्हणाला असेल, "ठीक, मला वाटते आपण खूप वेळ थांबलो. आपण हे फक्त विश्वासाद्वारे स्विकारुया." तो एक चांगला बाप्टिस्ट सिध्दांत होता., परंतु त्याने ह्या भावांमध्ये कार्य केले नाही.

75 तर मग, प्रथम गोष्ट तुम्हाला माहीत आहे, ही गोष्ट वास्तवात घडली पाहीजे. आणि ते त्यांच्या सेवकाईसाठी वचन प्रकट होण्यासाठी थांबले. आणि जेव्हा तुम्ही पवित्र आत्मा मिळविण्यासाठी येता, तुम्ही तसेच करता.

76 होय, तुम्ही विश्वासाद्वारे त्याचा स्विकार करु शकता. तुम्हाला ख्रिस्ताला विश्वासाद्वारेच स्विकारले पाहीजे. ते अगदी बरोबर आहे. आणि तुम्ही पवित्र आत्म्याचा स्विकार विश्वासाद्वारे करता, परंतु तेव्हा पवित्र आत्मा येऊ दे. आणि सुंता करु दे, एक साक्ष म्हणून की त्याने तुमच्या विश्वासाचा स्विकार केला आहे, तुम्हाला समजले.मग पाहा, "अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला, आणि ते त्याला नितीमत्व असे गणण्यात

आले.” परंतु देवाने त्याला सुंतेची खुण दिली, एक खात्री म्हणून की त्याने त्याचा विश्वासाचा स्विकार केला आहे.

77 तीच गोष्ट आपण केली पाहीजे. आपण पवित्र आत्म्याची वाट पाहिली पाहिजे, जोपर्यंत तो काहितरी करीत नाही, ह्यासाठी नाही की आपण निरनिराळ्या भाषांत बोललो, आपण नाचलो किंवा आपण भावनिक झालो, आपण किंचाळतो जोपर्यंत आपण बदलले गेलो नाही, जोपर्यंत काहीतरी वास्तवात घडत नाही! मला माहीत नाही तो कोणत्या रुपात येतो. फक्त ते तसे घडले, हीच महत्त्वाची गोष्ट आहे. समजले?

78 आणि मी विश्वास करतो की अन्य भाषा बोलणे आणि सर्व अशा इतर गोष्टी ठीक आहेत, परंतु फक्त त्याद्वारे चालणार नाही, आणि तुम्हाला माहीत आहे तसे चालणार नाही. म्हणून, ते तसे चालणार नाही.

79 मी पाहीले आहे, जादुगरणी निरनिराळ्या भाषा बोलतात; आणि आत्म्यात नाचतात. निश्चितच, पेन्सिल खाली ठेवतात आणि अज्ञात भाषांत लिहीतात. आणि कोणीतरी त्याचा अनुवाद करतात, ते ठीक आहे, आणि खरे बोलतात. ते बरोबर आहे. जे घडले आहे, ते तंतोतंत लिहीतात, आणि ते अगदी तशाचप्रकारे घडलेले असते. पाहा ते त्यांच्या डोक्यात धूळ टाकतात, आणि त्यांना स्वतःला चाकूने कापतात, आणि स्वतःला जंगली पशूच्या रक्ताने किंवा आणखी कशाने आच्छादतात, आणि—आणि सैतानाला बोलावतात, पहा ते असे करतात...

80 निरनिराळ्या भाषा बोलण्याने ते करीत नाहीत. “जरी मी माणसांच्या व देवदूतांच्या भाषांमध्ये बोलत असलो, पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मला काही लाभ नाही, पहा, जरी मी ते करु शकलो!” समजले? म्हणून त्या गोष्टींचा असा अर्थ नाही की तुमच्याकडे पवित्र आत्मा आहे.

81 परंतु जेव्हा तो, एक व्यक्ति, ख्रिस्ताचा अविनाशी आत्मा तुझा व्यक्तिगत तारणारा बनतो, आणि तुला बदलतो, आणि तुमची मते थेट कलवरीवर टाकतो, आणि ह्या वचनाकडे वळवतो, तर काहींना काही तरी घडते. होय, महाशय, काहीतरी घडले आहे. ह्याविषयी तुम्हास कोणास सांगावे लागणार नाही. तुम्हाला ते कळेल जेव्हा ते घडेल...

82 आणि तो नवा द्राक्षारस, जेव्हा प्रकटीकरण आणतो, तेव्हा ते—ते प्रकट केले जाते.

83 आणि ते तशाच प्रकारे पेंटेकॉस्टच्यावेळी होते त्यांना माहीत होते की—की त्यांच्यावर आत्म्याचा वर्षाव होणार आहे, आणि त्यांनी हे घडेपर्यंत वाट पाहिली. आणि जेव्हा प्रकटीकरण शाबित झाले, तेव्हा त्यांच्यात उत्तेजना आली. निश्चितच त्यांनी तसे केले. ते प्रेरणेने ओत—प्रोत झाले. ते घाबरलेले होते, आणि दारे बंद करुन होते, ते, थेट रस्त्यावर बाहेर आले आणि जे लोकांच्या समुहास घाबरले होते, ते बाहेर रस्त्यावर त्यांना सुवार्ता प्रचार करु लागले! ते बरोबर आहे. समजले? काहीतरी घडले होते, कारण सत्य वचनाचे अभिवचन प्रकट झाले होते.

84 आता, आपण मिनिटासाठी येथे थांबूया. जर ह्याने त्या लोकांमध्ये इतकी निश्चितता आणली की ते—ते...जवळजवळ त्यांच्यातील प्रत्येकजणाने त्यांच्या साक्ष त्यांच्या रक्ताने मोहरबंद केली. त्यांना ह्याची काही पर्वा नव्हती, जोपर्यंत ते जगले, त्यांनी कधीच ते नाकारले नाही. ते तेथे राहीले, कारण ते प्रकट झालेले अभिवचनाचे सत्य वचन होते. प्रकटीकरण प्रकट झाले होते. त्यांच्या स्वतःच्या रक्ताने त्यांची साक्ष मोहरबंद करुन ते मृत पावले.

85 आता अंतिम दिवसांच्या अभिवचनाकडे पाहा. आणि येथे आपण पाहतो की ते आपल्यासमोर प्रकट झाले, वर्तमानकाळात पवित्र आत्म्याचे येणे आणि त्याची कृत्ये जो तो करणार होता, आणि आपणास ती आपल्यामध्ये मिळतात, समजले? ओह…माझ्या प्रभू! आपण कसे ऐकू शकतो? काहीतरी घडते, मित्रा, मी तुम्हास सांगतो! जेव्हा खरा, सत्य, प्रामाणिक, पूर्वनियोजीत विश्वासणारा, जेव्हा तो प्रकाश त्या बीजावर पडतो, काहीतरी नविन जीवन त्यांतून पुढे येते. ती विहरीजवळील सामान्य स्त्री!

86 जेव्हा, त्या शिक्षित धर्मगुरुला सांगितले, “अच्छा, तो सैतान आहे. तो ज्योतिष आहे. तो—तो फक्त त्या लोकांना त्यांचे भविष्य सांगतो आणि तो—तो सैतान आहे.”

87 परंतु जेव्हा ती स्त्री त्या पूर्वनियोजीत बीजासहीत! आता तुम्हाला वाटते ते बरोबर नाही? परंतु येशू म्हणाला, “पित्याने त्याच्याकडे आकर्षिल्याशिवाय कोणीही मनुष्य येऊ शकत नाही; आणि जे सर्व पित्याने मला दिले आहे ते येतील.” आणि…

88 आणि शेवटल्या दिवसात, तो ख्रिस्तविरोधी सक्षम होईल…तो ख्रिस्तविरोधी आत्मा ज्याचा संप्रदायामध्ये आपण अभ्यास करीत आहोत, आणि सिध्द केले आहे की संप्रदायवाद हा ख्रिस्तविरोधी आहे. आता, कोणी मनुष्य अशाप्रकारे दूर पलिकडे जातो, तो अजूनही विश्वास करतो की संप्रदाय प्रणाली ही ख्रिस्तविरोधी नाही, तेथे काहीतरी चुकीचे आहे. जेव्हा हे पूर्णपणे इतिहासामधून, प्रत्येक गोष्टीवरुन, परमेश्वराच्या बायबलमधून आणि इतर सर्व गोष्टींनी हे सिध्द झाले आहे. की, ते ख्रिस्तविरोधी आहे. आणि रोम त्याचे मुख्य कार्यालय आहे. आणि मुली मंडळ्या त्याचे अनुकरण करीत आहेत. आणि त्या दोघांनाही नरकात टाकले जाते. ते बरोबर आहे. म्हणून आपण ख्रिस्तविरोधी, त्याचा आत्मा पाहत आहोत.

89 आणि हा दिवस ज्यात आपण राहत आहोत, आणि का, “तो अवर्णनीय आनंद व महिमेने भरलेला” का आणू नये. जेव्हा ते त्या साधारण वृध्द स्त्रीवर पडले, ओ बापरे! त्या बीजांतून जीवन पुढे आले!

90 आता, लक्ष द्या, बायबल सांगते, की अंतिम दिवसात, हा ख्रिस्तविरोधी “संपूर्ण जगाला ठकविले.”

91 केवळ थोडेसे लोक आहेत, ज्यांची नावे जगाच्या स्थापनेअगोदर कोंकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीली आहेत. आणि जेव्हा परमेश्वराच्या वचनाचे खरे प्रकटीकरण त्या हृदयावर पडते, तेव्हा तो पाणी शिंपडील, आणि त्याच्यातून बाहेर पवित्र आत्मा त्याच्याने होईल तितक्या जोराने पडेल. आणि तुम्ही ते करण्यापासून त्याला थांबवू शकत नाही, कारण नविन जीवन त्याच्यातून कार्य करते.

92 फार काळ झाला नाही, मी एका व्यक्तीशी बोलत होतो. तो माझ्याशी चर्चा करण्याचा प्रयत्न करीत होता आणि म्हणत होता, “तुम्हाला असे सांगण्यात लाज वाटत नाही की, ‘परमेश्वराने आकाश आणि पृथ्वी तीन दिवसात…किंवा सहा दिवसात निर्माण केली’?”

मी म्हणालो, “बायबल तेच सांगते.”

93 म्हणाला, “अच्छा, आमच्याकडे पुरावा आहे आणि सिध्द करु शकतो जग दशलक्ष वर्षे जुने आहे.”

94 मी म्हणालो, “त्याच्याशी त्याचे काहीही कर्तव्य नाही. उत्पत्ती 1:1 मध्ये म्हटले आहे, ‘प्रारंभी देवाने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली.’ समयाविषयी काहीच उल्लेख नाही! तेच सर्व आहे. समजले. ‘आता, पृथ्वी आकारविरहीत व शून्य होती.’” आणि मी म्हणतो, “माझा विश्वास आहे की, तेथे प्रत्येक बीज कोणा दुसऱ्य संस्कृतीचे किंवा दुसरे

त्या जागेत पडलेले होते आणि जसे पाणी वर उचलले गेले, आणि प्रकाश त्यावर पडला, तसे झाडे आणि सर्वकाही वर आले."

95 आणि तीच गोष्ट मनुष्यजातीबरोबर दर्शकामध्ये आहे. जेव्हा सर्व धूके दूर होते, आणि उलगडलेले सत्य तेथे पडलेल्या खऱ्या बीजावर प्रकट केले जाते, जे अजून अंकुरित व्हायचे आहे, आणि सुवार्तेचा प्रकाश प्रकट केलेल्या सत्य वचनाद्वारे त्यावर पडतो, त्यामध्ये जीवन राहील. त्यामध्ये त्याला जीवन मिळते, ते विश्वास करील. त्याच्याबाहेर, ते जगू शकत नाही, त्यांच्यामध्ये जीवनच राहत नाही.

96 ज्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनी पुस्तकात जगाच्या स्थापनेअगोदर घातली होती, ते निश्चितच दृश्यात येतील. आणि म्हणूनच येशू तेथे बसला आहे आणि शेवटचे बीज येईपर्यंत त्याचे मध्यस्थीचे कार्य करीत वाट पाहत आहे. आणि त्याला बरोबर माहीत आहे ते केव्हा येईल.

97 जसे डॉ. ली. वायल...मला वाटते ते अजूनही कुठेतरी सभेत आहेत. मी खुप दिवसापासून त्यांना पाहीले नाही. मला वाटत नाही की मी त्यांना पाहिले आहे. [एक भाऊ म्हणतो, "तो येथे आहे."—सम्पा.] तो येथे आहे. ठीक आहे. कोणा एके दिवशी त्यांनी माझ्याकडे ही चिठ्ठी पाठवली होती, ज्यात इरेनियसने काय सांगितले ते लिहीले होते. ठीक, मी खूप अभ्यासानंतर, इरेनियसला त्या काळाचा दूत मानले, ज्यात तो होता. परंतु त्याने म्हटले, "जेव्हा त्या शरीराचा शेवटचा सदस्य आत येईल," ह्या अंतिम समयात, "त्या समयी ह्या गोष्टी प्रकट केल्या जातील किंवा केले पाहीजे." आणि येथे असेच आहे. हे अगदी बरोबर आहे समजले? आपण त्या दिवसात आहोत. हे खरे आहे.

98 तेव्हा पेंटेकॉस्टल आनंद अवर्णनीय आहे. ते खरोखरीच उत्तेजनेने प्रेरित झाले होते. मला वाटते, की कोणालाही ते उत्तेजीत करील.

99 आपण फक्त काही क्षण घेऊया. आपण दाविदाविषयी विचार करुया. त्याला—त्याला ही सर्व प्रेरणा मिळाली होती. तो म्हणाला, "माझा प्याला भरुन वाहत आहे." मी विश्वास करतो की त्याच्या जीवनात तो खरोखरीच एक—एक महान समय होता. काय, तसे करण्यास त्याला कशाने भाग पाडले? जेव्हा तो आत्म्यात होता...कारण तो एक संदेष्टा होता. आपल्याला माहीत आहे, तो होता. बायबल तसे सांगते. दाविद संदेष्टा, आता, कारण तो एक संदेष्टा होता आणि तो आत्म्यात होता; आणि त्याने पुनरुत्थान पाहीले. जर तुम्हाला ते वाचण्यास आवडेल तर तो स्तोत्रसंहीता 16:8 ते 11 मध्ये आहे. तो म्हणाला, "म्हणून माझे हृदय आनंदीत झाले आहे, माझा देहही सुरक्षित राहतो, कारण तू माझा जीव अधोलोकात राहू देणार नाहीस; तू आपल्या भक्तास कुजण्याचा अनुभव येऊ देणार नाहीस." आणि मी तुम्हाला सांगतो, त्याचा प्याला भरुन वाहत आहे; कारण त्याने ते पाहीले आहे. त्याला माहीत आहे ते काय होते; ओह त्याने पुनरुत्थान बघितले, आणि तो खरोखरीच...त्याचा प्याला भरुन वाहत होता.

100 पुन्हा, दुसरे शमुवेलाचे पुस्तक, दाविदाकडे दुसरा भरुन वाहणारा प्याला होता. (हे लिहीण्याकरिता तुम्ही पेन्सिल बाहेर काढली. ओह!) दुसरे शमुवेल 6:14. तेथे त्यावेळी दुष्काळ होता.

101 शत्रूंनी परमेश्वराचा कोश घेतला होता. शत्रू आले होते आणि त्यांनी परमेश्वराचा कोश घेतला होता, आणि ते तो खाली घेऊन गेले आणि दागोनांपुढे ठेवला होता, आणि दागोन त्याच्यासमोर तोंडघशी पडला. आणि तो कोश दुसऱ्या शहरात नेला, आणि त्यांच्यावर पीडा आल्या...ते आजतागायत आलेल्यात सर्वात भयंकर संकट त्यांच्या

हातांवर आले होते. आणि त्यांची त्यापासून सुटका होऊ शकली नाही, कारण कोश त्याच्या स्थानाबाहेर होता.

102 आता, जेव्हा त्यांनी कोश बैलगाडीवर ठेवला, आणि ते परत जाऊ लागले. आणि जेव्हा दाविदाने कोश येताना पाहीले, तुम्हाला माहीत आहे त्याने काय केले? तो—तो इतका प्रेरणेने पूर्ण झाला, आणि त्याचा प्याला भरुन वाहू लागला; ती उत्तेजना! जेव्हा त्याने पाहीले वचन पन्हा इस्त्राएलास प्रकट होत आहे, तो आत्म्यात नाचू लागला. गोल, गोल, गोल, गोल, अशा प्रकारे होय. त्याचा प्याला भरुन वाहत होता. तुम्हाला समजले. का? त्याने वचन परत येताना पाहीले,

103 आणि मला वाटते की कोणालाही थोडीशी प्रेरणा मिळेल जेव्हा लोक हे पाहतात, की इतक्या वर्षानंतर; आणि तेव्हा सत्य वचन, ज्याविषयी अभिवचन दिले होते, ते पुढे आणताना आणि प्रकट होताना पाहीले. काय समय आहे! काय समय आहे!

104 आता आपण वाचूया. जर मी—मी ह्याविषयीच बोलत बसलो, मला ह्या विषयाकडे जाता येणार नाही, आणि मला तुम्हा सर्वांना साडे–दहा पर्यंत थांबवावे लागणार आहे. मी मागील रात्री तुम्हाला लवकर सोडले, म्हणून आज रात्री मी तुम्हाला जास्त वेळ थांबविणार आहे. [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा] होय. होय. नाही, मी फक्त फक्त तुम्हाला चिडवले. समजले? आम्हा…आम्हाला फक्त तेच पाहीजे जसे प्रभू आम्हाला चालविल. आता.

> *त्याने चौथा शिक्का फोडला, तोव्हा चौथा प्राणी, ये, असे म्हणाला, ते मी… ऐकले.*

105 आता, "जेव्हा कोकऱ्याने चौथा शिक्का उघडला." आता तेथे आपण थांबूया. आता, चौथा शिक्का, तो कोणी उघडला? कोकऱ्याने. दुसरे कोणी समर्थ होते का? दुसरे कोणीही ते करु शकला नसता. कोकऱ्याने चौथा शिक्का उघडला.

106 आणि तो—तो चौथा प्राणी, एक प्राणी जो गरुडासारखा, योहानास म्हणाला, "ये, मुक्तीच्या योजनेचे चौथे रहस्य पाहा, जे ह्या पुस्तकात लपलेले आहे." कारण तो कोकरा ते उघडीत होता. दुसऱ्य, शब्दात तेच काय तो सांगत होता. "तेथे चौथे रहस्य आहे. मी तुम्हाला चिन्हात ते दाखवले आहे. आता, योहान, मला ठाऊक नाही. तुला समजले किंवा नाही." परंतु, त्याने जे पाहीले ते लिहीले, परंतु ते एक रहस्य होते. म्हणून, त्याने ते लिहीले जे त्याने पाहीले.

107 कोकरा ते शिक्के फोडीत होता आणि परमेश्वर अजूनही ते प्रकट करणार नव्हता. ते अंतिम दिवसासाठी ठेवले होते. समजले? आता, आपल्याकडे चिन्हे होती, आणि आपण त्याविषयी चौकशी केली, आणि कधी चांगलेही केले आहे. परंतु, आम्हाला माहीत आहे की असेच चालत आहे. परंतु, आता, ह्या अंतिम दिवसात, आपण मागे पाहू शकतो आणि पाहू की हे कोठे घडले. आणि असे अंतिम मंडळीच्या युगात स्वर्गरोहण होण्याआधी, हे असे घडणार आहे.

108 मला हे ठाऊक नाही की हे कसे होऊ शकते, की मंडळी महासंकटाच्या काळांतून जाईल. परंतु जेव्हा मंडळीवर पाप नाही, तर ती कशासाठी महासंकटातून जाईल? माझे तात्पर्य…माझे तात्पर्य संपूर्ण मंडळी नाही; मंडळीला महासंकटातून जावे लागेल. परंतु मी वधूविषयी बोलत आहे. वधू, नाही, वधूवर तिच्या विरुध्द बिलकुल पाप नाही. त्याचे पापमोचन झालेले आहे, आणि…त्याचा गंधही येत नाही, आणि काही अवशेष उरला नाही. ती देवासमोर परिपूर्ण आहे. म्हणून त्यांच्या शुध्दीकरणासाठी कोणते महासंकट

असू शकते? परंतु दुसऱ्यांसाठी महासंकट आहे. मंडळ्या महासंकटातून जात आहेत, परंतु वधू नाही.

109 आता, आपण थोडस सर्वप्रकारच्या चिन्हांतून पाहिले. जसे मंडळी नोहाची प्रतिछाया आहे, जो पापांतून गेला. पाहा, आता ते महासंकटातून गेले. परंतु, हनोख प्रथम गेला, जो संताचे प्रतीक होता, जे महासंकटाच्या काळाच्या अगोदर जातील.

आता, आपण पाहिले, ह्या कोकऱ्यने शिक्के उघडले.

110 आता, जर तुम्ही पाहीले, आपण पाहतो की पहिला प्राणी...पहिला प्राणी एक सिंह होता, एक जीवंत प्राणी आहे. आपण ते मंडळीच्या युगांच्या पुस्तकात...पाहीले. आणि नंतर दुसरा प्राणी, मला वाटते की तो बैलाचा चेहरा होता, किंवा वासराचा होता. आणि तिसरा प्राणी मनुष्याचा चेहरा होता. परंतु चौथा प्राणी गरुडाचा चेहरा होता. आता, बिलकुल असेच आपण त्यांना पाहीले, बिलकुल अशाच क्रमाने पाहीले, आणि बिलकुल अशा प्रकारे येथे पुस्तकात त्यांची मांडणी केलेली आहे.

111 आणि नंतर एक महान शिक्षक, एकदा फ्लोरिडा येथे, शिकवताना म्हणाला की, "प्रेषितांचे पुस्तक हे मंडळीसाठी—साठी केवळ एक—एक बांधकामाचे कार्य आहे. मंडळी ही चार शुभवर्तमानामध्ये आढळते."

112 आणि आम्ही ह्याच्या अगदी विरुध्द पाहीले, की ते चार शुभवर्तमान प्रेषितांची कृत्ये पुस्तकाचे रक्षण करतात. त्या चार शुभवर्तमानामधून प्रेषितांच्या कृत्यांचे पुस्तक लिहीले आहे, पवित्र आत्म्याची कृत्ये प्रेषितांमध्ये. आणि आपण त्या पुस्तकात पाहीले, की ते रक्षक, पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिणेस बसून तेथे पाहात होते. तुम्हाला माहीत आहे की आपण येथे त्याचे चित्रण कसे केले होते? आणि किती सुंदररितीने आणि तंतोतंत सर्व गोष्टीने लक्ष्य दर्शविले होते!

113 आता, मला वाटते की, तुम्ही लक्ष द्यावे. म्हणाला, "ये आणि पाहा." योहान... आता ह्या अगोदर माझी इच्छा आहे की तुम्ही पुन्हा लक्ष द्यावे. आता, हा येथे शेवटचा घोडेस्वार आहे, जो ख्रिस्तविरोधकाचे कार्य प्रकट करण्यासाठी आहे.

उद्या रात्री, आपण वेदीखालील आत्मे ह्याविषयी पाहूया.

पुढील रात्री, न्यायाविषयी पाहुया.

114 पुढील रात्री आपण युगाचा अंत, समयाचा—चा अंत, सर्व गोष्टींचा अंत पाहुया, पहा, जेव्हा वधू वर घेतलेली आहे. म्हणून तेथे सातव्या शिक्क्यात पीडा आणि सर्व इतर गोष्टी ओतल्या जातात. त्या काय आहेत, मला ते ठाऊक नाही.

115 लक्ष द्या, परंतु आता, येथे, आपण पहातो हा व्यक्ति येथे एक गरुड आहे, हा मनुष्य... किंवा हा जीवंत प्राणी जो चौथा आहे. किंवा, दुसऱ्या शब्दांत, तेथे त्यांची चार वेगळी युगे आहेत. तेथे सिंहाचे युग होते, आणि आपण पहातो, हे चौथे युग आहे.

116 आणि तो म्हणाला, "ये आणि मुक्तीच्या पुस्तकाचे चौथे रहस्य बघ, जे ह्या पुस्तकात लपलेले आहे. ये, बघ." आणि योहान पाहण्यासाठी गेला, आणि त्याने एक फिकट रंगाचा घोडा पाहिला. आणि, पुन्हा, तोच स्वार ह्या फिकट रंगाच्या घोड्यावर होता.

117 आता त्याचे नाव मृत्यु होते. आता लक्ष द्या. दुसरा कुठलाही स्वार नाही, दुसरा कोणताही घोडा नाही, किंवा कुठलाही समय नव्हता. घोडेस्वार त्यांच्याकडे नव्हता की त्या मनुष्याचे नाव नव्हते. परंतु आता त्याला मृत्यु म्हटले आहे. त्याचा उल्लेख केलेला नाही. समजले? तो आता प्रकट झाला आहे. तो काय आहे, तो मृत्यु आहे.

118 ओह, आपण कसे संदेशासाठी त्यावर थांबू शकतो, आणि कसे त्यास अधिक स्पष्ट करु शकतो! परंतु कुठलीही गोष्ट जी विरुध्द आहे, जी सत्याविरुध्द आहे, ती मृत्यु असली पाहीजे. कारण तेथे फक्त दोनच विषय आहेत, ते आहे जीवन आणि मृत्यु. ते सिध्द करते की ह्याचे ह्या दिवसात पवित्र आत्म्याचे प्रकटीकरण हेच अगदी सत्य आहे. तो विरोधी आहे, तो मृत्यु आहे. कारण नंतर आपण येथे पाहणार आहोत की वचनच जीवन आहे. समजले?

119 आणि ह्या मनुष्याला मृत्यु म्हटले आहे. आता ह्या स्वाराला दुसऱ्या समयात असे म्हटले गेले नव्हते. परंतु, आता तसे म्हटले आहे, की त्याला मृत्यु म्हटले आहे.

120 परंतु सिंहाच्या प्रकटीकरणाखाली...आता लक्ष द्या. आता मी हे लक्षपूर्वक वाचू पाहातो, की मी सुनिश्चित असावे, मी ते लिहीलेले आहे, येथे उभा आहे. सिंहाच्या काळात किंवा पहिल्या युगात, प्रारंभीच्या काळात हे प्रकट झाले नव्हते. नंतरचे युग बैलाचे युग होते जे ते अंधकाराचे युग होते, मधले युग, ते काय होते ते प्रकट झाले नव्हते. ते मनुष्यासारख्या प्राण्यास, बुध्दीच्या युगात जे ल्युथर आणि वेस्ली आणि इतर सुधारकांना दर्शवित होते, ह्या युगातही प्रकट झाले नव्हते. परंतु गरुडाच्या युगात, शेवटच्या युगात, संदेष्ट्याच्या युगात, जेथे संदेष्ट्याची वाणी उदयास येणार आहे, समजले ज्याच्याकडे रहस्य नेहमी येतात. आता तेथे जेथे आम्ही फक्त...

121 आज रात्री आपण ह्याच विषयावर राहणार आहोत, ह्यासाठी की तुम्हाला व्यवस्थितरित्या हे समजेल. आता, बहुतेक वेळा, तुम्हाला समजते...मी ह्या समुहाशी येथे बोलत नाही. ह्या टेप्स सर्वत्र जातात, पहा, आणि मी हे स्पष्ट केले पाहीजे. कारण काही जणांना फक्त एक टेप मिळेल. आणि, मग, जर त्यांना त्यांच्यातील इतर मिळाल्या नाही, ते अडकून राहतील समजले. परमेश्वराने हे अभिवचन ह्या अंतिम दिवसासाठी दिले आहे की ह्या सर्व भिन्न गोष्टी ज्या चालत आल्या आहेत आणि ज्यांत भेसळ झाली आहे, त्या स्पष्ट केल्या जातील. आम्ही...

122 आपल्याकडे एलीयाचे वस्त्र होते. आपल्याकडे एलियाचा झगा होता. ओह, असे लोक होते. ज्यांनी...जॉन अलेक्झांडर डॉवी यास तेथे झग्यामध्ये गुंडाळून गाडले आहे. तो म्हणत असे तो अलीशा होता. आणि आपल्याकडे अशाप्रकारच्या सर्व गोष्टी आहेत. काहीही असो, त्या काय आहेत? त्या केवळ प्रकट होणारे सत्य नष्ट करण्यासाठी असतात. समजले? ख्रिस्त येण्याअगोदर त्यांच्याकडे खोटे ख्रिस्त होते. समजले? त्यांनी सदैव तसे केले आहे. तो सैतान आहे, जो लोकांची मने आणि विश्वास विचलित करण्यासाठी कुठली घटना वास्तवात घडण्यासाठी त्याची नक्कल करतो. तेच सर्व आहे.

123 हीच गोष्ट गमेलिएलने यहुद्यास त्या दिवसात सांगितली नव्हती काय? त्याने म्हटले, “तेथे एक मनुष्य उभा राहीला होता का आणि तो ख्रिस्त असल्याचा आव आणित नव्हता का? आणि त्यांनी चारशे जण रानात नेले. ते नाश पावले आणि असेच पुढे.”

124 येशूने म्हटले, “प्रत्येक झाड जे माझ्या स्वर्गीय पित्याने लावले नाही, ते मुळापासून उपटले जाईल.”

125 गमेलियेल म्हणाला, “ह्या माणसांपासून दूर राहा व त्यांना जाऊ द्या; कारण हा बेत किंवा हे कार्य देवाचे नसल्यास नष्ट होईल? परंतु ते देवाचे असल्यास तुम्हाला ते नष्ट करिता यावयाचे नाही, तुम्ही मात्र देवाचे विरोधी ठराल.” त्या मनुष्याने ज्ञानाचा उपयोग केला. तो एक शिक्षक होता.

126 आता लक्ष द्या. ही सर्व गुजे प्रकट करण्यासाठी, देवाने अभिवचन दिले होते की तेथे एक वास्तवात अलीशा उभा राहीला. कोणी मनुष्य त्या आत्म्याने अभिषेक केलेला,

आणि तो ते प्रकट करील. त्याने ह्याचे मलाखी 4 मध्ये अभिवचन दिले आणि माझ्याकडे काही व्यक्तिंच्या चिठ्ठ्या आणि पत्रे आहेत जे म्हणतात की ते तसे नाही, परंतु मला त्या व्यक्तिशी बोलण्यास आवडेल. समजले? का, तू ते नाकारु शकत नाही. कोणताही खरा, चांगला देवविषयक ज्ञानी हे जाणतो की ते सत्य आहे, ज्याचा ते शोध करीत होते.

127 परंतु तो ठीक तशाच प्रकारे येईल जसा योहान, अग्रदूत ख्रिस्ताच्या पहिल्या आगमनाच्या आधी आला होता. का, त्यांनी त्याला ओळखले नाही, कारण त्याच्याविषयी महान गोष्टींची भविष्यवाणी केली गेली होती. कारण तो "सर्व उंच जागा सखल करणार होता आणि सर्व खोरे उंच होवोत, सर्व खडकाळी जागा मैदान होवो." आणि ओह, तो... ते संदेष्टे: यशया त्याच्या जन्माच्या सातशे बारा वर्षे अगोदर, आणि मलाखी, तो येण्याच्या चारशे वर्षे अगोदर, त्या सर्वांनी त्याच्याविषयी भविष्यवाणी केली. आणि ते अपेक्षा करीत होते की स्वर्गातून एक मार्गिका खाली उतरेल, आणि हा भविष्यद्वक्ता परमेश्वराच्या वतीने त्याचे शस्त्र हातात घेऊन बाहेर येईल.

128 आणि काय घडले? एक मनुष्य जो तुम्हाला...सहभागितेचे पत्र दाखवू शकला नाही. जो आपली विश्वासपात्रता दाखवू शकत नव्हता. रानात राहीला; ज्याच्याकडे साधारण शालेय शिक्षण नव्हते. इतिहासकाराद्वारे आम्हाला सांगण्यात येते की जेव्हा तो नऊ वर्षे वयाचा होता, त्याच्या आईवडिलांच्या मृत्युनंतर तो रानात गेला. आणि तेथे तो वाढला...त्याचे कार्य फार महत्त्वाचे होते. काही सेमिनरीत गोंधळ उडविणे, त्याला—त्याला ख्रिस्ताची घोषणा करणे होते.

129 परमेश्वर एका अशा मनुष्याचा उपयोग करु शकत नव्हता जो देवविषयक ज्ञानाने भरलेला आहे. तो ते करु शकत नव्हता. तो तर मागील गोष्टींचाच हवाला देतो ज्या त्याने शिकल्या आहेत. तो त्या विषयीच सांगेल. जर तो काही पाहण्यास जातो, तर तो त्याच गोष्टी पहाण्याचा प्रयत्न करतो, ज्या त्याच्या शिक्षकांनी त्याला सांगितल्या आहेत. हे चांगले आहे की जर तुम्ही तशा गोष्टींपासून दूर राहाल आणि फक्त देवावर विश्वास ठेवाल.

130 आणि आपण पाहतो की त्यांनी त्याला ओळखले नाही. अगदी प्रेषित जे तेथे उभे होते त्यांनी देखील त्याला ओळखले नाही. का? ते म्हणाले, "शास्त्रलेख असे का म्हणते? शास्त्री असे का म्हणतात? की एलिया..."

131 त्याने म्हटले, "तो अगोदरच आला आहे, आणि तुम्ही त्याला ओळखले नाही."

132 आणि त्याला मी पुनरुत्थान किंवा स्वर्गरोहणाचे स्वरुप देतो. ते तर जाईल. आणि... मला ठाऊक आहे ते विचित्र भासते. परंतु जर प्रभूची इच्छा असेल तर आज रात्रीनंतर तुम्हाला कदाचित आणखी थोडे कळेल, की ते कसे होणार आहे, ते इतके गुप्तरित्या होईल, त्याविषयी क्वचितच कोणाला कळेल. जग फक्त विचार करील, ते तसेच चालत राहील, जसे ते चालत होते...तशाचप्रकारे तो नेहमी करीत आला आहे.

133 तुम्हाला माहीत आहे, मला शंका वाटते की एक—एक...मी म्हणतो, की जेव्हा येशू ख्रिस्त येथे होता, जेव्हा तो येथे होता. नव्वदात एक टक्के पृथ्वीवरील लोक त्याला जाणू शकले. तुम्हाला ठाऊक आहे, जेव्हा एलियाने भविष्यवाणी केली, मला शंका वाटते की तेथे क्वचितच त्याला कोणी ओळखले की तो...त्यांना माहीत होते तेथे एक विक्षिप्त थोडासा वृध्द धर्मवेडा मनुष्य होता. परंतु ते त्याचा द्वेष करीत होते. निश्चितच ते त्यास चक्रम व्यक्ति म्हणून संबोधित होते.

134 आणि मला वाटते कुठलाही नविन जन्म पावलेला ख्रिस्ती एक प्रकारे जगासाठी चक्रम व्यक्तीच आहे, कारण तुमचे परिवर्तन झालेले आहे. तुम्ही दुसऱ्या जगाचे आहात. तुमचा आत्मा त्या दरी पलिकडचा आहे. आणि येथे ही गोष्ट इतकी गोंधळाची आहे...जर

तुम्ही—तुम्ही वेगळे नाहीत, तेथे काहीतरी चुकीचे आहे, तुम्ही अजूनही संसारात गुंतलेले (जगिक) आहात. तुम्हाला स्वर्गिय बुध्दीचे असले पाहीजे. आणि स्वर्ग वचनाद्वारे जगतो.

135 आता, आपण पाहतो की ही—ही महान गोष्ट घडली आहे. आता आपण विश्वास ठेवतो की तेथे अलिशाचा खरा आत्मा येणार आहे. त्याचे भाकीत केले आहे की तो येईल समजले. आणि आपण ह्याचे स्मरण ठेवले पाहीजे. तो येथे त्याच्या स्वतःच्या ऋतुत आणि समयात असेल. आपण त्यासाठी आता पाया रचत आहोत. आणि ती कुठलीही संघटना नसेल.

136 मी—मी ह्या विषयावर माझ्या एका चांगल्या मित्राशी असहमत आहे. तो म्हणतो तो एक लोकांचा समुह असेल. माझी इच्छा आहे की तू मला हे वचनाद्वारे दाखवावे. परमेश्वर, न बदलणारा परमेश्वर आहे, तो कधीच त्यांच्या योजना बदलत नाही. जर तो तसे करतो, तर तो परमेश्वर नाही; ते बरोबर आहे, कारण तो मर्त्य आहे, आणि त्याला माझ्यासारखीच समज आहे, आणि तो चूका करितो.

137 एदेन बागेपासून देवाने कधीच त्याची योजना बदलली नाही. त्याने मुक्तीसाठी एक योजना केली. ते रक्त होते. आणि आपण शिक्षण मिळवण्याचा प्रयत्न केला. आपण हुकूमशाही करण्याचा प्रयत्न केला. आपण संप्रदाय करण्याचा प्रयत्न केला. आपण मानशास्त्राचा उपयोग करण्याचा प्रयत्न केला. आपण सर्व गोष्टींचा प्रयत्न केला की सर्वांना एकत्र करावे किंवा सर्वांवर प्रेम करुन एकत्र करावे, आणि इतर सर्व गोष्टी. तेथे सहभागितेसाठी कुठलीही जागा नाही, परंतु रक्ताखाली, अद्यापपर्यंत एकच जागा आहे; जेथे देव मनुष्याला भेटतो.

138 परमेश्वर नेहमीच एका व्यक्तीशी व्यवहार करतो. दोघा व्यक्तीकडे दोन कल्पना असतात. पृथ्वीवर तेथे कधीच एका समयात भविष्य करणारे मोठे संदेष्टे नव्हते. मागे बघा आणि पाहा तेथे होते का. नाही, महाशय. तेथे खूपच द्वीधा मनःस्थिती आहे. त्याला एका मनुष्याचे संपूर्ण समर्पण व्हावे लागते, आणि त्या मनुष्याचा उपयोग करतो. तो अशा मनुष्याचा शोध करतो.

139 परंतु तेथे एका समयात एकच मनुष्य असेल जो त्याचे एक वचनाप्रमाणे ऐकेल. मला त्याची पर्वा नाही की कोण काय सांगते, ते वचनापासून कधीच हलणार नाही. ते बरोबर आहे. ते **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** ह्या वचनावर वाट पाहतील. आणि ते तोपर्यंत विचलित होणार नाही. तो योग्यरितीने प्रकट केला जाईल.तुम्हाला...

140 आता, बाहेरचे जग त्याचा द्वेष करील, परंतु निवडलेले बीज, पूर्वनियोजीत बीज, जसे येशूच्या दिवसात होते, जेव्हा तो प्रकाश त्याच्यावर पडला, त्या बीजात *अशा* जीवन येईल. [भाऊ ब्रॅन्हम एकदा आपल्या बोटाने टिचकी मारतात—सम्पा.] ते त्यास ओळखतील. ते त्यास समजतील. तुम्हाला त्याविषयी एकही शब्द बोलावा लागणार नाही.

141 ती म्हणाली, "महाराज, मला वाटते तुम्ही संदेष्टे आहात. मला ठाऊक आहे जेव्हा मसीहा येईल, तो ह्या गोष्टी..."

त्याने म्हटले, "मी तोच आहे."

142 मुलांनो त्या स्त्रीला हे पुरेसे होते. तीला त्यासाठी पूर्ण रात्रभर आणि दुसऱ्या रात्रीपर्यंत थांबवण्याची गरज नव्हती. तिला ते तेव्हाच मिळाले. ती तिच्या मार्गावर होती. ती त्यांना त्याविषयी सांगत होती.

143 आता लक्षात ठेवा. पहिले युग सिंहाचे युग होते. तो ख्रिस्त यहुदा वंशाचा सिंह होता. त्याने त्याच्या स्वतःच्या जीवनाच्या प्रभावाने ते युग चालवले होते. तो पहिला *प्राणी* होता, ज्याचा अर्थ. “सामर्थ्य” जो मनुष्यवाणीने उत्तर देत होता.

144 पुढचे युग बैलाचे युग होते, किंवा काळ्या घोडेस्वाराचे युग होते. समजले?

145 आता हेच कारण होते की पहिले युग श्वेत युग होते...जसे—जसे मी नेहमीच लोकांना बोलताना ऐकले आहे की पहिला स्वार अर्थात पांढरा घोडेस्वार जय प्राप्त करण्यासाठी पुढे गेला, जो मंडळीचे सामर्थ्य होता. आणि आपण पाहीले की त्याला एक मुकूट देण्यात आला, तो हा होता. तो मंडळी होता. तो मंडळी होता, परंतु तो कोठे गेला? रोमला गेला. तेच ते स्थान आहे जेथे तो गेला. त्याला त्याचा मुकूट मिळाला.

146 आता दुसरे युग हे—हे लाल घोड्याच्या स्वाराचे युग आहे, जे अंधारमय युग होते.

147 आणि आता—आता नंतरचे युग मंडळीचे होते, ते युग काळ्या घोडेस्वाराचे होते, आणि ते सुधारकांचे युग होते, समजले, जेव्हा जी वाणी बोलली. आता काळा घोडेस्वार, जो ख्रिस्तविरोधक होता, परंतु जो त्या युगात बोलत होता तो मनुष्याला दर्शवित होता आणि बुद्धीमान, चलाख आणि हुशार होता. समजले? आणि पाहा, त्यांना ते समजले नाही, त्यांनी त्याला बोलावले नाही...त्यांनी त्याला नाव दिले नाही. समजले? त्यांनी फक्त म्हटले की तो निघून गेला.

148 परंतु आता, जेव्हा गरूड युग आले हेच ते युग आहे, देवाची सर्वकाळ इच्छा होती की त्याच्या संदेष्ट्यांनी गरुडासारखे व्हावे. तो स्वतःला एक गरुड असे म्हणतो. गरुड इतका उंच जातो, तेथे त्याला कोणीही स्पर्श करु शकत नाही. तो केवळ वर उडत नाही, परंतु त्याला त्यासाठी बनवलेले असते. जरी तो उंच जातो तो पाहू शकतो की तो कोठे आहे. काही लोक वर जातात आणि ते पाहू शकत नाही की ते कोठे आहे, म्हणून त्यांना वर तेथे जाण्याचा काहीच लाभ होत नाही. परंतु तुम्ही जर...

149 परंतु तुम्ही जर कावळा, किंवा परंतु दुसऱ्या पक्षास गरुडाबरोबर उडू दिले, त्या दोघांचे तो लहान तुकडे करील. त्याला जेथे जायचे आहे, त्यासाठी त्यावर दबाव असायला हवा.

150 आज तीच समस्या आहे, आपल्यातील काही जण दबाव घेत नाही. तुम्ही पाहा, जेव्हा आपण उड्या मारतो, आपण एकदम बाहेर पडतो. आणि, परंतु, आपण दबाव सहन करणारे असले पाहीजे.

151 जेव्हा तुम्ही उंचावर जाता, आणि गरुडासारखी तीक्ष्ण नजर तुमच्याकडे आहे, तर तुम्ही पाहू शकता की काय येत आहे, आणि तुम्हाला समजते की काय करायचे आहे. आता, गरुड युग ते प्रकट करते आता आपण पाहतो की, ते गरुड युगाचे प्रकटीकरण 10:7 आणि मलाखी...1:4 मध्ये अभिवचन दिले आहे. ते अंतिम दिवसात असेल, पाहा, ते बरोबर आहे, की ते तेथे असेल. ठीक आहे. लक्ष द्या.

152 आता, हा व्यक्ति पाहा, आपण पाहीले आहे तो फिक्कट घोड्यावर स्वार आहे. फिक्कट! ओह, बापरे! नंतर लक्ष द्या...

153 नंतर लक्ष द्या, “सहा करोड, ऐंशी लाख, प्रोटेस्टंट,” जे आम्ही काल रात्री स्मूकर्स *ग्लोरियस रिफार्म*, रोमच्या शहीदाच्या पुस्तकातून पाहीले. आपणास आढळते की ते 1500 मार्क पर्यंत पाहीले होते, मला वाटते किंवा अठरा...मला आता निश्चित ठाऊक नाही. परंतु पहिल्या रोमन मंडळीला विरोध केल्यामुळे 6 करोड 80 लाख लोकांना

मारण्यात आले होते. ह्यात, आश्चर्य नाही, तो स्वतःला एका नावात सोंग घेऊ शकतो… आणि मृत्यु म्हणवू शकतो. तो निश्चितच तोच होता.

154 आता देवालाच ठाऊक आहे की त्याच्या विरोधी बायबलद्वारे, त्याच्या वचनाच्या शिकवणीद्वारे त्याने कित्येकांना आध्यात्मिकरित्या मारण्यास प्रवृत्त केले! तो हाच आहे ज्याने 6 करोड 80 लाख लोक तरवारीने मारले. आणि कदाचित, अक्षरशः, करोडो लोक ह्या खोट्या शिकवणीद्वारे आध्यात्मिकरित्या, मृत झाले. ह्यात काहीच आश्चर्य नाही की तो मृत्यु हे नाव घेऊ शकतो!

155 घोडेस्वाराला पाहीले? प्रथम एक ख्रिस्तविरोधी म्हणून तो मृत्यु होता; परंतु सुरुवातीला तो निष्पाप भासला. मग त्याला एक त्रिस्तरीय मुकूट मिळाला, आणि त्याने एकीकरण केले, मग सैतानाने त्याची मंडळी आणि राज्य एक केले, कारण तेव्हा त्याचे दोघांवर प्रभूत्व होते. ख्रिस्तविरोधक हा सैतान मनुष्याच्या रुपात होता.

156 आणि मला वाटते 4 था अध्याय सुध्दा आपणास सांगतो की—की सैतानाने येशू, आपल्या प्रभूस, उंचावर नेले आणि एका क्षणात त्याला जगातील सर्व राज्ये आणि त्यांचे वैभव दाखविले. त्याला ती देऊ केली. आणि तो म्हणाला…ती त्याची आहेत.

157 म्हणून तुम्ही पाहीले, जर तो त्याचे राज्य आणि त्याची मंडळी एकत्रित करु शकतो, तर लाल घोडेस्वार निश्चितच पुरेसा धावू शकतो. समजले? खरेच असे करु शकतो! तेव्हा आपण येथे त्यांची मंडळी आणि राज्यांचे रहस्य पाहीले.

158 त्याच्या सेवकाईच्या चौथ्या अवस्थेत त्याला पशू म्हणण्यात आले. पहिले त्याला ख्रिस्तविरोधक म्हटले गेले, पाहा, मग त्याला संदेष्टा म्हटले गेले; आणि त्याला पशू म्हणण्यात आले. आता, आम्हाला तो येथे आढळतो जेव्हा त्याला पशू म्हटले आहे. आता मला वाटते की तुम्ही लक्ष द्यावे, की हे चौथ्या घोड्यानंतर आहे.

159 आणि जर तुम्ही चौथ्या घोड्यावर लक्ष द्याल…पहिला पांढरा होता; आणि नंतरचा लाल होता; आणि त्यानंतरचा काळा; आणि चौथा घोडा फिक्कट होता, इतर सर्व तीन त्यात प्रकट होत होते, कारण फिक्कट रंग लाल आणि पांढऱ्या रंगाचे मिश्रण आहे. समजले? तो…ते—ते सर्व ह्या एका घोड्यात एकत्रित केले होते. समजले? आणि तेथे तो चौथा बनतो, किंवा वास्तवात त्या तिघांत एक आहे, आणि ते सर्व त्या एकात मिसळलेले आहे.

160 आता, मी तुम्हाला त्या चारही जणांना दाखवू इच्छितो. चिन्हांच्या ऐवजी तुम्ही चार ह्या आत्मिक गणिताकडे लक्ष द्या. परमेश्वर तिघांत आहे. हा चार आहे. येथे, तो चारांत आहे. पहिला ख्रिस्तविरोधी, पांढरा; दुसरा, खोटा संदेष्टा, लाल; तिसरा, आकाश आणि पृथ्वीच्या आणि—आणि मृतात्म्यांच्या पापक्षालनाच्या ठिकाणांचा धर्मोपदेशक आहे, काळा; चौथा घोडा, पशू फिक्कट रंगाचा घोडा, सैतानाला स्वर्गातून काढून टाकले आहे. तुम्ही ते वाचू इच्छिता काय? प्रकटीकरण 12:13 सैतानाला स्वर्गातून खाली टाकून देण्यात आले होते. नंतर प्रकटीकरण 13:1—8, मध्ये तो त्या श्वापदाच्या व्यक्तित देहधारी झाला.

161 प्रथम तो ख्रिस्तविरोधी आहे, आणि केवळ—केवळ निकलाईतांचे शिक्षण म्हटले गेले. नंतर तो त्यापासून खोटा संदेष्टा झाला, जर तो ख्रिस्तविरोधी आहे, ख्रिस्तविरोधी *विरुध्द* आहे. जे काही परमेश्वराच्या वचनाविरुध्द आहे, ते परमेश्वराविरुध्द आहे, कारण वचन परमेश्वर आहे. "प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता, आणि शब्द देहधारी झाला. ख्रिस्त, आणि आमच्यामध्ये त्याने वस्ती केली." आणि आता तो वचनाविरुध्द

आहे, म्हणून तो ख्रिस्तविरोधी आहे. परंतु आत्म्याला मुकूट घालता येत नाही; हेच कारण आहे, त्याला मुकूट मिळाला नाही. फक्त धनुष्य होता, परंतु बाण नव्हते.

162 आणि जेव्हा त्याचा मुकूट घालण्याचा समय आला, तेव्हा तो त्याच्या ख्रिस्तविरोधी शिक्षणाचा खोटा संदेष्टा बनला. तुम्हाला ते समजले का? मग त्याला एक तरवार मिळाली, कारण त्याने त्याच्या शक्तीचे एकत्रीकरण केले, मग त्याला कोणालाही विचारण्याची आवश्यकता भासली नाही. तो राज्याचा राज्यपाल आहे. तो स्वर्गाचा राज्यपाल आहे. त्याला त्रिस्तरीय मुगूट मिळाला आहे. त्याने स्वतः मृतात्म्यांचा "पापक्षालनाच्या" ठिकाणाची कल्पना बनवली आहे. ती कल्पना अशी की जर—जर त्यांच्यातील कोणी मृत झालेले आहे, आणि त्यांच्याकडे पैसे आहेत, जर ते त्यांना बाहेर काढण्यासाठी पैसे देऊ शकतात. तो त्या मृत व्यक्तिला बाहेर काढण्यासाठी प्रार्थना करु शकतो. कारण त्यांच्याकडे तसे करण्याचे सामर्थ्य आहे; तो पॅरीशवरचा *धर्मोपदेशक* आहे. निश्चितच तो आहे. "तो पृथ्वीवर परमेश्वराची जागा घेतो." जर ते कोणत्याही गोष्टीसारखे स्पष्ट नाही!

163 आपण हे बायबलमधून पाहीले आणि आपण त्यांची अंकाचे अंक मोजले आहेत आणि इतर सर्व गोष्टीतून पाहीले आहे. येथे तो आहे....?...तो येथे चार अंकात आहे. तीन अंकात नाही. पाहा, चौथ्या अंकात आहे.

164 आता आपण प्रकटीकरण 12 मध्ये वळूया. आपण केवळ हा थोडासा भाग वाचूया, कारण आपल्या—आपल्याकडे ते करण्यास वेळ असेल, आणि आपण प्रकटीकरण 12 वा अध्याय आणि 13 वे वचन वाचूया. "आणि त्याचवेळी तेथे मोठा भूकंप झाला..." नाही, मी—मी चुकीच्या जागी आहे. 13 वे वचन:

*आणि पृथ्वीवर टाकले गेलो आहोत असे पाहून अजगराने पुसंतान प्रसवलेल्या स्त्रीचा पाठलाग केला.*

165 आता, तुम्ही पाहा, तो पृथ्वीवर टाकला गेला आणि देहधारी बनला, कारण ख्रिस्तविरोधी आत्मा मनुष्यामध्ये देहधारी झाला. तो मनुष्य एका गोष्टींतून दूसरीकडे बदलला, ख्रिस्तविरोधी आत्म्यापासून खोटा संदेष्टा, आणि मग त्याच्यामध्ये पशू आला.

166 अगदी तशाचप्रकारे जशी खरी मंडळी वाढते; तशी त्याची मंडळी ख्रिस्तविरोधीपासून—पासून खोटा संदेष्टा, आणि नंतर येणाऱ्या महान युगात श्वापद उदयास येणार आहे. तशाचप्रकारे वधू न्यायीकरण, पवित्रीकरण, आणि पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यांतून आली, ख्रिस्त लोकांमध्ये आहे, आणि त्याने त्याची विरुध्द नक्कल केली आहे. किंबहुना तुम्ही त्याची प्रतिछाया पाहा. तो अगदी तोच आहे. तो तोच आहे. त्याला स्वर्गातून टाकून दिले होते.

167 आता, आपणास हे प्रकटीकरण 13:1—8 मध्ये पाहण्यास मिळते.

*आणि मी एक श्वापद समुद्रातून वर येताना पाहीले...*

168 आता, 12 अध्यायात, त्याला टाकून देण्यात आले. आता लक्ष द्या.

*...एक श्वापद समुद्रातून वर येताना पाहीले, त्याला दहा शिंगे व सात डोकी असून. त्याच्या शिंगावर दहा मुगूट आणि त्याच्या डोक्यावर देवनिंदात्मक नावे होती.*

*आणि जे श्वापद मी पाहीले ते 'चित्यासारखे' होते, आणि त्याचे पाय...*

169 ओह, जर आपल्याकडे आता वेळ असता, तर आपण बाकीचे रात्रभर ह्या चिन्हांवर घेतले असते. आणि त्याने त्याला ठीक प्रकट केले असते. तुमच्यामधील बरेचशे सर्व लोक इतर अध्यायातून ह्या विषयी जाणतात.

*...त्यांचे पाय अस्वलाच्या पायासारखे होते व त्याचे...तोंड सिंहाच्या तोंडासारखे होते. त्याला अजगराने आपली शक्ति, आपले...आसन व... मोठा अधिकार दिला.*

170 पाहा, सैतान देहधारी झाला!

*आणि त्याच्या एका डोक्यावर...प्राणांतिक घाव झाल्यासारखे माझ्या दृष्टीस पडले...*

171 आणि जेव्हा आम्ही ते शेवट पर्यंत वाचतो, जर तुम्हाला पाहीजे असेल, जेव्हा तुम्हाला वाचण्याची संधी मिळेल, तेव्हा तुम्ही ते शेवटपर्यंत वाचू शकता. आपण—आपण त्याचा थोडासा अंश वाचूया.

*आणि त्याच्या डोक्यावर प्राणांतिक घाव...झाल्यासारखा माझ्या दृष्टीस पडले; तरी त्याचा प्राणघातक घाव बरा झाला. तेव्हा सर्व पृथ्वी आश्चर्य करीत त्या श्वापदामागून गेली.*

172 तुम्ही फक्त लक्ष द्या! तुम्ही कधीच साम्यवादाकडे लक्ष देऊ नका. ते काहीच नाही. परंतु परमेश्वराच्या हातातील एक हत्यार आहे, ह्यासाठी तुम्हाला एके दिवशी "रक्ताचा सूड," घेण्यास मदत करावी. उद्या रात्री आपण ह्याविषयी पाहू. समजले?

*आणि त्यांनी त्या अजगराला नमन केले...*

173 हा अजगर कोण होता? सैतान. ते बरोबर आहे. "तो अग्नीवर्ण अजगर." हे बरोबर आहे.

*...अजगराने त्या श्वापदास आपला अधिकार दिला,* (त्याला हा अधिकार कोठून मिळाला, हे पाहूया)*; म्हणून त्यांनी अजगराला नमन केले; आणि ते श्वापदाला नमन करताना म्हणाले, ह्या श्वापदासारखा कोण आहे? ह्याच्याबरोबर कोणाला लढता येईल?*

*आणि त्याला मोठमोठ्या देवनिंदात्मक गोष्टी बोलणारे तोंड देण्यात आले व बेचाळीस महिने त्याला आपले काम चालविण्याची मुभा देण्यात आली.*

*आणि त्याने देवाविरुध्द निंदा करण्यास,* (तेथे तुम्ही आहात पाहा, ठीक आहे.)*...अर्थात त्याचे नाव* (त्याला उपाधी दिली) *...आणि त्याचा मंडप म्हणजे* (जे पवित्र आत्म्याचे वस्तीस्थान)...

174 रोम, वॅटीकन सिटीत जागा बनवण्यासाठी. तुम्ही पुढे जाऊ शकता:

*...आणि जे स्वर्गनिवासी.*

175 देवाविरुध्द निंदा केली, असे सांगून की ते मध्यस्थ होते.

*आणि पवित्र जनांबरोबर लढण्याची* (आणि त्याने तसे केले) *आणि त्यांस जिंकण्याची त्याला मुभा देण्यात आली;* (त्याने ते केले)...

176 त्यांना वधस्तंभावर जाळले! त्यांना सिंहाना खाण्यास दिले! आणि त्यांना जसे पाहीजे तसे मारुन टाकले!

*...आणि सर्व वंश, लोक, निरनिराळ्या...भाषा बोलणारे व राष्ट्रे ह्यांवर त्याला अधिकार देण्यात आला.*

177 रोममध्ये असे कधीच झाले नव्हते जोपर्यंत पागन रोम पोपच्या रोममध्ये बदलले गेले नाही आणि कॅथलिक सामर्थ्य जगभरात पसरले, सार्वत्रिक कॅथलिक मंडळी बनवली.

*आणि पृथ्वीवर राहणारे सर्वजण त्याला नमन करतील, ज्या कोणाची नावे त्या पुस्तकात…*

178 "माझे तेल आणि द्राक्षारसाला स्पर्श करु नका!" समजले?

*आणि ज्या कोणाची नावे जगाच्या स्थापनेपासून वधलेल्या कोकऱ्याजवळील जीवनाच्या पुस्तकात लिहीलेली नाहीत असे पृथ्वीवर राहणारे सर्वजण त्या श्वापदाला नमन करतील.*

*ज्या कोणाला कान आहेत तो एको.*

*जो कैदेत जावयाचा तो कैदेत जातो, जो तरवारीने जीवे मारील त्याला तरवारीने मरणे भाग आहे. ह्यावरुन…पवित्र जनांचा धीर व विश्वास दिसून येतो.*

179 आता, पाहा, काल रात्री आपण त्याचा तरवारीने वध करण्याच्या विषयाकडे आलो होतो.

180 आपण पाहतो की तो ही तरवारीने, वचनाच्या तरवारीने मारला जाईल. परमेश्वराचे वचन, दुधारी, त्याचा वध करते, आणि त्याला खाली पाडते. सात गर्जना त्यांचे शब्द त्या समुहास सांगेपर्यंत थांबा, जे खरोखरी परमेश्वराचा शब्द घेऊ शकतात आणि त्यांना देऊ शकतात. तो तुकडे तुकडे करुन कापिल. आणि ते आकाश बंद करु शकतात. ते हे बंद करु शकतात किंवा जे त्यांना हवे ते करु शकतात. महिमा! तो त्याच्या मुखांतून निघणाऱ्या शब्दांद्वारे, जे दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण आहे. त्याद्वारे वधला जाईल. जर त्यांना हवे असेल तर ते शेकडो करोड टन माश्यांना बोलावू शकतात. आमेन. ते जे बोलतील ते घडेल, कारण तो देवाचा मुखांतून निघणारा देवाचा शब्द आहे. होय, आमेन. देव सदैव त्याचे वचनच पाठवितो, परंतु तो सदैव ते कार्यन्वित करण्यासाठी मनुष्याचा उपयोग करतो.

181 मिसरात परमेश्वर त्या माशांना बोलावू शकला असता, परंतु तो म्हणाला, "मोशे हे तुझे काम आहे. मी फक्त तुला काय करायचे ते सांगेन आणि तू जाऊन ते कर." त्याने ते पूर्णतः केले. समजले? त्याने—त्याने त्यांना बोलावण्यासाठी सूर्याची निवड केली असती, त्याने चंद्राला त्यांना बोलावण्यास सांगितले असते, किंवा वाऱ्याला ते बोलावण्यास सांगितले असते. परंतु त्याने—त्याने म्हटले "मोशे." त्याने—त्याने त्याचा मनुष्य निवडला.

182 आता येथे आपण पाहतो की हा सैतान, त्याला स्वर्गातून खाली टाकल्यावर, ह्या श्वापदामध्ये त्याने स्वतःला देहधारी केले आणि आता तो एक श्वापद आहे; ख्रिस्तविरोधी, खोटा संदेष्टा आणि आता श्वापद आणि त्याला मृत्यु हे नाव देण्यात आले! आणि नरक त्याच्या मागे आहे! सैतान पूर्णत: त्याच्या राजासनावर आहे! ओह माझ्या प्रभू! पृथ्वीवर तो सैतान आहे, पृथ्वीवर प्रतिनिधी आहे, तो आता जगाच्या राज्यांचा मुख्य आहे, तीच राज्ये जी त्याने प्रभू येशूला मत्तय 4 मध्ये देऊ केली. सैतान आता पूर्ण राजा बनला आहे.

183 आता, हे नंतर घडणार आहे. आता तो खोटा संदेष्टा आहे. काही वेळानंतर तो श्वापद होईल, जेव्हा तो यहुद्यांसमवेत झालेला त्याचा करार मोडेल. तुम्हाला माहीत आहे… ठीक आहे, आता लक्ष द्या, त्या समयी त्याला एका श्वापदाचे अंतःकरण देण्यात येईल; आणि सैतान त्याला स्वतःस देहधारी करील. कारण जेव्हा वधू वर जाईल, सैतान बाहेर टाकला जातो. समजले? समजले? हे जेव्हा होईल, तेव्हा, त्याचे सर्व दोषारोप करण्याचे काम पूर्ण होईल. समजले? आता…

184 समजले आता? पाहा, जोपर्यंत मध्यस्थ राजासनावर बसलेला आहे, सैतान तेथे उभा राहू शकतो. आणि दोषारोप करु शकतो, कारण तो दुसऱ्या बाजूचा वकील आहे. तो ख्रिस्ताचा विरोधक आहे. आणि ख्रिस्त...तो तेथे उभा आहे. विरोधक तेथे उभा आहे, बोलत आहे. "परंतु थांब! आदाम पडला! आदामाने हे केले! मी त्याला जिंकले, मी त्याच्या पत्नीस खोट्यावर विश्वास ठेवण्यास लावले. आणि तू म्हणाला ती त्यामुळे शापित होईल. मला हे मिळाले आहे!"

185 परंतु येथे मध्यस्थ उभा आहे, आमेन, निकटचा सोडविणारा, आमेन, तो ते रक्त घेऊन उभा आहे. जे रक्त पाप्याचे अत्यंत अधम हृदय घेऊ शकते. आणि बदलू शकते. मध्यस्थ राजासनावर आहे. होय, महाशय.

सैतान म्हणाला, "परंतु ते अपराधी आहे!"

तो म्हणू शकतो, "ते अपराधी नाहीत."

186 त्या क्लोरोक्स विरंजकाचा शोध किंवा निर्मिती ते शाहीचे डाग किंवा इतर कुठलेही डाग काढण्यासाठी केला होता. त्यांच्याकडे ते आहे. ते ते पूर्णपणे तोपर्यंत नष्ट करतील जोपर्यंत तुला ते कधीच मिळणार नाही. ते पुन्हा त्या वायूत आणि त्या वैश्विक प्रकाशात निघून जातात. आणि पूर्वीचे परमाणू आणि इतर सर्वगोष्टी जोपर्यंत ते त्याच्या मुळ अवस्थेत जात नाही. जेथून आले आहेत तोपर्यंत बदलले जातात. ते एक निर्मिती आहेत...निर्मितीला निर्मात्यांपासून यावे लागते. परंतु सर्व रसायने जे निर्माण केले होते आणि एकत्र केले होते, त्यांचे विघटन झाले आहे, आणि हेच सर्व त्या शाहीच्या डागाबरोबर होते. त्याचा काही अंश उरत नाही. अगदी पाण्याचा डागही त्या क्लोरोक्समध्ये एकजीव होऊन जातो, जी राख आहे.

187 आमेन! परमेश्वराला गौरव असो! ते पूर्णतः शुध्द झाले आहे. तेच येशू ख्रिस्ताचे रक्त परमेश्वराच्या खऱ्या लेकरासाठी करते, जेव्हा तो त्या पापाची कबुली देतो आणि, तेथे उभा राहतो, तो त्याच्या...दयेने! चांगुलपणाने! न्यायी ठरतो, हे इतके महान आहे की परमेश्वर म्हणतो, "मी ते ह्यापुढे आठवत नाही. आणि हा पूर्णपणे माझा पुत्र आहे."

188 "मी तुम्हाला खचित सांगतो की जो कोणी ह्या डोंगराला 'उपटला जा,' असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो, तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल. जे काही तुम्ही मागाल ते तुम्हाला मिळालेच असा विश्वास धरा, म्हणजे ते तुम्हाला मिळेल." तुम्ही उध्दार पावलेले पुत्र आहात. आमेन! मला ठाऊक आहे. ते खरे आहे.

189 मी सहा वेगवेगळ्या समयी खारींना पलिकडून प्रकट होताना पाहीले आहे, मला ठाऊक नाही की येथे बसलेले कितीजण हे जाणतात. तो खारी निर्माण करु शकतो जसे तो माश्या किंवा बेडूक किंवा दुसरे काहीही निर्माण करु शकतो. तो परमेश्वर आहे. निर्माणकर्ता आहे. खरे आहे! आणि जेव्हा कोणीही मर्त्य मनुष्य...

190 परंतु जेव्हा त्या मर्त्यमनुष्याच्या पापाची कबुली दिली जाते आणि ते त्या येशू ख्रिस्ताच्या क्लोरेक्स विरंजकात टाकले जाते, ते सर्व पापे नष्ट करते. तो पूर्णत: शुध्द, व्यभिचारहीत, पापरहीत, दोषरहीत आहे. "जो कोणी देवापासून जन्मलेला आहे, तो पाप करीत नाही. कारण त्याच्याने पाप करवत नाही." ते विरंजक त्याच्यात आणि देवामध्ये उभे राहते. ते पाप तेथे कसे पोहचू शकते, जेव्हा त्याचे विघटन केलेले आहे आणि ते ज्याने विकृत केलेले आहे, त्याच्याकडे परत पाठवलेले आहे! आमेन!

191 वाह! मला धार्मिक असल्यासारखे वाटते. मी—मी तुम्हाला सांगतो, की जसे हे प्रकट होण्याची सुरुवात झाली आहे तसे मला उत्तेजना मिळत आहे.

192 आता, लक्ष द्या, सैतान पुर्णत: त्याच्या राजासनावर आहे. होय, महाशय. ते त्याने परमेश्वराला देऊ केले होते. जे त्याने आपल्या प्रभूला देऊ केले होते. येथे तो ह्या त्याच्यामध्ये श्वापदाच्या अंत:करणासह बसलेला आहे. आता, येथे तो व्यक्ति आहे. ते श्वापद देहधारी सैतान. येथे पृथ्वीवर त्याने त्याचे येणे प्रकट केले आहे. ओह, बापरे! खऱ्या वचनाच्या खोट्या सबबीखाली, त्याने त्याला स्वतःस वचनाशी जोडलेले आहे.

193 त्याने अगदी तीच गोष्ट केली जी त्याच्या—त्याच्या प्रतिछायेने केली, दोन हजार वर्षापूर्वी जो यहुदा होता, त्याने काय केले? यहुदा जो सुरुवातीपासून सैतानाचा होता, तो विश्वासी म्हणून आत आला. "तो नाशाचा पुत्र म्हणून जन्मला होता." त्याने काहीच येशूवर सोपवले नव्हते, कारण तो त्याला प्रारंभापासून ओळखीत होता. आमेन, कारण तो वचन होता. ठीक आहे. आणि लक्ष द्या. यहुदाने खजिनदाराची जागा घेतली, आणि पैशाद्वारे पडला.

194 ह्या दिवसातील मंडळीनेही तेच केले आहे. कॅथलिक मंडळी, जसे आपण काल रात्री पाहीले, नोवेनासाठी, प्रार्थनेसाठी पैसे घेत आहे, आणि सर्व गोष्टींसाठी पैसे घेत आहे आणि बिलकुल असेच कॅथलिक मंडळ्यांच्या मुली, प्रोटेस्टंट बरोबरही आहे, ते त्याच गोष्टी करीत आहेत. सर्व गोष्टी पैशांशीच जोडलेल्या आहेत. तेथेच जेथे त्याचे पतन झाले, आणि तेथे प्रोटेस्टंट पडले.

195 ह्या फिकट घोड्यावर जो फिकट घोड्यावर स्वार आहे, लक्ष द्या, तो त्याच्या शेवटच्या घोड्यावर आहे. आता, ते आपल्या दिवसात नव्हते. ते नंतर होईल. ते एक रहस्य आहे. ज्याचे भाकीत करण्यात आले होते कारण पाहा, जेव्हा हे घडते तेव्हा खरी मंडळी वर गेलेली असेल. जेव्हा ख्रिस्त येथे पृथ्वीवर प्रकट होईल, तेव्हा—तेव्हा—तेव्हा...हा व्यक्ति प्रकट होतो, आणि पूर्णपणे ख्रिस्तविरोधकापासून सैतान होतो; जो तो सर्व समयी होता, सैतान स्वतः खोट्या संदेष्ट्यांतून, श्वापदामध्ये येतो. आणि तो फिकट घोड्यावर स्वार आहे, जो सर्व रंगाचे मिश्रण आहे. त्याला फिकट आणि प्राणघातक बनविण्यासाठी सर्व प्रकारच्या रंगाचे मिश्रण केले आहे.

196 परंतु जेव्हा आपला प्रभू येथे पृथ्वीवर प्रगट होईल, तो बर्फासारखा शुभ्र घोड्यावर स्वार होईल. आणि तो पूर्णपणे इम्मानुएल असेल. परमेश्वराचे वचन एका मनुष्यामध्ये देहधारी होईल. समजले? त्यांच्यात कितीतरी फरक आहे. हा त्यांच्यातील फरक आहे.

197 लक्ष द्या, ख्रिस्तविरोधक फिक्कट रंगाच्या मिश्र रंगाच्या घोड्यावर आहे. घोडा एक श्वापद आहे. जो लोकांत दर्शवितो त्याची ताकद पूर्णरितीने जोडलेली आहे. का? हे राजकारण आहे, ती—ती राष्ट्रांची ताकत आहे, ती धार्मिक ताकद आहे, ती दृष्ट आत्म्यांची ताकद आहे. ती सर्व प्रकारच्या शक्ती एकत्रित करुन बनवलेली आहे. जेव्हा तो फिक्कट रंगाच्या घोड्यावर होता. त्याच्याकडे सर्व प्रकारची ताकद आहे.

198 परंतु जेव्हा येशू येतो, तो एका घट्ट रंगाच्या घोड्यावर येतो. वचन. आमेन!

199 हा फिक्कट रंग लाल, पांढरा, काळा; ह्या तीन रंगाच्या मिश्रणाने बनला आहे, ते तीन रंग एकामध्ये प्रदर्शित होतात. आणि तीन शक्ती एकामध्ये प्रगट होतात. पांढरा घोडा, काळा घोडा, लाल घोडा आणि निश्चितच तीन मुकूट एकातच आहेत. समजले.

200 मी स्वत: *तो* मुकूट जवळ उभा राहून पाहीला आहे. तो मुकूट काचेच्या फ्रेममध्ये असल्यामुळे मी तो घेऊ शकलो नाही. तेथे त्या फ्रेमवर मोठे टाळे लावले होते: तो

तिहेरी मुकूट होता. म्हणून मला ठाऊक आहे की ते सत्य आहे. तेथे तो आकाश, मृतात्म्यांच्या पापक्षालनाचे ठिकाण, आणि पृथ्वी त्या प्रमुख धर्ममुक्तीच्या रुपात तो तिहेरी मुकूट घालून होता.

201 तीन सामर्थ्य एकत्र आले होते. पाहा सर्व फिकट रंगात एकत्रित झाले होते. मृत्यु सर्व गोष्टींवर आला होता; राजकीय, आणि—आणि धार्मिक आणि—आणि सैतानी शक्ती एकत्रित झाली होती, राजकारणात तो राजकारणाचा राजा आहे, सैतान चालाख आहे! होय! निश्चितच त्याच्यावर बुध्दी चातुर्याने मात मिळवण्याचा प्रयत्न करु नका. फक्त—फक्त प्रभूवर विश्वास ठेवा. फक्त तेच करा.

202 जसे आपण सर्वांनी पूर्वी ह्याचा अभ्यास केला आहे. सर्व हुशारी, शिक्षण आणि अशा गोष्टी चुकीच्या बाजूने येतात, तुम्ही ह्या गोष्टी वचनातून पाहा, शोधा की त्या बरोबर आहेत का काईनाची संतती पाहा, आणि पाहा, त्याचे काय झाले. मग शेथाची संतती पाहा, ते कोण होते. असे नाही की मी अज्ञानास बढावा देत आहे. मुळीच नाही, नाही महाशय. तुम्ही बायबलमधील कोणीही व्यक्ती घ्या, तो क्वचितच...

203 आणि तेथे पौल नावाचा एक बुध्दीमान मनुष्य होता, आणि त्याने म्हटले ख्रिस्ताला जाणण्यासाठी त्याला सर्व गोष्टी ज्या त्याला ठाऊक होत्या त्या विसराव्या लागल्या. त्याने म्हटले, "मी तुमच्याकडे ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने आलो आहे." बरोबर आहे की तो पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आला होता.

204 तुम्ही दुसऱ्यांकडे पाहा. त्यांच्यातील काहीना उजव्या व डाव्या हाताचा भेद कळत नाही. आणि—आणि पूर्वकाळच्या संदेष्ट्यांकडे पाहा आणि पाहा ते कोठून आले, आणि मला काय म्हणायचे ते तुम्हाला समजते काय?

205 पाहा, ते हुशार, बुध्दीमान, आणि ज्ञानी आहेत. ज्ञान ही अशी एक गोष्ट आहे जी तुम्हाला परमेश्वरापासून दूर नेते.

206 त्याच्याकडे तीन अधिकार आहेत, किंवा तीन—तीन कार्यकक्षा आहेत; पृथ्वी, स्वर्ग, आणि मृतात्म्याच्या पापक्षालनाचे ठिकाण.

207 तो स्वत: एक त्रैक्य आहे. त्यानेच तो बनवलेला आहे. तो तिघांना चालवीत आहे त्याचे अधिकार, तिहेरी मुकूट, त्याचा घोडा (घोडेस्वार) तीन रंगाचा आहे. हे त्याचे कार्यालय आहे, चार पुन्हा, पाहा पुन्हा चार, ठीक आहे.

208 त्याच्या सेवकाईच्या तीन अवस्था त्याला एक व्यक्ती बनवतात, सैतान देहधारी होतो. त्याच्या सेवकाईच्या तीन अवस्था...ख्रिस्तविरोधक, खोटा संदेष्टा, आणि श्वापद. हे तीन ते दर्शक आहेत. आता ते तीन दर्शक त्याला बनवतात.

209 परमेश्वर, परमेश्वरदेखील स्वत:ला पाणी, रक्त, आत्मा ह्यामध्ये प्रकट करतो. एका ख्रिस्ती व्यक्तीला परमेश्वाच्या वचनाद्वारे परमेश्वाचा पुत्र बनवतो. समजले? आणि *ह्या* तीन शक्ती त्याला सैतान बनवतात. समजले? येथे जे पाणी, रक्त आणि आत्मा ते परमेश्वराचे आहे. आणि *ते* राजकारण, धर्म, आणि सैतानी शक्ती एकत्रित मिळून त्याला सैतान बनवितात.

210 ख्रिस्ताचे पहिले आगमन मर्त्य होते. तो तीन वेळा येतो. ख्रिस्त तिघांत आहे. समजले? (पाहा तो कसा येतो; तो चारमध्ये येतो.) ख्रिस्ताला पाहा, पहिल्या आगमनावेळी तो मर्त्य म्हणून रक्त सांडण्यासाठी आणि मरण्यासाठी येतो. ते बरोबर आहे? ते त्याचे पहिले आगमन आहे. त्याचे दुसरे येणे हे रॅपचर आहे. आपण त्याला आकाशात अमर्त्य असे भेटतो. त्याचे तिसरे येणे, तो देहधारी परमेश्वर आहे. आमेन.[भाऊ ब्रॅन्हम

त्यांचे हात एकत्रित करुन एकदा वाजवतात—सम्पा.] परमेश्वर इम्मनुएल पृथ्वीवर राज्य करण्यास येतो! त्याचे केवळ तीन आगमन आहेत.

211 आता तुम्ही त्या स्वाराच्या चौथ्या अवस्थेवर लक्ष द्या. ह्या स्वाराची चौथी अवस्था मृत्यु आहे. *मृत्यु* म्हणजे "परमेश्वरापासून सार्वकालिक वेगळे होणे." हाच मृत्युचा अर्थ आहे, परमेश्वरापासून सर्वकाळासाठी वेगळे होणे.

212 आता, जर आपण ह्या स्वाराला विषयाबाहेर ठेवले आहे, जर आपण बायबलद्वारे दाखवले आहे, की हा स्वार कोण आहे; आणि आपण ते डोंगर आणि दुसऱ्या गोष्टी खोलात जाऊन विस्तृतपणे अभ्यासल्या आहेत. आणि आता गरुडाद्वारे त्याला "मृत्यु" हे नाव देण्यात आले. त्याला तेच नाव दिले आहे.

213 लक्षात ठेवा, संतजन मरत नाही, ते मरत नाही, झोपी जातात. "जो माझी वचने ऐकतो, आणि ज्याने मला पाठवले त्यावर विश्वास ठेवतो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे." ते बरोबर आहे. "त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही. तो मरणांतून जीवनात पार गेला आहे. पुनरुत्थान आणि जीवन मीच आहे." असे येशू म्हणाला, "जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल आणि जीवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही." लाजरस, मृत होता का? "तो झोपला होता."

214 "भिऊ नका, मुलगी मरण पावली नाही, परंतु झोपली आहे." ते उपहासाने त्याच्यावर हसले, ते खरे आहे? ओह, माझ्या प्रभू! समजले, संतजन मरत नाहीत.

215 परमेश्वरापासून वेगळे होणे, हे मृत्यु आहे, सर्वकाळासाठी मृत्यु आहे आणि ह्या स्वारास "मृत्यु" म्हटले आहे, म्हणून त्याच्यापासून दूर राहा. तो कोण आहे? एक संघटीत, संघटनेची प्रणाली आहे. प्रथम मंडळी संघटीत झाली जेव्हा त्याने कॉन्स्टटाईनची समज, निसीया सभेत स्विकारली.

216 काल रात्री, आपण त्या स्त्रियांचा अभ्यास केला आणि दाखवले की कशाप्रकारे ही पहिली वधू, तिच्या पतीने तीला जाणण्याआधी एदेन बागेत, परमेश्वराच्या वचनावरील अविश्वासाद्वारे पतीत झाली. आत्मिक वधू जी ख्रिस्ताच्या पेंटेकॉस्टच्या दिवशी जन्म पावली, ख्रिस्ताने तिला प्राप्त करण्याआधी काय घडले? ती रोम येथे पतित झाली. ती कशी पतीत झाली? सिध्दांतासाठी, तिने वचनाच्या पवित्रतेस गमावले. आमेन. ओह, बापरे!

217 होय, महाशय, मी—मी—मी अनुभव करीत आहे की हे विचार करता मला... पुन्हा प्रेरणा होत आहे. माझा अर्थ मुर्खपणाने वागणे नव्हे. मला तसे म्हणायचे नाही. परंतु तुम्हाला ठाऊक नाही की ते माझ्यासाठी काय आहे. मी ह्यासाठी चार दिवसांपासून बसलेलो आहे फक्त...आणि मला फक्त काहीतरी सांगायचे आहे की मला पुन्हा एक प्रकारचा मानवी अनुभव होत आहे. तुम्हाला ठाऊक आहे मला काय म्हणायचे आहे. होय. ठीक आहे मी तसे बोलण्यास सुरुवात करतो, आणि तुम्हाला माहीत आहे मला सर्वत्र दृष्टांत दिसतात. ते खरे आहे. पाहा, हेच कारण आहे मी पुन्हा परत येण्यासाठी काहीतरी बोलतो, आणि स्वतःला परत येण्यासाठी हलवितो. समजले?

218 तुम्ही कधी माझे निरिक्षण केले आहे जेव्हा मी गुप्त विचारांना प्रकट करतो? मी काहीतरी बोलेन ज्यामध्ये लोक हसतील; नंतर मी असे काहीतरी सांगेन, लोक रडतील, मग मी काहीतरी सांगेन ते रागावतील. मी असे काहीतरी पाहात असतो. आणि मी काहीतरी सांगतो की ते कसे होते, मग मी एक प्रकारचा प्रकाश त्यांच्यावर पाहतो, आणि पाहतो की काय घडते. मग मला कळते ते कोठे आहे. आणि मी जाणतो की ते बोलावीत आहे किंवा

नाही. जर ते नाही आहे...जो खरा विश्वासी आहे तो तेथे बसतो, हे खरे आहे. तेव्हा तू त्यांना बोलावतो म्हणतो, “तू *अमुक–अमुक* आहे.” पाहा.

219 आणि जेव्हा तुम्ही खाली जाता, आत्मा अभिषेक करण्यास तुम्हाला सुरुवात करतो, तेव्हा तुम्हाला प्रकाश सर्व बाजूंनी येताना दिसतो. म्हणून, तेच कारण आहे मी काहीतरी सांगतो, जे पुन्हा मागून सुरुवात करतो, ती पुन्हा नव्याने सांगण्यास सुरुवात होते, समजले.

220 मागील रविवारपासून मी खोलीत बसून अभिषेकाखाली प्रार्थना करीत आहे. आणि मला ठाऊक आहे हे खरे आहे. तुम्ही परमेश्वरावर विश्वास ठेवता. मला ठाऊक आहे तुम्ही ठेवता. तुम्ही ह्या आठवड्याच्या शेवटी पाहा. ओह. समजले? समजले? ठीक आहे. समजले?

221 आता, म्हणजे सर्वकाळासाठी परमेश्वरापासून वेगळे होणे आणि लक्षात ठेवा, आता, संतजन मरत नाही.

222 लक्षात ठेवा, त्याच्या वधूला फिकट घोडा देण्यात आला होता...मला म्हणायचे हे, ह्या स्वाराला पुढे जाण्यासाठी हा—हा फिकट घोडा देण्यात आला होता. त्याला पुढे जाण्यासाठी फिकट घोडा देण्यात आला होता. आता आपल्याला माहीत आहे ते काय होते. आपल्याला ठाऊक आहे ती मंडळी काय होती.

223 आणि आठवा, काल रात्री, पाहीले की, ती केवळ “कलावंतीण” नाही तर ती “अमंगळपणाची आई” होती.

224 आणि आपण पाहीले की तिला कशामुळे कलावंतीण म्हटले आहे, ती त्या तऱ्हेची स्त्री होती. अशा प्रकारच्या मिश्र श्रोत्यांपुढे असे शब्द बोलणे हे अशोभनीय आहे. परंतु बायबल तसे सांगते तुम्हाला समजले. म्हणून आपल्याला कळते की ती—ती अशी स्त्री आहे तिच्या लग्नाच्या प्रतिज्ञेशी अविश्वासू राहते. आणि तुम्ही पाहा, ती स्वतःला, स्वतःला, “स्वर्गाची राणी म्हणते.” (ती परमेश्वराची वधू असेल, ख्रिस्त परमेश्वर आहे.) आणि आपण पाहतो की ती व्यभिचार करते, आणि सर्व पृथ्वी तिच्या राजांना ती जारकर्म करण्यास लावते. आणि सर्व धनवान पुरुष, आणि महान पुरुष. सर्व पृथ्वी तिच्या मागे गेली. समजले?

225 आणि मग आम्ही पाहतो की ती काही मुलींना प्रसवली आणि त्या वेश्या होत्या. ही वेश्या काय आहे परंतु एका वेश्येसारख्याच आहेत. एक जारकर्मी, जारकर्म, दुष्ट, व्यभिचार करणारी आहे. त्यांनी काय केले? त्यांनी संप्रदाय, प्रणाली केली, मनुष्याने बनवलेली प्रणाली शिकवली, पेंटेकॉस्ट आणि संपूर्ण समूह हेच आहेत!

226 आता, पेंटेकॉस्टलवाले, तुम्ही आपला—आपला विवेक खिशात ठेवू नका, मला तुम्हाला काही सांगू द्या. आपण ह्या गोष्टी समोरासमोर पाहूया. आपण ह्या खिचावाच्या मार्गात खूप मागे आहोत. येथे पाहा.

227 आपण लावदिकीयी मंडळीच्या युगात राहत आहोत. आणि ते इतर सर्व मंडळ्यात सर्वात हास्यास्पद मंडळीचे युग आहे. कोमट, आणि एकटेच जेथे ख्रिस्त मंडळीबाहेर आहे. तो आत येण्याचा प्रयत्न करीत आहे. तो पेंटेकॉस्टचा संदेश आहे. म्हणतो, “मी श्रीमंत आहे!” मुला तू अगोदर गरीब होता. आता काय तू खरोखरीच श्रीमंत झाला आहेस. “तुला कशाचीही गरज नाही!” आणि—आणि ओह, तू काय होतास!

228 तो म्हणतो, “तू उघडावाघडा, दरिद्री, आंधळा, दीन, अभागी आहेस, आणि हे तुला कळत नाही.”

229 आता, जर एक मनुष्य बाहेर रस्त्यावर उघडा असेल आणि ते त्याला कळले, तर तो त्याला—तो त्याला स्वतःला मदत करण्याचा प्रयत्न करील की नाही. परंतु जेव्हा त्याला ते माहीत नाही आणि तर तुम्ही त्याला काही फरक सांगू शकत नाही, तेव्हा तो मोठ्या दयनीय स्थितीत आहे. देवा त्याच्यावर दया कर. बरोबर आहे. लक्ष द्या. ओह, बाप रे!

230 आता, लक्षात घ्या, हा ख्रिस्तविरोधक, तो स्वतः एक पुरुष आहे, त्याची वधू, जी त्याची मंडळी आहे, "जीला पश्चाताप करण्यासाठी समय दिला होता, आणि तिने" त्या थुवतीरा मंडळी युगात पश्चाताप केला नाही. तुम्हाला त्याचे स्मरण आहे का? तुम्ही...

231 आपण फक्त एका मिनिटासाठी मागे जाऊया, एका मिनिटासाठी मागे जाण्याने आपले नुकसान होणार नाही. आपण एका मिनिटासाठी, प्रकटीकरणाच्या 2ऱ्या अध्यायाकडे जाऊया...आपण 2रा अध्याय वाचूया, जो थुवतीरा युगाविषयी आहे. आता ह्याकडे लक्ष द्या, आता घाई करुया. आपण समाप्त होण्याच्या वेळेकडे आलो आहोत, आणि अजून आपण चौथ्या शिक्क्याला सुरुवात केली नाही. परंतु, थुवतीरा मंडळीवर लक्ष द्या. 2ऱ्या अध्यायाच्या 18 व्या वचनापासून त्याची सुरुवात होते.

> *...थुवतीरा येथील मंडळीच्या, दुताला (हा संदेशवाहक आहे) लिही. ज्याचे डोळे अग्नीच्या ज्वालेसारखे आहेत...आणि ज्याचे पाय सोनपितळेसारखे आहेत, तो देवाचा पुत्र म्हणतो.*
>
> *तुझी कृत्ये आणि तुझी प्रीती विश्वास...सेवा व धीर ही मला ठाऊक आहेत, आणि तुझी शेवटची कृत्ये पहिल्या; कृत्यांपेक्षा अधिक आहेत.*
>
> *तरी तुला दोष देणे मला प्राप्त आहे, कारण ईजबेल नावाची जी स्त्री आपणाला संदेष्ट्री म्हणविते ...*

232 तिथे तुम्ही आहा. तुम्ही तिला बायबलमध्ये जाणता. ती अहाबाची पत्नी होती. आणि येथे जी स्त्री, मंडळी, ईजबेल आहे, ती खोट्या संदेष्ट्याची पत्नी आहे, जो देवाचा खरा संदेष्टा असावयास हवा होता. तो पोप, बरोबर आहे, खरा संदेष्टा आणि त्याची पत्नी, ईजबेल. आता अहाब खराखुरा यहुदी असावयास हवा होता, परंतु तो लबाड होता, तुम्हाला ते ठाऊक आहे, कारण त्याची पत्नी त्याला जसे पाहीजे तसे चालवीत होती. आपण पहातो, ईजबेल तिचे धन घेते. आणि त्याचे मार्गदर्शन त्यांना तसे हवे तसे करते.

> *...ती आपणाला संदेष्ट्री म्हणविते,* (समजले?) *माझ्या दासात शिकवून भूलवते* (पाहा, ईजबेलची शिकवण संपूर्ण देशभर पसरली आहे.) *जारकर्म करण्यास आणि...मूर्तीला दाखविलेला नैवेद्य खाण्यास.*
>
> *...तिने पश्चाताप करावा म्हणून मी तिला अवकाश दिला* (पाहा?) *आणि तिने पश्चाताप केला नाही.*

233 ह्या पुढच्या वचनाकडे लक्ष द्या.

> *...मी तिला अंथरुणाला खिळून टाकीन* (ते नरक आहे), *आणि तिच्याबरोबर व्यभिचार करणाऱ्या लोकांस, तिने शिकविलेल्या कृत्यांबद्दल मोठ्या संकटात...* (ते महासंकटात जातील. वधू नव्हे, आता)*...त्यांनी पश्चाताप न केल्यास.*

234 आता, येथे लक्ष द्या.

> *...मी तिच्या मुलाबाळांना* (तिच्या वेश्या) *जीवे मारीन.* (आध्यात्मिक मृत्यु)*;...*

235 तुम्ही त्यावर विश्वास करता? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] ते वचन आहे. “मी त्यांना जीवे मारीन.” आणि जर ते मारले गेले, ते सर्वकाळासाठी वेगळे होतील. बरोबर आहे. स्मरण ठेवा, त्याने तिला पश्चाताप करण्यास अवकाश दिला.

236 थुवतीरा युग हे अंधकाराचे युग होते. काळ्या घोड्याचा स्वार त्याच समयात स्वार झाला. जेव्हा सर्व मिस्सा बली आणि सर्व गोष्टीसाठी पैसे द्यावे लागते होते. सर्व प्रार्थना आणि—आणि नोवेना आणि अशा सर्व गोष्टींसाठी. आता त्याचा काळा घोडा पाहा, थुवतीरा युगात (काय?) पश्चाताप करण्याचे नाकारल्यानंतर त्याच्या अंतिम सेवकाईसाठी, काळ्या घोड्यावरुन फिकट रंगाच्या घोड्यावर जो मृत्यु आहे स्वार झाला आहे.

237 आता, मी कदाचित येथे व्यक्तीना थोडासा धक्का देईन. देवाला नाकारले म्हणजे देवाच्या बोलावण्याला नाकारणे, असे तुम्ही कधीतरी शेवटच्या समयी कराल. आणि जसे त्या मंडळीने केले तर ती समाप्त झाली. परमेश्वराचा धीर, मनुष्याशी सदैव झगडत राहणार नाही. समजले?

238 आणि जेव्हा तिने ते नाकारले, आणि ते स्विकारण्यास नाकारले, तेव्हा ती बदलली आणि गेली…आता तिला “मृत्यु,” हे नाव मिळाले. वेगळे होणे. परमेश्वर म्हणाला, “मी तिच्या मुलाबाळांना, प्रोटेस्टंट आणि त्यांच्यातील सर्वांना जीवे मारीन सर्वकाळासाठी वेगळे करीन.” तेच थुवतीरा युग, अंधकाराचे युग आहे. त्याचा काळा घोडा, आता त्याच्या शेवटच्या सेवकाईसाठी मृत्युत बदलला आहे.

239 पाहा, मंडळीची युगे ह्या शिक्क्यामध्ये कशी मिसळली आहेत? ती अगदी मिसळलेली आहेत आणि आपल्याला माहीत आहे ते बरोबर आहे. पवित्र आत्मा चूक करीत नाही. तुम्हाला माहीत त्याने आपल्याला एक महान प्रमाण दिले, जेव्हा मागे आपण मंडळीच्या युगांचा अभ्यास केला.

240 परमेश्वराचा प्रेमळपणा, सहनशीलता पाहा! त्याने तिच्यावर न्याय बजावण्याअगोदर, त्याने तिला पश्चाताप करण्यासाठी अवकाश दिला. आणि हे मी प्रभूच्या नावाने सांगतो. त्याने प्रोटेस्टंट मंडळीला हीच गोष्ट दिली आहे आणि ती पश्चाताप करणार नाही. संदेशाने सर्वत्र हादरा दिला आहे, आणि ती पश्चाताप करणार नाही. तिच्याकडे तिची स्वतःची शिकवण आणि मानलेली तत्वे असतील, मी पर्वा करीत नाही तुम्ही किती वचन समजावितात.

241 जसे मी शिकागो येथे, दुसऱ्या दिवशी, येथे उपस्थित असणाऱ्या लोकांपेक्षा अधिक सेवकांसमोर सांगितले होते! आणि त्यांनी माझ्या शिकवणीवर, सर्पवंश आणि ह्या सर्व इतर गोष्टींविषयी निर्भत्सना केली. मी म्हणालो, “कोणीतरी तुमचे बायबल घेऊन या, आणि येथे या आणि माझ्या बाजूला उभे राहा.” आणि कोणीही काहीही बोलले नाही.

242 टॉमी हिक्स म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम, मी—मी ह्यासारखे ह्यापूर्वी कधीच ऐकले नाही. मला तीनशे अशा टेप्स पाहीजे, मी त्यांना माझ्या सर्व सेवकांना पाठवणार आहे.”

243 तेथे सुमारे पन्नास किंवा पंचाहत्तर जण म्हणाले, “मी तेथे पुन्हा बाप्तिस्मा घेण्यासाठी येत आहे.” ते आले का त्यांच्यातील? एकही आला नाही. का? त्याने त्यांना पश्चाताप करण्यासाठी अवकाश दिला! आणि तो तुमच्या लेकरांना जीवे मारील, आध्यात्मिक मृत्यु.

244 आपण प्रभूची इच्छा असेल तर उद्या रात्री, किंवा शनिवारी रात्री, त्या पीडांवर ज्या येणार आहेत त्यावर पाहू. तुम्ही तेथे काय घडते. ह्यावर लक्ष द्या.

245 जसे त्याने मिसराला दिला, त्याने मिसराला पश्चाताप करण्यास अवकाश दिला. आणि शेवटची पीडा काय होती? मृत्यु होती.

246 तीच अंतिम पीडा पेंटेकॉस्ट मंडळीवर प्रहार करील, जी आध्यात्मिक मृत्यु आहे. ती मृत आहे. ते प्रभूच्या नावाने सांगत आहे. ती आत्मिकरित्या मृत आहे. त्याने तिला पश्चाताप करण्यासाठी अवकाश दिला, आणि तिने तो नाकारला. आता ती मृत आहे. ती पुन्हा कधीच उठणार नाही.

247 आणि तेथे ते लोक एपिस्कोपिलियन्स आणि धर्मगुरु, आणि इतर, सर्वांना आता आणण्याचा प्रयत्न करतात, आणि त्यांना, "पवित्र फादर *अमुक-अमुक* म्हणतात." का? त्यांना त्यांची लाज वाटायला पाहीजे. मनुष्य किती अंध बनू शकतो! येशूने म्हटले नाही का? जेव्हा ती मुर्ख कुमारीका तेल विकत घेण्यास येईल, तिला ते मिळणार नाही!

248 तुम्ही सर्व लोकांना म्हणताना ऐकता, "माझ्याकडे पवित्र आत्मा आहे. मी अन्य भाषेत बोलतो." परंतु ते अशाप्रकारच्या मंडळीच्या आसपासही येऊ इच्छित नाही. "ओह, तुम्हाला माहीत आहे, मी विश्वास करीत नाही की मला अशा प्रकारच्या जागेच्या जवळपास जायला पाहीजे." आणि मग म्हणता तुमच्याकडे पवित्र आत्मा आहे?

249 परंतु तुम्हाला तुमचे प्रतिष्ठीत मार्ग पाहीजे. तुम्ही बाबेलमध्ये राहू इच्छिता आणि स्वर्गीय आशीर्वादांचा आनंद ही घेऊ इच्छिता. तुम्हाला तुमची निवड करावी लागेल. तुम्ही एकाच वेळी जगात राहणे आणि परमेश्वराची सेवा करु शकत नाही येशूने म्हटले, तुम्ही एकाच वेळी देवाची आणि मामोनाची चाकरी करु शकत नाही. जर तुम्ही अपेक्षा करीत नाहीत...

250 जर तुम्ही खरोखरीच वाचलेले आहात, तर तुम्ही त्या सभांचा आस्वाद घ्याल जेथे पवित्र आत्मा त्यास प्रकट करतो आणि दाखवतो की देवाचे वचन असे आहे.

251 कोणी म्हटले आहे, "लोक खूप आवाज करतात. त्यामुळे मला चिंताग्रस्त करतात." जर तुम्ही स्वर्गात गेला तर चिंताग्रस्त व्हाल. आणि तुम्ही फक्त विचार करा, जेव्हा सर्व तेथे आहेत, तर ह्याविषयी काय? ओह, बाप रे! प्रभूला असे कसे करण्यास...

252 तो सहनशील आहे, जसे तो नोहाच्या दिवसात होता. त्याने खूप प्रयत्न केला त्याने एकशेवीस वर्ष सहन केले की त्यांनी पश्चाताप करावा. त्यांनी तो केला नाही.

253 मिसराच्या दिवसात, त्याने पीडा आणि इतर सर्व गोष्टी पाठविल्या. त्यांनी पश्चाताप केला नाही.

त्याने योहानास पाठवले. ते पुन्हा वळले नाहीच.

254 त्याने मरण्यासाठी येशूला पाठवले, की त्या पूर्ण समुहास वाचवावे जे परमेश्वराचे वचन ऐकतील.

255 आणि आता, अंतिम दिवसात, त्याने पुन्हा अभिवचन दिले की तिला बाहेर बोलावण्यासाठी तो एक संदेश पाठवील, आणि मुळचा विश्वास पुन्हा वचनाकडे आणील. आणि ते तो ऐकणार नाही. ते त्यांच्या शिकवणीत आणि रितीरिवाजात इतके दुराग्रही आहेत, त्यांना अजूनही ते नकोच. ओह, ते विचार करतात की...जर एखादा स्वर्गदूत खाली येईल; परंतु देव तसे करणार नाही.

256 तो जे अज्ञानी आणि मुर्ख असे ज्यांना क्वचितच तुमची अ ब क किंवा—किंवा काही ठाऊक आहे असे निवडतो. आणि तो अशा प्रकारचा व्यक्ति घेतो, कारण तो अशांना घेतो जे काहीच नाही आणि मग त्याच्याद्वारे कार्य करतो. जोपर्यंत काहीजण विचार करतात की

ते काहीतरी आहेत, तर ते त्यांतून काहीच करु शकत नाही. त्याने सदैव तसेच केले आहे. तुम्हाला देवाबरोबर काही बनण्यासाठी तुम्हाला शून्य बनावे लागेल. ओह, माझ्या देवा!

257 लक्ष द्या, जरी, “त्याने तिला पश्चाताप करण्यासाठी अवकाश दिला, परंतु तीने तो केला नाही.”

258 त्याने तिला पश्चाताप करण्यास पुन्हा अवकाश दिला, तीने तो केला नाही…तिच्या नकाराने सैतानाला तिच्यामध्ये येण्यासाठी आणि देहधारी होण्यासाठी परिपूर्ण मार्ग केला. ते बरोबर आहे. तिच्यामध्ये त्याने स्वतःला देहधारी केले कारण तिने वचन नाकारले. आणि अगदी त्याच गोष्टींमुळे प्रोटेस्टंट मंडळी, वेश्या बनली, कारण तिने परमेश्वराचे प्रकट झालेले सत्य वचन नाकारले आहे, आणि त्याच गोष्टीने सैतानाला तिच्यात येण्यासाठी, आणि त्याला स्वतःला देहधारी होण्यासाठी जागा दिली आहे. आणि जेव्हा ते एकत्र संघटीत होतात तेव्हा तो एक श्वापदाची मुर्ती बनवतील, आणि अगदी तसेच घडत आहे. जसे देवाने सांगितले आहे. ते बरोबर आहे. आमेन.

259 जर माझ्याकडे शिक्षण असते, मी ते सांगू शकलो असतो. माझ्याकडे शिक्षण नाही. मी फक्त पवित्र आत्म्यावर आशा ठेवतो की त्याने तुम्हाला हे प्रकट करावे. आणि तो ते त्यांना करील जे…ते बरोबर आहे. तो ते करील. होय. लक्ष द्या.

260 पाहा, तिने येथे काय केले. तिने परमेश्वराचा तिच्यासाठी असलेला पश्चातापाचा संदेश नाकारला. तीने ख्रिस्तविरोधी सुरुवात केली, आणि तीच ती होती. ती खोटा संदेष्टा म्हणून आली, आणि जेव्हा ती खोटे शिक्षण देऊ लागली, सैतान तिच्यामध्ये देहधारी झाला. तेव्हा, ह्या सर्वात सुध्दा, देवाने तिला पश्चाताप करण्यासाठी अवकाश दिला, तीला मिळवण्याचा प्रयत्न केला.

261 पाहा, किती धीर? किती अद्भूत प्रेम! तेथे त्यासारखे प्रेम नाही! त्यांच्याकडे पाहा, ते त्याच्या तोंडावर थुंकले आणि गोष्टी, त्याने त्यांना क्षमा केली. पाहा, तो परमेश्वर आहे. पाहा…

262 देवाचा संदेश नाकारते! पाहा, तीला पश्चाताप करण्यास सांगण्यात आले होते, जेथून ती पडली तेथे परत जाण्यास सांगितले होते.

263 आणि ती कोठून पडली होती? वचनांतून बरोबर आहे. हव्वा कोठून पडली होती? [मंडळी म्हणते “वचनांतून”—सम्पा.] वचनांतून! संप्रदाय कोठून पडले होते [“वचनांतून.”] होय असेच आहे. समजले? दुसरा कुठलाही मार्ग नाही. तुम्हाला तर प्रत्येक वेळी, वचनाकडेच परत येणे आहे, वचनाकडेच परत येणे आहे. समजले? आणि ते अशा कार्यप्रणालीत जातात जी त्यांना वचनापासून दूर नेते. लक्ष द्या.

264 पाहा, तिला पश्चाताप करण्यासाठी, परत जाण्यासाठी अवकाश दिला होता. *पश्चाताप* म्हणजे “परत जाणे, मागे फिरणे, परत वळणे.” *पश्चाताप*, “परत जाणे.” आणि तीला परत जाण्याकरिता एक मोठा अवधी दिला होता…

265 आता, स्मरण करा, ती मुळ, पेंटेकॉस्टची मंडळी होती जिच्यावर पेंटेकॉस्टच्या दिवशी पवित्र आत्मा उतरला होता. बायबल अभ्यास करणाऱ्या किती जणांना हे माहीत आहे? निश्चितच ती होती. पाहा, ती कोठून पडली होती? ती वचनांतून पडली, आणि मानवी तत्वे स्विकारली…तीने पवित्र आत्म्याऐवजी, पवित्र पुरुषाची अपेक्षा केली, जो “डॉ. एलएल., पीएच., क्यू. यू.” असेल. आणि मग त्याला पोप केले. समजले? निश्चितच. तीला, तेच तीला हवे होते की कोणीतरी तीच्यासाठी प्रार्थना करील. कोणीतरी…तीने तीचे पैसे दिले, आणि तेच सर्व तीला करावे लागले होते. समजले?

266 आता, आजही तीच गोष्ट आहे. जोपर्यंत बसण्यासाठी चर्चमध्ये लांब बाक मिळतात. ते दानपात्रात भरपूर पैसे टाकतात. ते चांगले आहे. ते त्या मंडळीचे सदस्य आहेत. त्यांना तुम्ही वचनाविषयी काहीच सांगू नका; त्यांना त्या विषयी काही जाणून घ्यायचे नाही. त्या तिच्या मुली आहेत.

267 आता, ती कोठून पडली? ती प्रेषितांच्या आणि संदेष्ट्यांच्या प्रेषितीय मूळ वचनांतून पडली. तेथूनच ती पडली. तेथूनच प्रोटेस्टंट मंडळी पडली होती.

268 पश्चाताप कर! परत जा! खूप उशीर होण्याआधी मागे वळ. अगोदरच खूप उशीर झाला नाही काय. ह्या दिवसांतील एके दिवशी कोकरा त्यांचे स्थान सोडील, आणि तेव्हा सर्व समाप्त होईल. तसेच तीच्या मुलींनीही त्याचा न्याय होण्याआधी “परत मागे या,” असे सांगण्यात आले आहे.

269 आता, त्यांना अंतिम संदेश, ह्या संदेष्ट्याच्या समयात मिळतो ज्याविषयी मी बोलत आहे. ज्यांची त्याविषयी कित्येक पुस्तके मी वाचत आहे. मला ठाऊक आहे. खरे, चांगले, समंजस आत्मिक विचार करणारे मनुष्य जाणतात की तो येत आहे, त्यांना हे ठाऊक आहे तो येणार आहे. पाहा, ते...परंतु त्याची समस्या ही आहे, की तेच सांगत राहतात की, “आम्हाला त्याची आवश्यकता आहे. असे होणारच आहे.” आणि जेव्हा तो येईल ते इतके नम्र असतील; ते कदाचीत त्याला ओळखणार नाही. ते अगदी तसेच असेल जसे त्यांना त्यावेळेला केले होते. ते बरोबर आहे. लोक त्याविषयी लिहीतील, आणि सर्व गोष्टी, म्हणतील, “ओह, होय, आम्हाला त्याची आवश्यकता आहे.” आणि ते त्यांच्यासमोर प्रकट होऊ दे, आणि तरीही ते तसेच चालत राहतात, पाहा. त्यांनी सदैव तसेच केले आहे.

270 आता, मुळ वचनाकडे लक्ष द्या...तीला परत जाण्यासाठी, पश्चाताप करावा लागेल, तसेच तीच्या मुलींनाही विचारण्यात आले. विवश होऊन...त्यांचा न्याय केला जाईल, आणि त्यांना त्याच अंथरुणावर फेकेन आणि तीच्यासह जीवे मारीन. त्यांना मूळ वचनाकडे परत वळण्यास सांगितले, प्रेषितीय शिकवणीकडे परत जाण्यास सांगितले. परंतु, त्या त्यांच्या रीतीरिवाज आणि गोष्टींशी, इतक्या बांधलेल्या आहेत, त्या ते करणार नाहीत. ते फक्त त्याची मस्करी करतात.

271 तेव्हा ते काय करतात? ते शेवटी श्वापदासाठी मूर्ती बनवतात, दुसरी शक्ती; लक्ष द्या, आणि ती कोकऱ्याच्या वधूशी तसेच, वागतात जसे तीने प्रकटीकरण 13:14 मध्ये केले. तेच ते करतात, सतावतात, अगदी तीच गोष्ट करतात, मंडळ्या ख्रिस्ताच्या वधूची मस्करी तशाचप्रकारे ते करतात, जशी रोमने केली. अगदी तशाच पध्दतीने. होय, महाशय. ती कोकऱ्याच्या वधूशी तसेच वागते जसे प्रकटीकरण 13:14 मध्ये तिने केले.

272 आता, लक्ष द्या. आपण हे परमेश्वराच्या वचनाच्या अभिवचनाद्वारे पाहतो, तो—तो तीच्या मुलाबाळांना, संप्रदाय, तीच्या मुलींना आत्मिक मृत्यूने मारेल. आता, हे प्रकटीकरण 2:22 आहे ते विसरु नका. मारणे, म्हणजे मृत्युकडे नेणे. आणि *मृत्यु* हे “परमेश्वराच्या उपस्थितीपासून सर्वकाळासाठी वेगळे होणे आहे.” मित्रांनो, त्याचा विचार करा. त्याचा विचार करा. तुम्ही मनुष्याने बनविलेल्या रीतीरिवाजांवर विश्वास ठेवू नका. जे काही वचनाविरुध्द आहे, तुम्ही त्यापासून दूर राहा.

273 आता लक्ष द्या, येथे बायबलमध्ये पाहा. बायबल सांगते त्याचे नाव अधोलोक होते, आणि...मला म्हणायचे आहे:

...त्याचे नाव *मृत्यु होते, आणि अधोलोक त्याच्या पाठोपाठ चालला होता.*

274 आता, स्वाभाविकरीतीने, अधोलोक सदैव मृत्यूच्या पाठोपाठ चालतो. जेव्हा स्वाभाविक मनुष्य मरतो, अधोलोक त्याच्या पाठोपाठ चालतो. ती कबर, अधोलोक, पाहा, हे नैसर्गिक गोष्टींत होते. परंतु आत्ममिकदृष्ट्या, तो अग्नीचे सरोवर आहे, बरोबर आहे, सर्वकाळासाठी वेगळे होणे आहे, जेथे त्यांना जाळले जाते.

275 आणि—आणि मलाखी 4 सांगते, "त्याचे मूळ, फांदी, वगैरे काहीच राहू देणार नाही." हा एक मार्ग आहे, ज्याद्वारे पृथ्वी स्वत:स हजार वर्षांच्या काळासाठी शुध्द करते. समजले?

276 तुम्ही लक्ष दिले, की हा स्वार "तो" आहे? आणि "तो" आणि "त्याच्या" हातात होते. "पुरुष," तो एक खोटा संदेष्टा आहे. परंतु त्याच्या वधूला मंडळी म्हटले आहे, "ती," ईजबेल आहे. अहाब; ईजबेल. का, हे अगदी इतर गोष्टीसारखे स्पष्ट आहे. पाहीले? समजले?

277 तीच्या *मुली* "ती" आहे, परंतु त्या कधीही एका पुरुषाची अधीनता स्विकारत नाही; प्रोटेस्टंट अजूनही तत्वे, त्यांच्या शिकवणी, संप्रदाय, प्रणालीमध्ये वेश्या आहे. ते...ते हे सांगतात.

278 लक्ष द्या. हे सर्व कशाकडे जात आहे? मला वाटते, आता आपल्याकडे येथे बारा, चौदा मिनिटे आहेत; पाहा हे सर्व कशाकडे जात आहे? हे काय आहे? ते पुन्हा तेथेच जातात, जे त्यांनी मागे केले होते; जसे त्यांनी स्वर्गात सुरु केले होते. हे सर्व अंतसमयाच्या युध्दाकडे येत आहे.

279 स्वर्गात, प्रथम, ज्या गोष्टीची सुरुवात झाली, ते एक युध्द होते. लुसिफरला स्वर्गातून खाली फेकण्यात आले होते, आणि तो पृथ्वीवर आला. तेव्हा त्याने एदेन बिघडवली; तेव्हापासून तो बिघाड करीत आहे. आणि आता, स्वर्गातील युध्द, पृथ्वीवर येत आहे; आणि ते ह्या अंतिम समयात हर्मगिदोन म्हटलेल्या युध्दामध्ये पृथ्वीवर समाप्त होणार आहे. आता, तुम्हा कोणाला ते माहीत आहे. युध्दाला सुरुवात स्वर्गात झाली होती, पवित्र, आणि म्हणून त्यांनी त्याला बाहेर टाकले. मीखाएल आणि त्याच्या स्वर्गदूतांनी त्याला खाली टाकले होते, तो पळाला होता. आणि त्यांनी त्याला थेट एदेनमध्ये फेकले होते, आणि येथून युध्दाला खाली सुरुवात झाली...

280 परमेश्वराने त्याची सर्व लेकरे त्याच्या वचनाद्वारे तटबंदी बांधून सुरक्षित केली आहे. आणि हव्वेने तीची मान बाहेर काढली आहे, म्हणाली, "मी विश्वास ठेवते कदाचित तू बरोबर आहेस." आणि तेथे असे झाले. आणि हे तेव्हापासून असेच होत आहे. तेव्हा देव खाली आला, आणि आता त्याला...तो त्यांना सोडविण्यासाठी खाली आला जे खाली येतील.

281 जसे मी म्हणालो, देव एका महान कंत्राटदारासारखा आहे. त्याने त्याचे सर्व साहीत्य पृथ्वीवर टाकले आहे, आणि तेव्हा तो त्याच्या इमारती बांधतो. आता स्मरण ठेवा, पृथ्वीवर धान्याचे बीज पडण्याअगोदर, पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पडण्याअगोदर, तुमचा देह पृथ्वीवर पडलेला होता, कारण तुम्ही पृथ्वीची धूळ आहात. समजले? तुम्ही आहात. परमेश्वर कंत्राटदार आहे.

282 आता त्याने हे अशाप्रकारे केले होते, तो खाली आला आणि (जसे त्याने आदामाला केले) त्याने थोडेसे कॅल्शिअम, पोटॅशिअम आणि कॉस्मिक प्रकाश घेतला, आणि म्हटले, "हा माझा आणखी एक मुलगा." समजले? मग त्याने आणखी काही पुत्रांना अस्तित्वात आणले, आणि "हू!" "हा आणखी एक पुत्र आहे."

283 परंतु हव्वेने काय केले? तीने तो मार्ग भ्रष्ट केला आणि तीने त्यास लैंगिक सबंधाद्वारे आणले, तेव्हा मृत्यूने त्यावर प्रहार केला.

284 आता परमेश्वर काय करीत आहे? त्याचे तेथे खाली त्या बीजांतील कित्येक जण, ज्यांना पूर्वीच नेमलेले आहे, खूप जण अगावूच नेमलेले असे आहेत. आणि, मग, अंतिम समयात तो म्हणणार नाही, "हव्वा ये, आणि आणखी एका पुत्रासाठी गर्भवती हो." तो ("हू!") हाक मारील, आणि मी उत्तर देईन. बस हेच सर्व आहे. असेच आहे. तो एक विचार आहे. जेव्हा तो अंतिम जीव आत आणला जाईल. तेव्हा हे पूर्ण होईल.

285 आता युध्दास स्वर्गात सुरुवात झाली. ते युध्द पृथ्वीवर हर्मगिदोनाच्या युध्दात युध्दाच्या रुपात समाप्त होईल.

286 आता आपण लक्ष देऊया, आणि हे उघडताना पाहूया. आणि या कदाचित आपण ते उघडू शकतो. प्रभू आम्हास ह्या समयी हे करण्यास सहाय्य करो. ते उघडताना लक्ष द्या.

287 आता, तो रहस्यमय स्वार, काय करतो ह्याकडे लक्ष द्या. "विरोध करतो," पश्चाताप करण्यास नकार देतो आणि परत मूळ रक्ताच्या वचनाकडे जाण्यास नकार देतो. शब्द रक्त आणि देह झाला. समजले? तो तेथे परत जाण्यास नकार देतो. तो ख्रिस्तविरोधी आहे. तो सत्यवचनरुपी वधूचा...तो सत्यवचनाच्या वधूला विरोध करतो. त्याची स्वतःची वधू घेतो! तो ह्या खऱ्या वधूचा देखिल विरोध करतो. आणि तो त्याची स्वतःची वधू घेतो, आणि तो तीला धर्माच्या स्वरुपात ज्यास रितीरिवाज आणि मतप्रणाली म्हणतात, त्याच्याकडे आणतो. समजले? आणि आता तो पवित्र वधूला पाहून तो तीच्या विरूध्द आहे. आणि त्याने त्यांची स्वतःची वधू जीला ख्रिस्तविरोधी म्हणतात, ख्रिस्तविरोधी शिक्षणाद्वारे तयार केली आहे, आणि आता प्रेमाची एकता असण्याऐवजी, नियंत्रण करीत आहे, रक्ताखाली आराधना करण्याऐवजी, त्याच्याकडे संप्रदाय आहेत. वचन घेण्याऐवजी, त्याने रितीरिवाज, मतप्रणाली, आणि अशा गोष्टी घेतल्या आहेत.

288 जसे प्रोटेस्टंट म्हणतात, "प्रेषितांचे रितीरिवाज." माझी इच्छा आहे की तुम्ही हे शब्द बायबलमधून शोधून दाखवावे. बायबलमध्ये प्रेषितांची कुठलीच मतप्रणाली नाही.

289 जसे खूप वेळ झाला आहे किंवा अन्य कोठे सांगितले होते. जर प्रेषितांची काही रितीरिवाज होते, ते प्रेषितांची कृत्ये 2:38 मध्ये आहे. केवळ हेच आहे की जे मला ठाऊक आहे की त्याचा रितीरिवाज होता. तेच करण्यासाठी त्यांनी सर्वांना सांगितले. जेव्हा त्यांच्यातील कोणी सापडला तो ख्रिस्ती असल्यासारखा दिसला, त्याने विचारले, "तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुला पवित्र आत्मा मिळाला काय?"

ते म्हणाले, "आम्हास हे ठाऊक नाही..."

की त्याने म्हटले, "तर तुम्ही कसला बाप्तिस्मा घेतला?"

290 आता, येशूच्या नावाने बाप्तिस्मा घेणे किंवा आपला प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घेणे हे चांगले आहे. परंतु हेच सर्व काही नाही, महाशय. तुम्ही अशाप्रकारे पन्नास वेळा बाप्तिस्मा घेऊ शकता, आणि जोपर्यंत पवित्र आत्म्याच्याद्वारे अंतःकरण बदलत नाही. त्याने काही चांगले होणार नाही. ह्या सर्व गोष्टी एकत्र झाल्या पाहीजे. लक्ष द्या, तोच—तोच ख्रिस्त आहे!

291 ख्रिस्तविरोधी खऱ्या वधूच्या शिक्षणाला नाकारतो, आणि म्हणून त्याची स्वतःची वधू आता घेतली आहे. आणि तीला त्याच्या स्वतःच्या रितीरिवाजाखाली बांधत आहे, त्याची स्वतःची वधू घेतो आणि तीला एक संप्रदाय बनवितो! ती इतर संप्रदायांना जन्म देते जसे पवित्र वचनात लिहीले आहे; मुलींना जन्म देते...ती अगदी तीच्या

आईसारखीच, स्वाभाविक, जगिक सांप्रदायिक; बनली आहे; ती आत्मिक वधूला, वचनाला विरोध करते.

292 ते असे म्हणत नाही की त्यांच्या मंडळीशी संबंध नाही. तुम्ही संप्रदायातील व्यक्तीविषयी बोला; "निश्चितच, मी मंडळीचा सदस्य आहे." तुम्ही ख्रिस्ती आहात का? "मी मंडळीचा सदस्य आहे." त्याचा त्या गोष्टीशी काहीएक संबंध नाही! ते म्हणतात... तुम्ही मंडळीतील नाही...तुम्ही कदाचित ज्यास मंडळी म्हणतात, त्याचे सदस्य असाल, पाहा, ती खरी मंडळी नाही. त्या खऱ्या मंडळ्या नाहीत. ते विश्रामगृहे आहेत जेथे लोक ऐकत्र येतात, आणि लोक जसे "एकाच प्रकारचे गुणवैशिष्ट्ये" असणारे लोकमतांमध्ये एकत्र होतात.

293 परंतु तुम्ही एक मंडळी आहात, आणि ती ख्रिस्ताची रहस्यमय शरीर आहे. आणि तुम्ही त्याचे सदस्य बनत नाही तुम्ही त्यामध्ये जन्म घेता.

294 जसे मी नेहमी म्हणतो, मी ब्रॅन्हम कुटूंबात 53 वर्षापासून आहे, आणि त्यात कधीच सामिल झालो नाही. मी त्यांमध्ये जन्मलो होतो. समजले?

295 आता लक्ष द्या. हे सुंदर रितीने दर्शकाच्या रुपात दाखवले आहे. माझ्या—माझ्याकडे...ते वचन येथे लिहीलेले आहे, परंतु...आपल्याकडे त्याकडे जाण्यासाठी वेळ नाही; जसे एसाव आणि याकोब.

296 आता, एसाव हा एक धार्मिक मनुष्य होता. तो अविश्वासी असल्याचा दावा करीत नव्हता. तो त्याच देवावर विश्वास ठेवीत होता. ज्याच्यावर याकोबाने विश्वास केला, तोच परमेश्वर ज्यावर त्याच्या पित्याने विश्वास केला. परंतु तो केवळ एक लाजरा किंवा आपले भाव प्रकट न करणारा होता...तो खूप चांगला नव्हता. तो—तो तसाच होता. नैतिकतेच्या दृष्टीने तो खरोखरीच एक—एक याकोबापेक्षा अधिक चांगले वागणारा मनुष्य होता. परंतु, तुम्ही पाहा, त्याने विचार केला नाही..."ओह! तो ज्येष्ठपणाचा हक्क आहे काय?" आणि त्याने ज्येष्ठपणाचा हक्क विकला. समजले?

297 परंतु, याकोब, त्याच्याकडे एसावासारख्या मोठ्या गोष्टी नव्हत्या. त्याच्याकडे एसावासारखे वतन नव्हते. परंतु तेथे एक गोष्ट होती. जी याकोबाला हवी होती, तो ज्येष्ठपणाचा हक्क होता. कसा मिळवावा यासाठी त्याला कशाची पर्वा नव्हती; त्याला तो मिळवायचा होता. आणि देवाला त्याचा आदर होता.

298 आणि तीच गोष्ट आज, स्वाभाविक वृत्तीचा, दैहीक, जगिक वृत्तीच्या मनुष्याबरोबर आहे. "ठीक, मी त्या मंडळीचा आहे. मी *ह्या* मंडळीचा आहे. मी *त्याचा* आहे." ह्या एकाही गोष्टीचा त्याच्याशी संबंध नाही, एकही गोष्टींचा नाही.

299 लक्ष द्या, आता तो त्यांना त्याच्या मिश्र रंगाच्या घोड्यावर एकत्रित करीत आहे. तो त्यांना त्याच्या रंगाच्या घोड्यावर एकत्रित करीत आहे, कारण त्याच्याकडे राजकीय ताकद आहे.

300 तुम्ही विश्वास करीत नाही की त्याच्याकडे आहे! आता हा राष्ट्रपती आत कसा आला? तो कसा वर गेला? ओह! जे तुम्ही येथे धर्माच्या स्वातंत्र्याकरिता आले आहेत; आणि तुम्ही लोकशाहीवादी समुह तुम्ही तुमचे ज्येष्ठपणाचे अधिकार राजकारणाला विकाल! मी...लोकशाहीवादी पक्ष ठीक आहे; ते दोघेही भ्रष्ट आहेत. मी ख्रिस्ती धर्माविषयी बोलत आहे. परंतु तुम्ही तुमचे ज्येष्ठपणाचे हक्क. एका लोकशाहीवादी, तिकीटासाठी विकले. ह्यासाठी त्या गोष्टी आत याव्या. ही लाजिरवाणी गोष्ट आहे.

301 तुम्हाला समजत नाही की हा देश, बिलकुल, इस्त्राएलचा नमुना आहे? इस्त्राएलने काय केले? ती परकीय देशात आली, आणि तेथील रहिवाशांना बाहेर काढले, आणि त्यांना मारुन टाकले आणि आत गेली आणि तो देश हस्तगत केला. तेच आपण केले होते. रेड इंडीयन हेच खरे अमेरिकी आहेत, आपले रेड इंडियन हेच खरे अमेरिकी आहे.

302 आणि नंतर त्यांनी काय केले? इस्त्राएलाकडे काही महान पुरुष होते. प्रथम गोष्टी तुम्हाला माहीत आहे...त्यांच्याकडे दाविद होता, आणि त्यांच्याकडे शलमोन होते. त्यांच्याकडे महान पुरुष होते. आणि शेवटी त्यांच्याकडे तेथे एक विश्वासघातकी, अहाब होता, ज्याने ईजबेल, एका अविश्वासू बरोबर विवाह केला.

303 अगदी तीच गोष्ट आपण केली. आपल्याकडे वॉशिंग्टन होता आणि लिंकन होता, परंतु पाहा, आता आपल्याकडे काय आहे. आणि महत्त्वाची गोष्ट ही आहे की, तो विवाहीत आहे. आणि तो पूर्णपणे ईजबेलच्या प्रभावाखाली आणि रंगात रंगलेला आहे. तो कदाचित एक चांगल्या प्रकारचा व्यक्ति असेल, परंतु ती कारभार चालवणार आहे. आणि तुम्ही पाहा, ठीक ह्यासमयी, संपूर्ण कुटूंब आत येत आहे.

304 सुमारे पस्तीस वर्षांपूर्वी पवित्र आत्म्याने मला काय सांगितले? आणि तुम्ही सर्व जे जुने आहात त्यांना ते माहीत आहे, सात गोष्टी ज्या अंत होण्याअगोदर घडणार आहेत. आणि ही अंतिम भविष्यवाणीच्या अगोदरची भविष्यवाणी आहे. इतर सर्वकाही अगदी तशाचप्रकारे घडले आहे, जसे युध्द आणि इतर सर्वगोष्टी. समजले. आणि आता तो ह्या देशावर राज्य करण्यासाठी त्या स्त्रीच्या हाती आहे. ईजबेल! समजले?

305 परंतु, स्मरण करा, ईजबेलच्या दिवसात तेथे कोणी होता—ज्याने वास्तवात त्यांना त्यांचे रुप दाखवले. समजले?

306 ते त्यांच्या मिश्र रंगाच्या घोड्यावर एकत्रित होत आहे. आणि, पाहा, तो ह्या गोष्टी एकत्रित करीत आहे, मिश्र पंथ, संप्रदाय, मनुष्याने बनविलेली तत्वप्रणाली. ते बरोबर आहे का? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] निश्चितच, एक मिश्र रंग, मृत्यूचा मिश्र रंग, जगीक फिकट रंगाचा घोडा! आता, ते बरोबर आहे, मृत्यूचा मिश्र रंग, फिकट घोड्याचे जगीक रुप वचनाचे पवित्र रक्त लवमात्र ही नाही!

307 आणि लक्ष द्या..."पृथ्वीच्या चारही कोपऱ्यांतून त्यांना त्यांना हर्मगिदोनाच्या युध्दासाठी एकत्रित केले," असे बायबल सांगते. मी त्या शास्त्रलेखाविषयी विचार करण्याचा प्रयत्न करीत आहे कारण मी ते येथे लिहून ठेवले आहे. मी ते सांगत नाही. परंतु जेथे ते लिहीलेले आहेत, ते काय आहेत. हे पाहत आहे. "प्रभू परमेश्वराच्या युध्दाच्या मोठ्या दिवसासाठी त्यांना एकत्रित करीत आहे." आता ह्या मिश्र रंगाच्या, जगिक, फिकट, आजारी घोड्याकडे पाहा, जरा त्याचा विचार करा. तुम्हाला ठाऊक आहे, ती एक वाईट गोष्ट आहे. आता, लक्ष द्या. तो त्यांना कोठून एकत्रित करीत आहे, "पृथ्वीच्या चारी कोपऱ्यांतून." ते आता सर्व वादाची समाप्ती करणारी कृती करण्यासाठी एकत्रित करीत आहे. वचनाप्रमाणे सर्व वादाची समाप्ती करणारी अंतिम कृती "हर्मगिदोन" येथे असेल. समजले?

308 फिकट घोड्यावर स्वार झालेला ज्याच्यावर "मृत्यु" हे नाव लावलेले आहे. "मृत्यु" ख्रिस्तविरोधी! लक्षपूर्वक ऐका. ख्रिस्तविरोधी, प्रथम संप्रदाय (ज्याविषयी वाद करु शकत नाही.); त्याच्या ईजबेल सोबत, वचनाविषयी वेश्या आहे, तिच्या मुली प्रोटेस्टंटसह, आता एकतेसाठी त्यांना एकत्रित करीत आहे!

309 काय तुम्ही ऐकले बाप्टिस्ट लोक येथे त्या दिवशी काय बोलले होते? "ओह, आम्ही त्यांच्याबरोबर एकत्र होणार नाही, परंतु आम्ही—आम्ही त्यांच्याशी मित्रत्वाने आणि उदार

राहू. आम्ही त्याच्या मंडळीत सामील होणार नाही. परंतु..." तुम्ही तसे आहात तुम्ही तसेच आहात; जसे वचनात सांगितले आहे. समजले? समजले? ह्या प्राचीन वेश्येची पहिली स्थिती पाहा.

310 आता येथे ते त्यांना स्वतःला एकत्रित करुन, सर्व वादाची समाप्ती करणाऱ्या हर्मगिदोन युध्दाकडे येत आहेत, आणि मिश्र रंगाच्या घोड्यावर, एक पांढऱ्या रंगाचा घोडा, एक लाल रंगाचा घोडा, एक काळ्या रंगाचा घोडा ह्यासह येत आहे. हे तीन भिन्न अधिकार राजकीय आहेत, राजकीय—राजकीय अधिकार, आत्मिक अधिकार आणि भूतांच्या आत्म्याद्वारे नियंत्रित अधिकार, जे ख्रिस्तविरोधी आहे. हे सर्व एकत्र मिसळले असता, तुम्हाला फिक्कट रंग मिळतो, तो ह्या फिकट गुळगुळीत दिसणाऱ्या घोड्यावर स्वार आहे. बरोबर आहे. आता लक्ष द्या. पाहा, तो कशावर स्वार आहे, ह्या फिकट दिसणाऱ्या, करड्या रंगाच्या घोड्यावर जो काळा, लाल आणि पांढरा रंग मिळून बनवलेला आहे. तो युध्दासाठी येत आहे, स्वर्गाखालील प्रत्येक राष्ट्रांतून त्याचे लोक एकत्र करीत आहे! दानिएलाने त्या स्वप्नाचा अर्थ सांगितला नाही का, आणि रोमच्या, प्रत्येक राज्यातून लोखंडाचे भाग पसरताना पाहीले नाही काय? येथे ते सर्व येऊन एकत्र होत आहेत.

आता तुम्ही हे संपविण्याच्यावेळी, काही मिनिटासाठी, शांत बसा आणि लक्षपूर्वक ऐका.

311 ते आता हे करण्यासाठी एकत्रित होत आहेत, पृथ्वीच्या चारही कोपऱ्यांतून त्याच्या लोकांना एकत्र आणण्यासाठी एका फिकट, अशक्त, तीन रंगाच्या, मिश्र घोड्यावर स्वार होऊन फिरत आहे. तो स्वार एकच व्यक्ती आहे!

312 आता प्रकटीकरण 19 मध्ये, केवळ तोच तयार होत नाही, परंतु ख्रिस्त ही त्याला भेटण्यासाठी सिध्द होत आहे. ते युध्द अटीतटीचे आणि जोरदार असेल. ख्रिस्त प्रकटीकरण 19 मध्ये त्याची प्रजा पृथ्वीच्या चारही कोपऱ्यांतून एकत्र करीत नाही, कारण तेथे थोडेच लोक उरलेले असतील, तो काय करीत आहे? तो त्यांना स्वर्गाच्या चारही कोपऱ्यांतून एकत्र करीत आहे. आपण त्या, "वेदीखालील आत्म्याविषयी," उद्या रात्री पाहू, आणि तुम्ही पाहता की हे बरोबर आहे, किंवा नाही. स्वर्गाच्या चारही कोपऱ्यांतून तो त्याच्या लोकांना एकत्र करीत आहे, पांढऱ्या घोड्यावर स्वार आहे!

313 त्याचेही एक नाव आहे. ते मृत्यु नाही, परंतु, "परमेश्वराचे वचन" जीवन आहे. आमेन. आणि परमेश्वराने त्याच्या जांघेवर(मांडीवर) येथे लिहीले "परमेश्वराचे वचन." तेथेच फक्त जीवन आहे. कारण परमेश्वरच एकटा सार्वकालिक जीवनाचा स्त्रोत आहे. (परमेश्वराचे जीवन) झोए! ते बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.]

314 आणि त्याच्यावर "जीवन," लिहीलेले आहे. तो पांढऱ्या घोड्यावर स्वार आहे. आणि येथे एक पुरुष आहे. ज्याच्याकडे ती भिन्न अधिकार एकत्रित आहेत, ज्यास "मृत्यु" म्हणतात, तो त्याच्या पृथ्वीवर येणाऱ्या प्रतिनिधींना एकत्रित करीत आहे; आणि ख्रिस्त त्याच्या स्वर्गात जन्म पावलेल्या लोकांना, संतजनांना एकत्रित करीत आहे. त्याच्यावर "मृत्यु" लिहीलेले आहे; ख्रिस्ताच्यावर "जीवन" लिहीले आहे.

315 त्याच्याबरोरचे पांढऱ्या घोड्यावर आहे, आणि त्यांना म्हटले आहे, "जगाच्या स्थापनेअगोदर निवडलेले." आमेन! आणि ते वचनाशी विश्वासू राहतात. आमेन! मला ते फार आवडते. "जगाच्या स्थापने अगोदर निवडलेले. आणि ते त्यांच्या निवडीद्वारे." वचनाशी विश्वासू आहेत, सर्व त्या नवा द्राक्षारस आणि तेलाने प्रेरित आहेत, आणि ते त्याला भेटण्यासाठी घोड्यावर स्वार त्याच्याबरोबर होऊन येत आहेत. त्यांना ठाऊक आहे की लवकरच, त्या गर्जना त्या गोष्टी आम्हास प्रगट करतील. समजले?

316 पाहा. तो कसे करतो? म्हणून, जर तो वचन आहे, आणि त्याचे नाव वचन आहे, तर वचन जीवन आहे. ख्रिस्तविरोधी; जे काही *विरोधी* आहे ते “विरुध्द,” आहे. म्हणून *विरोधी* म्हणजे ख्रिस्ताच्या “विरुध्द” वचनाविरुध्द. म्हणून ते पंथ किंवा संप्रदाय होतात, जे वचनाविरुध्द आहे.

317 मला माहीत नाही तुम्ही ते कसे चुकविणार आहात. जर तुम्हाला—तुम्हाला ते समजले, तर तुम्ही ते कसे चुकवाल, मला ते ठाऊक नाही की तुम्ही ते कसे चुकवाल.

318 आणि ते खरे आहे. *विरोधी* म्हणजे “विरुध्द” आहे. ते बरोबर नाही का? “तेथून दूर नेते.” हो तोच आहे. तो त्याच्या मिश्र रंगाच्या घोड्यावर आहे. आपण ते येथे परमेश्वराच्या वचनांतून पाहीले.

319 आपण ते सात मंडळीच्या युगात पाहीले. येथे तो ते पुन्हा शिक्क्यांमध्ये आणतो, शिक्के उघडतो आणि ज्या गोष्टी मंडळीच्या युगामध्ये घडल्या त्या दाखवतो.

320 *विरोधी* म्हणजे वचना “विरुध्द.” पाहा, का, पंथाच्या, का आपण पंथाच्या आणि संप्रदायाच्या इतके विरुध्द आहोत? कारण ते वचनाविरुध्द आहेत. समजले?

321 येथे आपण पाहतो जीवन आणि मरण हे अंतिम संघर्षांसाठी येत आहेत. पांढरा घोडा, खऱ्या जीवनाचा फिकट घोडा, मिश्र पंथाच्या. ते ह्या गोष्टींना वास्तविक प्रकट होताना पाहतात.

322 आता मी येथे काही सांगू इच्छितो. तुम्ही कदाचित ह्यावर विश्वास ठेवणार नाही. परंतु खात्री होण्यासाठी मी त्या शोधल्या आहे. तेथे फक्त एकच मूळ रंग आहे, आणि तो पांढरा आहे. किती जणांना हे माहीत आहे? तेच फक्त एक मूळ रंग आहे. इतर सर्व, मिश्र आहे.

323 ख्रिस्त हा प्रारंभापासून, एक ठोस—श्वेत, भेसळरहीत वचन आहे. आमेन! आमेन! प्रत्येक रंग पांढरा असता जर त्यात काही रासायनिक प्रक्रीया झाली नसती. आमेन! महिमा होवो! प्रत्येक मंडळी परमेश्वराच्या वचनाच्या प्रेषितीय शिकवणीवर उभी असती, आणि परमेश्वराने त्याला पुष्टी दिली असती, जर त्याने तत्त्वप्रणाली आणि संप्रदाय त्यामध्ये मिसळले नसते. तुम्ही तेथे आहात

ओह, भाऊ इवान्स, मला आता बरे वाटत आहे! होय, महाशय. होय, महाशय.

324 फक्त, एकच मुळ रंग, तो पांढरा रंग आहे. तो कधीच—तो कधीच संप्रदाय आणि पंथाबरोबर मिसळत नाही. महाशय, नाही.

325 आणि, स्मरण करा, त्याच्या संतांनी पांढरे, झगे घातलेले आहे. ते संप्रदाय आणि पंथासोबत मिसळणार नाही. आता आपण पाहतो की, संप्रदाय, पंथ, येथे जेथे तुम्हाला तुमचा मिश्र रंग मिळतो. परंतु हा मूळ रंग आहे, तो त्यावर स्वार आहे. मूळ रग त्याच्या लोकांवर आहे. आणि ते त्या रक्तात बुडवलेले आहेत, जे त्यांची वस्त्रे शुध्द करते, आणि पापास पुन्हा पलिकडे पाठवतो. समजले? ते बरोबर आहे.

जे मिसळलेले, फिकट झाले आहेत आणि मृत्युकडे जातात.

326 पांढऱ्या रंगाबरोबर इतर रंग मिसळणे, ही विकृती आहे, तुम्ही मूळ रंग विकृत करता. ते बरोबर आहे का? जर मूळ रंग पांढरा आहे, आणि तुम्ही त्याबरोबर दुसरे काही मिसळता, तुम्ही मूळ रंगाला बिघडविता. आमेन. ते बरोबर आहे का?

327 आणि जेव्हा, जर तो पांढरा घोडा आहे, आणि तो वचन आहे, तर त्याबरोबर इतर काही मिसळविणे, कुठल्या प्रकारचा पंथ, त्यामध्ये एखादा शब्द घालणे, त्यांतून एखादा शब्द काढणे, हे संपूर्ण गोष्ट विकृत करणे आहे. हे माझ्या प्रभू! मला वचनाबरोबर ठेव!

328 सत्य आणि चूक! ओह, माझ्या प्रभू! ते कितीही चांगले का वाटेना...बरोबर आणि चुक मिसळू शकत नाही. ते मिसळू शकत नाही. ते एकतर **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** आहे किंवा ते चुकीचे आहे. पवित्र पिता काय म्हणतो, संत बोनीफर, किंवा—किंवा कटरबरीचा आर्चबिशप काय म्हणतो ह्याच्याशी कर्तव्य नाही; मला ठाऊक नाही ते कोण म्हणाले, जर ते वचनाविरुध्द आहे, ते विकृत आहे. ते इतर कशाबरोबर मिसळू शकत नाही. कोणी म्हणते, "ह्या व्यक्तीने का केले..." त्याने काय केले, तो किती पवित्र आहे किंवा तशा काही गोष्टीशी मला काही पर्वा नाही. *हेच* एक प्रत्यक्ष सत्य आहे जे आपल्याकडे आहे. कोणत्याही तथाकथित मंडळीत, पंथात सत्य नाही, जर ते *ह्याच्या* बाहेर आहे.

329 आणि मला एक जण दाखवा ज्यांच्याकडे ते आहे. माझी इच्छा आहे की तुम्ही मला हे सांगावे. मी बायबलची पाने उलटून तुम्हाला काही दाखवतो. समजले? त्यातील कोणी एकाला बोलवा. तुम्ही म्हणता, "पेंटेकॉस्टल." ओह, माझ्या प्रभू! मी आताच येथे कोणाचे तरी विचार पकडले आहे हेच कारण आहे जे मी सांगितले होते. हे चांगले आहे की तुम्ही तो विचार ह्याचवेळी सोडून द्यावा. कारण मी तेथे एका पीडेस सुरुवात होताना पाहीले आहे. मी—मी तुम्हाला दाखवू इच्छित नाही, परंतु मी—मी तुम्हाला फक्त सांगू इच्छितो की मला ठाऊक आहे की तुम्ही कशाविषयी विचार करीत आहात. समजले?

330 जे मिसळेलेले आहेत, (विरोधी) मृत्युत रुपांतरीत झाले आहे. जेव्हा तुम्ही काहीही गोष्ट मूळ गोष्टीत मिसळता, ते मृत्युच्या रंगात बदलतील.

331 जसे ख्रिस्ताने राईच्या दाण्याविषयी सांगितले आहे. जरी तो सर्व बीजामध्ये लहान आहे, परंतु तो कोणाबरोबर ही मिसळत नाही. राई मिसळणार नाही. तो खराखुरा राईचा दाणा आहे. म्हणून जर तुमच्याकडे तेवढा विश्वास असेल, तो पकडून ठेवा.

332 लक्ष द्या. जीवन, पांढऱ्या घोडेस्वाराच्या मागे जाते, जो वचन, जीवन होता, जे त्याच्या पुनरुत्थित संतजनाद्वारे जे त्याच्या बरोबर होते. सिध्द होते. आता हे युध्द कसे होणार आहे?

333 येशूने म्हटले, "जो माझ्यावर विश्वास ठेवितो. तो मेला असला तरी जगेल." त्याने म्हटले, "जर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेविता. तर तुम्ही—तुम्ही मेले असला तरी जगाल. आणि जीवंत असलेला प्रत्येक जण माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही." पुन्हा, त्याने म्हटले, "जो माझ्यावर विश्वास ठेवतो...तो त्याला सार्वकालिक जीवन देईल. त्याला शेवटच्या दिवशी उठवील." ते त्याचे अभिवचन दिलेले वचन आहे.

334 येथे सैतान त्याच्या सर्व पृथ्वीच्या चारही कोपऱ्यांतून त्याच्या प्रोटेस्टंट्स आणि कॅथलिक, आणि सर्वांना एकत्र घेऊन, हर्मगिदोनाच्या युध्दाकडे कूच करीत आहे. ठीक आहे.

335 आणि येथे येशू जो प्रकट केलेले वचन आहे, स्वर्गातून पुनरुत्थित संतजनासह खाली येत आहे.

336 मी म्हणतो, जर परमेश्वर बोलतो, किंवा तुम्हास पाठवतो, तुम्ही...तुम्ही—तुम्ही जे बोलता त्यास तो पाठींबा देतो. समजले? लक्ष द्या, जर तुम्ही स्वर्गातील राजदूत आहात, तर संपूर्ण स्वर्ग तुमच्या पाठीशी आहे. आणि स्वर्ग वचनाने बनलेला आहे...

337 लक्ष द्या, आता तो पुनरुत्थित संतजनांसमवेत येतो, सिध्द करितो की, त्याचे वचन सत्य आहे.

338 म्हणून सैतान जाणतो, की त्याच्यासाठी अथांग डोह तयार, आहे. समजले? ओह, माझ्या प्रभू! जेव्हा मृत्यु फिकट घोड्यावर स्वार आहे! मिश्र मानलेली तत्वे आणि संप्रदाय, त्याच्या मागे देवापासून सर्वकाळासाठी वेगळे होण्यास जात आहेत. तेथेच जेथे तो त्यांना सार्वकालिक वेगळे होण्यासाठी नेत आहे.

ख्रिस्त त्याच्या मंडळीला पुनरुत्थानाच्या गौरवात नेत आहे.

339 आता 8 व्या वचनाकजे लक्ष द्या…8व्या वचनाचा शेवटचा भाग, जेव्हा आपण बंद करीत आहोत, पाहा.

*…त्यांना अधिकार देण्यात आला…*

340 "ते" कोण आहेत? समजले? ठीक आहे. ख्रिस्तविरोधक आहे ज्यास "मृत्यु" म्हणतात. "अधोलोक त्याच्या पाठोपाठ चालला होता." तुम्ही त्याच्या चार मुद्दाच्या योजनेवर लक्ष द्या.

341 ख्रिस्तविरोधक, जेव्हा पांढऱ्या घोड्यावर स्वार होतो, आत्म्याद्वारे मारतो, ख्रिस्तविरोधी असल्यामुळे त्यास आत्मिक रुपात मारतो.

342 क्रमांक दोन, जेव्हा तो लाल घोडेस्वार स्वार होतो. तेव्हा तरवारीद्वारे वध करतो, राजकीय अधिकार, जेव्हा मंडळी आणि राज्य एकत्रित होतात.

343 काळा घोडा; जीवांना जेव्हा तो त्याची शिकवण देतो, आणि तेथे ती तिची जारकर्माची कृत्ये करते. आणि तो त्यांच्या भोजनाचे वजन करतो, त्यांना विकतो…ते भोजनासाठी काय देतात, तोलण्यासाठी, पैसे आणि इत्यादी इत्यादी.

344 चौथा, एक फिकट रंगाचा घोडा; परमेश्वरापासून सर्वकाळासाठी वेगळे होणे. पुन्हा, चौथा आला आहे. पाहा.

परमेश्वराची स्तुती होवो!

345 आता, शेवटी समाप्तीकडे पाहा. त्यांच्यासाठी…काय तुम्हाला समजले…मी वेळ संपवला आहे, परंतू तुम्ही मला आणखी दहा मिनिटे द्याल काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] आज मला. येथे बोलण्याविषयी—विषयी कित्येक फोन आले.

346 एलियाच्या वेळेत खूप अधिक फाजील उत्साह सुरु झाला होता की…त्या—त्याविषयी मरेपर्यंत प्रहार केला गेला. आणि तुम्ही करु शकता…ठीक आहे…परमेश्वर माझे तुम्हास समजवण्यासाठी की मी काय पहात आहे सहाय्य करो. तुम्ही कराल काय? आपण ते पाहण्याचा प्रयत्न करुया.

347 आता येथे समाप्ती करताना, ही गोष्ट त्या लोकांसाठी जे विश्वास करीत नाही की अंतिम संदेष्टा ह्या मंडळीच्या युगासाठी एलिया संदेष्टा आहे, तो त्याच प्रकारचा अभिषिक्त व्यक्ती आहे.

348 मृत्युनंतर…पाहा. ह्या अंतिम मंडळीच्या युगाच्या मृत्युनंतर…आता तुम्ही लक्ष द्या, काय घडते. पाहा, मृत्युनंतर त्यांची शरीरे जंगली श्वापदाकडून नष्ट करण्यात आली. तुम्हाला ते माहीत आहे. आता, ते खरे आहे. ही ईजबेलची प्रतिछाया आहे.

349 आता, प्रकटीकरण 2:18 आणि 20 कडे वळूया. मला वाटते की आपण हे काही मिनिटांअगोदर पाहीले आहे. आपण पाहीले नाही काय? होय, माझा विश्वास आहे आपण ते पाहीले आहे. मी येथे लिहून ठेवले आहे…होय. नैतिक घसरण होण्याचा समय, हेच

ते होते. ते कसे होते ते पाहा, ईजबेल कशी आत आली. ईजबेल ही मंडळ्या आहेत, ही आधुनिक मंडळी वधू नाही; आता, जून्या करारात, ईजबेल ही आजच्या मंडळीची प्रतिछाया आहे, देवाच्या वचनानुसार, प्रकटीकरण 2:18,20. प्रमाणे

*...कारण ईजबेल नावाची जी स्त्री आपणाला संदेष्ट्री म्हणविते...*

350 समजले? हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] आता, ती तंतोतंत ईजबेलचा नमुना आहे. आता, पाहीले...

351 आम्ही तुम्हाला वचनामागे वचन देऊ शकतो, पाहा, अंतिम युगात सदेष्ट्याचा संदेश खऱ्या मंडळीसाठी आहे, जो त्यांना परत मुळ वचनाकडे आणतो. आता लक्ष द्या. ते बरोबर आहे काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] मलाखी 4 तसे म्हणते, आणि इतर प्रकटीकरण 10:7 आणि अशाचप्रकारे शेवटपर्यंत. समजले? येशूने स्वत: ह्याविषयी भविष्यवाणी केली होती. "ते जसे लोटाच्या दिवसात होते," आणि तशाचप्रकारे पुढे आणि पुढे वचन असेच सांगते. शेवटपर्यंत वचन असेच सांगते.

352 ईजबेल ही आजच्या आधुनिक मंडळीचा नमुना आहे. कारण कॅथलिक आणि प्रोटेस्टंट आता एकत्र झाले आहेत. त्या—त्याच्याविषयी ह्याखेरीज काही नाही. ते दोघेही संप्रदाय आहेत, ती—ती आई आणि बहिण असे आहेत. त्यांच्याविषयी हेच आहे. ते एकमेकांशी गोंधळ आणि वाद आहेत. आता, मी ते स्वतःचे सांगत नाही. मी ते **प्रभू परमेश्वर म्हणतो**, ह्यांतून सांगत आहे. समजले? ठीक आहे.

353 आता आपण पाहीले की, ईजबेल परमेश्वराच्या आज्ञेद्वारे मारली गेली होती, कारण परमेश्वराने येहूला खाली जाण्यास सांगितले होते आणि त्याने तिला खिडकी बाहेर फेकले आणि ईजबेलला मारले आणि कुत्र्यांनी तीचे मांस खाल्ले, (ते बरोबर आहे का?) अक्षरशः ईजबेल. [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] अहाब, तिचा राजा, मस्तक; कुत्र्याने त्याचे रक्त पीले होते, ज्याविषयी एलियाने अगोदरच भविष्यवाणी केली होती. पाहा, आपण कोठे जात आहोत, काय तुम्ही पाहात नाही?

354 का? पहिला एलिया मंडळ्यांद्वारे नाकारलेला मनुष्य होता. आणि ईजबेल आणि अहाब ह्या मंडळ्याचे प्रमुख होते, मंडळी आणि राज्य, सर्व एकत्र, आणि अलीशाने अहाबाचे पाप त्याला दाखवले, आणि संपूर्ण मंडळीला परत सत्य वचनाकडे वळण्याची आज्ञा केली.

355 अगदी तसेच हा दुसरा एलिया करणार नाही काय जेव्हा तो ह्या दिवसात ह्या मंडळीकडे येईल, "मूळ विश्वासाकडे परत नेईल"! मला समजत नाही की लोक ह्यापासून कसे वाचतील. ते बरोबर आहे. परत मूळ वचनाकडे वळा! ते बरोबर आहे.

356 आता जर तुम्हाला त्यांचे देह पाहायचे असतील तर आपण येथे प्रकटीकरण 19 कडे वळूया, वचनाद्वारे त्यांचा वध झाल्यानंतर—नंतर काय होते. आता, वचन त्यांना मारणार आहे. तुम्हाला ते माहीत आहे. ठीक आहे. आता तुम्ही फक्त लक्ष द्या आणि पाहा, जेव्हा ख्रिस्त प्रकटीकरण 19 मध्ये येतो तेव्हा काय घडते, आपण 17 व्या वचनापासून पाहू.

*आणि नंतर मी एका देवदूतास सूर्यात उभे राहीलेले पाहीले;...*

357 आता, हे सत्य आहे, की जर आपण वरच्या वचनातून पाहीले, "आणि त्याचे वस्त्र रक्तात बुचकळले होते आणि **राजांचा राजा**, आणि **प्रभूंचा प्रभू** हे त्याला नाव देण्यात आले." 13 व्या वचनात, "त्याला देवाचा शब्द हे नाव देण्यात आले होते." समजले? आता, येथे तो "**राजांचा राजा, आणि प्रभूंचा प्रभू**."

*आणि मी एका देवदूतास...*

358 आता पाहा. तो पुढे जातो.

*आणि त्याच्या तोंडातून तीक्ष्ण धारेची तरवार निघते, त्याने राष्ट्रांस मारावे...*

359 "त्याच्या मुखातून," परमेश्वराच्या मुखापासून ते मोशेच्या मुखात. समजले?

*...तो त्यावर लोखंडी दंडाने अधिकार गाजविल. आणि...सर्वसमर्थ देव ह्याच्या तीव्र क्रोधरुपी द्राक्षारसाचे—साचे कुंड तो तुडवतो.*

*आणि त्याच्या वस्त्रावर आणि त्याच्या मांडीवर* ***राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू*** *हे नाव लिहीलेले आहे.*

*आणि मी एका देवदूतास...*

360 आता पाहा. आता तो मारीत पुढे येतो. कोणाला मारीत आहे. ईजबेल आणि तिचा अहाब, खोटा संदेष्टा.

*आणि नंतर मी एका देवदूतास सूर्यांत उभे राहीलेले पाहीले. तो अंतराळातील मध्यभाग उडणाऱ्या सर्व पाखरांस उच्च वाणीने म्हणाला, या, देवाच्या मोठ्या जेवणावळीसाठी एकत्र व्हा.*

361 तो त्यांना श्वापद आणि पक्ष्यांना खावयास देतो. आता, येथे प्रकटीकरणाच्या पुस्तकाच्या दुसऱ्या अध्यायात पाहा. आणि एक मिनिट थांबा, "तरवारीने आणि मरीने आणि पृथ्वीवरील श्वापदांकडून जीवे मारले." समजले? ईजबेलरुपी मंडळी तिचे (वास्तविक) देह पृथ्वीरील पक्षी आणि श्वापदांकडून खाल्ला जाणार आहे. ज्याप्रमाणे अहाब आणि ईजबेल बरोबर स्वाभाविकरित्या झाले होते, तसेच आत्मिक स्वरुपात मंडळीचे होणार आहे. मला काय म्हणायचे ते तुम्हाला समजते काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] ठीक आहे.

362 एलिया...ओह! एलीया हा अहाब आणि ईजबेलच्या दिवसात, स्वाभाविकरित्या, संदेष्टा. होता. आणि **प्रभू परमेश्वर असे म्हणत आहे**. ह्या वचनानुसार आत्मिक ईजबेलसाठी हे काम त्याच्या आत्मिक; स्वरुपाच्या सेवकाईत करण्याचे त्याला अभिवचन देण्यात आले होते.

363 लक्ष द्या. एलिया, जरी त्याच्या दिवसात खऱ्या अर्थाने आणि पूर्णरुपाने प्रमाणित झाला होता, तो त्यांना परत वचनाकडे वळवू शकला नाही. ते बरोबर आहे काय? जरी, एलियाने सर्वतोपरी प्रयत्न केला. त्याने सर्वगोष्टी केल्या. त्याने—त्याने त्यांना चिन्हे आणि अद्भूते दाखवली; आणि ते त्याच्या, तोंडावर हसले. तीच गोष्टी ते येथे जे आत्मिक त्या बरोबर करतील. पाहा. तो त्यांना परत वचनाकडे वळवू शकला नाही. लाखोंमधून...

364 आता बारकाईने लक्ष द्या, तुम्ही ह्यावर थोडेसे गोंधळले आहात.

365 एलियाच्या दिवसात जेव्हा ईजबेल आणि अहाब राज्य करीत होते, जी आजची प्रतिछाया होती, जगांतील लाखों जणांतून, संपूर्ण जगांतून, केवळ सातशे जण एलियाच्या प्रचाराद्वारे वाचले होते. ते बरोबर आहे का? ते अगदी बरोबर आहे.

366 पाहा, एलिया त्यांतील एकालाही कधीच ओळखत नव्हता की ते तसे आहेत, जोपर्यंत परमेश्वराने शिक्क्यांतील एक शिक्का उघडला नव्हता आणि त्या पुस्तकातील रहस्य त्याला दाखवले नव्हते की त्याच्याकडे सातशे जण आहेत ज्यांनी त्यांच्या मतांना कधीच नमन केले नव्हते. तोपर्यंत एलियाला वाटले की तो केवळ एकटाच वाचला आहे. जेव्हा परमेश्वराने त्याचे पुस्तक एलियासाठी उघडले आणि म्हणाला, "पुत्रा आता एक मिनिट थांब. माझ्याकडे सातशे जण सभोवती बाहेर एकत्र वेगळे आहेत,

त्याची नावे पुस्तकात जगाच्या स्थापनेपासून लिहिलेली आहेत. ते माझे आहेत." देवाने शिक्के उघडले.

367 मला वाटते तेच कारण आहे की त्या रात्री योहान खूप आरडाओरडा करीत होता. त्याने त्याचे नाव तेथे पाहीले असणार, तुम्हाला समजले. समजले?

एके दिवशी देवाने उघडले...

368 अलीशा, त्याने प्रचार केला होता. त्याने सर्व गोष्टीचा प्रचार केला होता, आणि—आणि—आणि हृदयापासून प्रचार केला होता. त्याने होईल तितक्या सर्वगोष्टी केल्या. आणि तरीही ते त्याला बरे "वाईट" बोलले, त्याला सर्वकाही बोलत होते आणि म्हणाले, "तू ह्या सर्वांचे कारण आहेस. तू परलोक विद्यावादी आहे. तूच आहेस ज्यामुळे ही सर्व आपत्ती आली आहे. तू दोषी आहेस," आणि अशा सर्व गोष्टी बोलले. त्याने त्याला सर्व गोष्टी सांगितल्या. ईजबेलने त्याचा शिरच्छेद करण्याची धमकी दिली, आणि अशा अनेक गोष्टी बोलल्या. ते बरोबर आहे. सर्वजण त्याच्या विरुध्द होते.

369 आणि मग तो म्हणाला, "प्रभू, तू मला जे सर्व सांगितले, ते मी केलं आहे! मी पूर्णपणे तुझ्या वचनाबरोबर राहीलो आहे. जेव्हा तू मला काहीही सांगतो, मी निर्भय होतो. मी थेट राजाच्या संन्मुख गेलो, आणि इतर सर्व गोष्टी केल्या आणि त्यांना **'प्रभू परमेश्वर म्हणतो**,' हे सांगितले. आणि तू मला एकही गोष्ट सांगितली नाही, आणि मी त्यांना एकही गोष्ट सांगितली नाही. परंतु काय घडले आणि येथे मी त्या संपूर्ण समुहातून एकटाच उरलो आहे. मी फक्त एकटाच उरलो आहे, आणि ते मला मारण्याचा प्रयत्न करीत आहेत."

370 परमेश्वर म्हणाला, "मी ह्या शिक्क्यांमधील एक उघडणार आहे आणि तुला काही दाखवणार आहे." त्याने म्हटले, "तुला माहीत आहे. माझ्याकडे सातशे तेथे मागे उरले आहेत, ज्यांनी कधीच नमन केले नाही...अजूनही त्याच्या पंथात संप्रदायात सहभागी झाले नाहीत. तेथे त्यांच्यातील सातशे जण स्वर्गरोहणासाठी सिध्द आहेत, पाहा." ओह! ओह! त्याने त्याच्या संदेष्ट्यास म्हटले, ज्यास तो त्याचे वचन पवित्रशास्त्राबाहेर प्रकट करतो, पाहा. "माझ्याकडे ह्या पीढींतून सातशे नावे तयार आहेत. त्यांच्यातील सातशे त्यांनी त्यांचे गुडघे कशाही" (जर मी हे ह्या दिवसासाठी म्हटले) "धार्मिक संघटना, आणि त्यांच्या रितीरिवाजापुढे टेकले नाही."

371 काय तुम्हाला समजत आहे मला काय म्हणायचे आहे? तर, हे स्पष्टपणे होणे आहे. हे होणार आहे. दृश्यात येईल, तो एक संदेष्टा असेल अगदी जशाप्रकारे मी ह्या मंचावर उभा आहे तेवढे निश्चित. समजले? आणि तो वचनावर स्थिर राहील. तो कोणाचीही मानलेली तत्वे किंवा इतर गोष्टी घेणार नाही. ते बरोबर आहे. तो जंगली मनुष्यासारखा असेल, जसे अलीशा होता...तो आणि जसा योहान होता. मुला तो—तो स्त्रीयांचा अर्थात अनैतिक स्त्रीयांचा द्वेष करील! मुला तो त्यांच्यातून जाईल! जसे एलियाने केले, आणि योहानाने केले. समजले? आणि तो वचनाशी स्पष्ट राहील. तो संघटनेच्या विरुध्द असेल. संघटना? "तुम्ही असा विचार करु नका, 'अब्राहाम आमचा पिता आहे,' कारण मी म्हणतो, देव ह्या धोंड्यापासून अब्राहामाची लेकरे उत्पन्न करण्यास समर्थ आहे." समजले? निश्चितच त्याने तसे केले.

372 आता, मित्रांनो, तुम्ही तेथे आहा. येथे चौथा शिक्का उघडला. आणि माझ्या माहितीप्रमाणे चार घोड्याचे स्वारांचे प्रकटीकरण झाले आहे. आता, हेच सर्व पृथ्वीवर घडले.

373 पुढचा शिक्का, स्वर्गात आहे, जेथे आत्मे वेदीखाली आहे.

374 आता, संपताना, मी ह्या गोष्टी...काही शब्द येथे सांगू इच्छितो, जे मी लिहून ठेवले आहेत. आपण जवळजवळ चार शिक्के पूर्ण केले आहेत, पहिले चार शिक्के.

375 आता, उद्या रात्री, आपण—आपण पृथ्वीवर घडणाऱ्या गोष्टी वरुन दृश्य बदलणार आहोत. त्याने वर दृष्टी लावली. आणि वेदीखाली प्राण पाहीले, ज्यांचे बलिदान झाले होते.

दुसऱ्या रात्री, वेदीवर न्याय येतो.

376 आणि चौथ्या रात्री, किंवा शेवटल्या रात्री. रविवारी रात्री, काय सांगायचे हे मला माहीत नाही. मला ठाऊक नाही की ह्या दुसऱ्या शिक्क्यांचा अर्थ काय आहे. मी ते फक्त वाचतो जसे तुम्ही ते वाचता. परंतु, "स्वर्गात अर्धा तास निवांत होतो," परंतु तेथे काहीतरी घडले. मी अपेक्षा करतो की त्याने ते प्रकट करावे. तो ते करील. मी समाधानी आहे, तो ते करील.

377 आपल्याला ख्रिस्ताचे आगमन, ख्रिस्तविरोधकचा अंत पाहण्यासाठी वचनातून निरनिराळ्या जागी, प्रकटीकरण 19 मध्ये जावे लागणार आहे. तेच कारण आहे की हे मला सोडावे लागले, आणि मी केवळ दोन वचनेच घेतली. मला वचनात निरनिराळ्या जागी, ह्या गोष्टी सिध्द करण्यासाठी जावे लागते. म्हणून तेच कारण आहे मी प्रकटीकरण 19 मध्ये गेलो. ख्रिस्तविरोधकचा अंत दाखविण्यासाठी जेव्हा ख्रिस्त येईल तो ख्रिस्तविरोधकचा वध करील.

378 प्रकटीकरण 10 कडे गेलो हे दाखविण्यासाठी की सातव्या दूताचा संदेश अंतिम दिवसात एका व्यक्तीकडे येईल जो परमेश्वराने अभिषिक्त केलेला असेल. जशी सेवकाई एलिया संदेष्ट्याकडे होती. ज्याविषयी मलाखी 4 मध्ये भविष्यवाणी केली होती. देवाचे (मूळ) सत्य वचन ह्या पिढीमध्ये प्रकट करील. जसे त्याने स्वाभाविक ईजबेलला, केले तसेच हा मनुष्य आत्मिक ईजबेलशी, संप्रदायातील मंडळ्यांना करील. मला 7 वा अध्याय...10 अध्याय, 1 ते 7 वचनांकडे जावे लागले हे दाखविण्यासाठी की हे बरोबर आहे. आणि मलाखी, आणि आमोस, आणि असेच पुढे ते सिध्द करतात.

379 एलिया एक संदेष्टा होता ज्याने भविष्यावाणी केली त्या विशिष्ठ पीढीत ईजबेलला दोषी ठरविले.

380 आणि एलिया कधीच मेला नाही. तो निश्चितच मेला नाही. तो पुन्हा सुमारे आठशे वर्षानंतर, रुपांतराच्या डोंगरावर येशू ख्रिस्ताच्या बाजूला प्रकट झाला. तो मृत नाही.

381 आता, आपण पाहीले की परमेश्वराच्या वचनानुसार, अंतिम दिवसात त्याचा आत्मा एका मनुष्यावर असेल, आणि असे अभिवचन दिले आहे की तो अंतिम युगात आत्मिक ईजबेलबरोबर तसेच करील, जसे त्याने स्वाभाविक ईजबेलबरोबर केले होते.

382 हेच कारण होते की हे सिध्द करण्यासाठी मी—मी बायबलच्या इतक्या गोष्टींचा उल्लेख केला, तुमच्या मनात कोणताही प्रश्न राहू नये. जर तेथे काही प्रश्न असतील तुम्ही मला कळवा. ठीक आहे, तुम्ही मला एक पत्र किंवा लहान चिठ्ठी लिहून पाठवा.

383 आणि ते इतके पूर्णपणे जुळतात, की अंतिम दिवसात प्राणी देखिल त्यांच्या स्वाभाविक देहाचा नाश करतील, ते त्यांचा देह तसाच खातील जसे ते तेव्हा खात होते.

384 माझ्या प्रकटीकरणाप्रमाणे, ते मला देवाकडून मिळाले होते आणि अगोदरच सांगितले गेले होते की हे केले जाईल, माझ्या माहितीप्रमाणे हे चार घोडेस्वारांचे सत्य आहे.

385 तुम्ही येशूबद्दल काय विचार करता? [मंडळी उल्हास करते—सम्पा.]

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो.
कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले.
आणि तारण विकत घेतले
कलवरीच्या झाडावर.

386 आता लक्षात ठेवा…(असेच आहे, पुढे चला; हे चांगले आहे) माझ्या मनात कुठल्याही संघटनेच्या कोणत्याही लोकांबद्दल वाईट भावना नाहीत! कारण देवाची लेकरे कॅथलिक प्रणालीतही आहे. मेथॉडीस्ट प्रणालीतही देवाची लेकरे आहेत. त्याची लेकरे बाप्टिस्ट प्रणालीतही आहे. ह्या सर्व भिन्न प्रणालीत किती जण होते जे येथे आज रात्री उपस्थित आहेत, ते त्यातून बाहेर आले जेव्हा त्यांनी प्रकाश पाहीला? आम्हाला तुमचे हात पाहू द्या. [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.] आता, स्मरण करा, तेथे बाहेर तुमच्यासारखेच लोक आहेत. परंतु, ती एक प्रणाली आहे जी मारते, पाहा, तो ख्रिस्तविरोधी आत्मा आहे जो शेवटी त्यांना अशा ठिकाणी नेतो. तोपर्यंत ते सत्य ऐकणार नाहीत.

387 आणि तुम्हाला ती रात्र लक्षात आहे, जेव्हा मी शिक्क्यांविषयी बोलत होता? जर कोणी मनुष्य ज्यूबली योबेल वर्षांची घोषणा ऐकतो आण तो मुक्त होण्यास नकार देतो, तर त्याला दाराच्या चौकटीपाशी न्यावे आणि अरीने त्याचा कान टोचावा. कान जो आहे जेथून तुम्ही ऐकता. "आणि विश्वास ऐकण्याद्वारे येतो." तर मग जर तो ती घोषणा ऐकतो आणि त्याची मुक्ती स्विकारण्यास नाकारतो. तर त्याला त्याच्या संप्रदायाच्या मालकीची त्याच्या उर्वरित आयुष्यात चाकरी करावी लागेल. आमेन.

388 ओह! ओह, माझ्या प्रभू! तो अद्भूत नाही का? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.]

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी…

आपण आता आपले हात वर करुया आणि त्याची आराधना करुया.

कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले. (महिमा होवो)
आणि माझे तारण विकत घेतले,
कलवरीच्या झाडावर.

389 [भाऊ ब्रॅन्हम गुणगुणण्यास आरंभ करतात *मी त्याच्यावर प्रेम करतो*—सम्पा] आता, तुमचे मस्तक झुकवा, आणि आपण त्याची आराधना करुया. जेव्हा आपण ते गाणे गुणगुणत आहोत. [भाऊ ब्रॅन्हम *मी त्याच्यावर प्रेम करतो* हे गाणे गुणगुणत राहतात.]

390 प्रभू, आम्ही किती आभारी आहोत! मी खूप आनंदी आहे. प्रभू, मी तुझ्यासाठी आणि तुझ्या लोकांसाठी खूप आनंदीत आहे. हे प्रभो, तू आमचे तारण कलवरीवर विकत घेतले. प्रभो, आम्ही त्याचा आनंदाने स्विकार करतो.

391 आता, प्रभो तुझ्या आत्म्याद्वारे आमची पारख कर. आणि आणि जर आमच्यामध्ये काही दुष्टता, वचनाविषयी काही अविश्वास आणि कोणी असा व्यक्ती आहे जो परमेश्वराच्या प्रत्येक वचनावर "आमेन"; म्हणणार नाही, आता पवित्र आत्मा खाली उतरो. आणि तो पांढरा घोडेस्वार, त्याचा आत्मा, ख्रिस्ताचा आत्मा! ख्रिस्त विरोधी आत्म्याच्या सन्मुख खाली येवो आणि आणि त्याच्या स्वतःच्या लोकांना बोलवो. प्रभो त्यांना बाहेर बोलवो.

392 आता ते पश्चाताप करो, शीघ्र तुझ्याकडे येवोत आणि तेल आणि द्राक्षारसाने भरले जावो; आणि संप्रदायाच्या काईनाच्या मृत्युचा झग्यांतून सार्वकालिक जीवनाचा बर्फासारखा शुभ्र झगा बदलो जो वराने दिला आहे. आणि मग ते एके दिवशी लग्नाच्या

भोजनास सिध्द केलेल्या पुनरुत्थानाच्या वचनामध्ये जावोत. प्रभो, ते प्रदान कर. प्रभू जेव्हा लोक तुझी वाट पाहतात, तू त्याच्या हृदयाची झडती घे. येशूच्या नावाने मागतो!

[भाऊ ब्रॅन्हम गुणगुणण्यास सुरुवात करतात *मी त्याच्यावर प्रेम करतो*—सम्पा]

393 आता, माझा भाऊ, माझी बहिण, माझ्या मित्रा तुम्ही तुमच्या हृदयाची झडती घ्या. मी तुमच्याबरोबर फार काळापासून आहे. अंदाजे तेहतीस वर्षे झाली. मी कधी तुम्हाला प्रभूच्या नावाने काही गोष्ट सांगितली परंतु जी घडली नाही? [मंडळी म्हणते, "नाही."—सम्पा.] ख्रिस्ताला शोधा जेव्हा तुमच्याकडे संधी आहे. आता असा समय लवकरच येईल जेथे तुम्ही ते करु शकत नाही. समजले? तो कधीही त्याची मध्यस्थीची जागा सोडू शकतो. तेव्हा तुम्ही तुमच्या संपूर्ण अंतःकरणाने रडू शकता. तुम्ही नृत्य करु शकता, तेव्हा तुम्ही अनन्य भाषा बोलू शकता, तुम्ही जमिनीवर वर—खाली धाऊ शकता, तुम्ही तुम्हाला हवे ते करु शकता, तेथे काहीच नसणार, तुमच्या—तुमच्या पापासाठी आणखी विरंजक नसणार. तेव्हा तुम्ही काय करणार, तेव्हा तुम्ही कोठे असणार?

394 ठीक आहे, मी माझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास करतो की ते आसन अजूनही खुले आहे. मी विश्वास करतो की तो अजूनही देवाच्या राजासनावर आहे. परंतु लवकरच तो आता उठणार आहे आणि त्याने जे सोडवले आहे त्यांचा दावा करण्यासाठी पुढे येणार आहे. तो सोडविणाऱ्या आप्तजनाचे काम करीत आहे, जेव्हा रुथ वाट पाहत आहे.

395 परंतु लवकरच, तुम्हाला ठाऊक आहे, बवाज त्याचे आप्तजनाचे काम पूर्ण केल्यानंतर, तेव्हा तो येतो आणि वतनाचा दावा करतो. आणि ते अगदी तसेच आहे जे त्याने केले असे बायबल म्हणते, "तो पुढे येतो आणि ते पुस्तक घेतो." तेव्हा मध्यस्थीचे कार्य संपुष्टात येते; तो राजासनावरुन उठतो; तेथे दयासनावर रक्त आणखी असणार नाही. आणि तेव्हा ते काय आहे? न्यायासन.

396 काही ह्या दिवसात तुम्ही असे म्हणू नका, "मला वाटले रॅपचर व्हावयाचे आहे." आणि मागे वाणी बोलताना ऐकता, "ते होऊन गेले आहे." परमेश्वर तुमचे सहाय्य करो!

आता आपण आपली मस्तके झुकवूया.

397 भाऊ नेव्हील, सभा बरखास्त करण्यासाठी किंवा तुम्हाला जे काही करायचे आहे. उद्या रात्रीपर्यंत परमेश्वर तुम्हास आशीर्वादीत करो.

**_चौथा शिक्का_** MAR63-0321

(The Fourth Seal)

**_सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र_**

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रन्हम यांनी गुरुवारी संध्याकाळी, 21 मार्च, 1963 रोजी, अमेरिकेच्या इंडियानाच्या जेफरसनविले येथील ब्रन्हम टेबरनेकल, जेफरसनविले, इंडियाना, यु.एस.ए मधून प्रचार केला होता.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org